सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ९ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



समाजापासून आनंद प्राप्त होतो म्हणून मला समाजाची आवश्यकता आहे. लोक स्वार्थाचाच विचार करतील तर समाजात संघर्ष निर्माण होतो आणि संघर्ष निर्माण झाला तर आनंद नाहीसा होऊन असुरक्षितता निर्माण होते.

**दत्तोपंत ठेंगडी**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# राफेल पाडले ही 'फेक न्यूज'

## फ्रेंच नौदलाकडून पोलखोल, पाकिस्तानची पुन्हा नाचक्की



**नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान राफेल विमाने पाडल्याच्या दाव्यांमुळे पाकिस्तान पुन्हा एकदा लज्जित झाला आहे. फ्रेंच नौदलाने पाकिस्तानी माध्यमांचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. फ्रेंच नौदलाने रविवारी एक निवेदन जारी करीत राफेल लढावू विमान पाडल्याचा दावा करणे 'फेक न्यूज' असल्याचे स्पष्ट केले. तसेच निराधार आणि तथ्यहीन वृत्त दिल्याबद्दल पाकिस्तानला कडक शब्दात फटकारले.

पाकिस्तानच्या 'जिओ टीव्ही'ने एक लेख प्रकाशित करीत ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानी हवाई दलाने चांगली तयारी केली होती. यामुळे संघर्षात पाकिस्तानचा वरचष्मा होता, असा दावा करण्यात आला. फ्रेंच कमांडर कॅप्टन जॅक लॉने याने हा दावा खरा असल्याचे म्हटले आहे. शिवाय, चीनची जे-१० सी लढाऊ विमाने तांत्रिकदृष्टया सक्षम असल्यानेच राफेल विमाने पाडण्यात आल्याचा दावाही करण्यात आला.

फ्रेंच नौदलाने केलेला दावा हा पाकिस्तानच्या खोट्या प्रचार यंत्रणेविरुद्ध पुरावा असल्याचे भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनीही ट्विटरवर पोस्ट करून म्हटले आहे. फ्रेंच नौदलाने पाकिस्तानच्या जिओ टीव्ही आणि त्यांचे रिपोर्टर हमीद मीर यांना चुकीची माहिती आणि माहिती पसरवल्याबद्दल दोषी ठरवले आहे. मालवीय यांनी पुढे लिहिले की, त्यांच्या अहवालात हमीद मीर यांनी राफेल विमान आणि मे महिन्यातील संघर्षाबद्दल जुने आणि बनावट दावे सादर केले. आता हे सार्वजनिकरित्या उघड केले जात आहेत. जेव्हा अधिकृत संस्था त्यांच्या प्रचार साहित्याचे खंडन करू लागतात, तेव्हा तुम्ही सांगू शकता की पाकिस्तानची चुकीची माहिती देणारी यंत्रणा किती हताश झाली आहे. (वृत्तसंस्था)

### फ्रेंच नौदलाने काय म्हटले

फ्रेंच नौदलाने पाकिस्तानचा हा दावा फेटाळला आहे. याला खोटी बातमी म्हणत फ्रेंच नौदलाने असे म्हटले आहे की कॅप्टन लॉने यांनी कधीही अशा लेखासाठी परवानगी दिली नाही. लेखात केलेले दावे खोटे आणि भ्रामक आहेत. पाकिस्तानच्या दाव्यावर ऑनलाइन देखील मोठ्या प्रमाणात टीका झाली आहे. भारतविरोधी प्रचाराच्या बातम्यांसाठी अनेकांनी पाकिस्तानी माध्यमांवर टीका केली आहे.



लखनौ येथे रविवारी आयोजित 'दिव्य गीता प्रेरणा उत्सव' कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना भगवद्गीता भेट म्हणून देताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

# सीमा लवकरच बदलतील, भारताला सिंध परत मिळेल

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना विश्वास



**रबाट, २३ नोव्हेंबर**

आज सिंध भारताचा भाग नसला तरी, सीमा कधीही बदलू शकतात आणि सिंध भारतात परत येऊ शकतो, असा विश्वास संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी व्यक्त केला.

मोरोक्को येथे भारतीय समुदायाच्या एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सिंधच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वाची आठवण करून दिली. १९४७ च्या फाळणीनंतर सिंध प्रदेश पाकिस्तानात गेला. तिथे राहणारे बहुतेक सिंधी हिंदू भारतात स्थलांतरित झाले. राजनाथसिंह यांनी नमूद केले की, लालकृष्ण अडवाणी यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे की, त्यांच्या पिढीतील सिंधी अजूनही सिंधचे भारतापासून वेगळे होणे स्वीकारू शकलेले नाहीत.

त्यांनी स्पष्ट केले की, सिंधू नदी भारतातील हिंदूंसाठी नेहमीच पवित्र राहिली आहे आणि सिंधमधील अनेक मुस्लिमांनीही तिचे पावित्र्य झमझम नदीइतकेच पवित्र मानले. राजनाथ सिंह म्हणाले, आज, सिंध भौगोलिकदृष्ट्या भारताचा भाग नाही परंतु सभ्यता आणि संस्कृतीच्या बाबतीत ते नेहमीच भारताचा भाग असेल. सीमा बदलू शकतात आणि कोणाला माहिती, उद्या सिंध भारतात परत येऊ शकते. (वृत्तसंस्था)

### व्याप्त काश्मीरही भारतात येईल

संरक्षणमंत्र्यांनी मोरोक्कोमधील भारतीय समुदायाशी बोलताना सांगितले की, व्याप्त काश्मीर (पीओके) कोणत्याही आक्रमक कारवाईशिवाय भारताला परत केले जाईल. पीओकेमधील लोकांनी आवाज उठवण्यास आणि स्वातंत्र्याची मागणी करण्यास सुरुवात केली आहे. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी अनेक तज्ज्ञांनी म्हटले होते की, आता भारताने व्याप्त काश्मीरचा भाग परत घेण्यासाठी हालचाली करायला हव्या. आता स्थिती आपोआपच त्या दिशेने बदलत आहे.

## महत्त्वाचे

### तीन सरकारी विमा कंपन्यांचे होणार विलीनीकरण?

**नवी दिल्ली :** आर्थिक सुधारणांच्या दिशेने पुढचे पाऊल म्हणून तीन सरकारी विमा कंपन्यांचे विलीनीकरण केले जाणार असल्याची चर्चा आहे. यासंदर्भात आधीच प्रस्ताव देण्यात आले होते. आता त्यावर गांभीर्याने विचार सुरू आहे. त्यात ओरिएंटल इन्शुरन्स, नॅशनल इन्शुरन्स आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स यांचा समावेश आहे. २०१९-२० पासून २०२१-२२ दरम्यान सरकारने या तीन कंपन्यांमध्ये एकूण १७ हजार कोटी रुपयांचे भांडवल टाकले होते, जेणेकरून या कंपन्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढता येईल. आता या कंपन्यांचे विलीनीकरण करण्याच्या प्रस्तावावर नव्यानेविचार सुरू झाला आहे.

### अदानी समूहाच्या दोन नवीन कंपन्या स्थापन

**नवी दिल्ली :** गौतम अदानी समूहाची कंपनी अदानी ग्रीन एनर्जीने क्लीन एनर्जी उत्पादन आणि वितरणासाठी दोन कंपन्या स्थापन केल्या आहेत. त्यांची नावे अदानी हायड्रो एनर्जी थर्टीन आणि अदानी हायड्रो एनर्जी सिक्स्टिन अशी आहेत. या कंपन्यांचे मुख्य उद्दिष्ट पवन ऊर्जा, सौर ऊर्जा आणि इतर अक्षय स्रोतांमधून कोणत्याही प्रकारच्याविद्युत ऊर्जेचे उत्पादन, विकास, रुपांतर, वितरण, विक्री आणि पुरवठा करणे आहे.

# एकमेकांशी न बोलण्यासारखे काहीही घडलेले नाही : मुख्यमंत्री



**नागपूर, २३ नोव्हेंबर**

राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपा आणि शिवसेना शिंदे गट या दोन पक्षांतील संबंध कमालीचे बिघडल्याचे चित्र रंगविले जात आहे. मात्र प्रत्यक्षात तशी कुठलीही परिस्थिती नसल्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कोणताही दुरावा नाही. एकमेकांशी न बोलण्यासारखे काहीही घडलेले नाही. हा पूर्णतः वेड्यांचा बाजार असून, काही माध्यमेदेखील वेडी झाली असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नॅशनल बूक ट्रस्ट इंडियाच्या वतीने रेशीमबागेत आयोजित 'झीरो माईल लिटरेचर फेस्टिव्हलच्या उद्घाटनानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

एका कार्यक्रमासाठी हुतात्मा स्मारक येथे आम्ही भेटलो. एकनाथ शिंदे यांनी कुठे जातायत, हे सांगितले आणि मी कुठे जातोय्, हे त्यांना मी सांगितले. त्यातून काही गोष्टी क्लिक करून बोललो नाही, असे माध्यमांवर दाखविले गेले. शनिवारच्या कार्यक्रमात आमच्या आजूबाजूला पुरस्कार्थी बसविण्याचे ठरले होते. तिथे पोहोचल्यावर, स्टेजवर आणि जातानाही आम्ही भेटलो. कारण न बोलण्यासारखे काहीही घडलेले नाही. विविध माध्यमांवर दाखविली जात आहे, तशी कुठलीही परिस्थिती नाही. (तभा वृत्तसेवा)

### करूर चेंगराचेंगरीनंतर विजयचा प्रचार पुन्हा सुरू

**चेन्नई :** तमिलगा वेत्री कझगम (टीव्हीके) चा संस्थापक आणि अभिनेता-राजकारणी विजयने रविवारी कांचीपुरम जिल्ह्यात आपला राजकीय प्रचार पुन्हा सुरू केला. तथापि, तो एक इनडोअर कार्यक्रम होता. क्यूआर-कोड केलेले पास घेऊन सुमारे २००० लोकांना प्रवेश देण्यात आला. कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली होती. पक्षाचे कार्यकर्ते पिवळ्या गणवेशात कार्यक्रमस्थळी उपस्थित होते, त्यांना निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांनी गर्दीचे व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्याचे प्रशिक्षण दिले होते. याशिवाय, आवश्यक तिथे टिनाचे पत्रे बसवण्यात आली होती.

# मला खुर्चीचा अजिबात मोह नाही : उपमुख्यमंत्री शिंदे

## सोलापूर जिल्ह्यातील प्रचारसभेत प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर -**

हिंदूहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा मी कडवट शिवसैनिक आहे. मला खुर्चीचा अजिबात मोह नाही. मुळात खुर्ची ही जनतेच्या हितासाठी असते. ज्यांनी खुर्चीवर बसवलं त्यांचं काम करणं महत्त्वाचं आहे. दिलेला शब्द पाळणाऱ्यांपैकी मी आहे. शब्द देताना आम्ही विचार करतो आणि तो पाळतोय, असे रोखठोक प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, मोहोळ, सांगोला येथील प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले, एका शेतकरी कुटुंबातील मुलाने राज्याचा मुख्यमंत्री होऊन गोरगरिबांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे असेपर्यंत चालू राहणार आहे.

एस.टी.बसमध्ये महिला प्रवाशांना ५० टक्के सवलत, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री सहाय्यता निधी यांसारख्या योजनांमुळे अनेकांनेक लोकांना मोठा आधार मिळाला. लोकांना निर्भयपणे जगता आलं पाहिजे. दहशतवाद, गुंडगिरी रोखणे आणि लोकांना निर्भयपणे जगता आलं पाहिजे यासाठी आपण प्रयत्नशील राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

'कमेंटमेट तो हम करते नही, एक बार कमेंटमेंट कर दि तो, हम खुद की भी नही सुनते', असा फिल्मी डायलॉग मारताना मोहोळ येथील शिवसैनिक पंडित देशमुख यांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही. दोषींना शिक्षा झाली पाहिजे. चुकीला माफी नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

# दिल्लीत २६२ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर -**

राजधानी दिल्लीतील एनसीआर भागातील एका फॉर्महाऊसवर अमली पदार्थ नियंत्रण विभाग अर्थात् एनसीबीच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात २६२ कोटींचे अमली पदार्ध जप्त केले. या कारवाईत एका खासगी कंपनीच्या विक्री व्यवस्थापकाला अटक करण्यात आली. शेन वारिस असे त्याचे नाव असून तो उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील मंगरौली गावचा रहिवासी आहे. अटकेतील आरोपीचा आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करीत सहभाग असल्याचे समोर आले. आरोपी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करीत सहभागी आहे.






## अंतरंग


२ 'मानवी बॉम्बर' उमर होता 'इसिस'चा कट्टर समर्थक
३ जमिनी युद्धाद्वारेच विजय शक्य
४ कायद्यांचा फायदा होणे महत्त्वाचे! (अग्रलेख)
६ भारतीय महिला विश्वविजेत्या







# प्रलंबित खटले निकाली काढण्याला प्राधान्य

## न्यायमूर्ती सूर्य कांत यांची माहिती • आज घेणार सरन्यायाधीशपदाची शपथ



**नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

देशभरातील न्यायालयात सध्या पाच कोटीहून अधिक खटले प्रलंबित आहे, तर यातील ९० हजार खटले हे सर्वोच्च न्यायालयातील आहेत. प्रलंबित खटले निकाली काढणे आणि वाद सोडवण्यासाठी मध्यस्थीला प्रोत्साहन देणे याला प्राधान्य राहणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्य कांत वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले.

न्या. सूर्य कांत सोमवारी देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणार आहेत. याप्रसंगी भूतान, केनिया, मलेशिया, नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस आणि ब्राझीलसह अनेक देशांचे मुख्य न्यायाधीश उपस्थित राहणार आहेत. न्या. सूर्यकांत पुढे म्हणाले, माझे पहिले प्राधान्य प्रलंबित खटले निकाली काढणे हेच राहणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित कसे राहिले आणि यासाठी कोण जबाबदार आहे, याचा मी शोध घेणार आहे. देशात मध्यस्थीबद्दल जागरूकता झपाट्याने वाढत आहे. अलिकडेच, भारतातील मोठ्या खासगी कंपन्या, बँका आणि विमा कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ चालणाऱ्या खटल्यापासून वाचण्यासाठी मध्यस्थी प्रशिक्षणाची विनंती केली. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात् एआय न्यायिक संस्थांसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते, परंतु त्याचे धोके समजून घेतल्यानंतरच त्याचा वापर वाढवला पाहिजे. न्यायव्यवस्था अधिक पारदर्शक, जलद आणि प्रभावी करण्यासाठी पावले उचलली जातील. जुन्या प्रलंबित प्रकरणाच निपटारा, डिजिटल न्याय व्यवस्था आणि न्यायासनाची कार्यक्षमता हे प्राधान्यांमध्ये असतील. (वृत्तसंस्था)

### कोणतेही सरकारी पद स्वीकारणार नाही : न्या. भूषण गवई



भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई रविवारी पदावरून निवृत्त झाले, याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयात आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, मी भविष्यात कोणतेही सरकारी पद स्वीकारणार नाही. मला आदिवासी समुदासाठी काम करायला आवडेल. वडिलाप्रमाणे राज्यपालांचे पद स्वीकारणार का, यावर ते म्हणाले, मी कोणतेही पद स्वीकारणार नाही, प्रोटोकॉलनुसार, सरन्यायाधीशांचे पद राज्यपालांपेक्षा उच्च आहे. मी देशासाठी जे काही करू शकलो ते सर्व केल्याचे मला समाधान आहे. मी या क्षेत्रात ४० वर्षे काम केले, आता समाजकार्यात योगदान देणार आहे.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### व्हेनेझुएलामध्ये सत्तापालट घडवू शकते अमेरिका

**वॉशिंग्टन डी.सी.** : अमेरिका आणि लॅटिन अमेरिकन देश व्हेनेझुएला यांच्यातील तणाव सातत्याने वाढत आहे. येत्या काही दिवसांत व्हेनेझुएलाविरुद्ध एक नवीन कारवाई सुरू होऊ शकते, असे अमेरिकन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. ट्रम्प प्रशासन व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांच्याविरुद्धही बंड पुकारू शकते, असे वृत्त रॉयटर्सने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिले आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, ही कारवाई गुप्त कारवाईने सुरू होऊ शकते. हे पाऊल कधी उचलले जाईल किंवा ते किती व्यापक असेल हे स्पष्ट नाही, परंतु ट्रम्प प्रशासन ते खूप गांभीर्याने घेत आहे हे स्पष्ट आहे. अलिकडच्या आठवड्यात, अमेरिकन सैन्याने कॅरिबियन प्रदेशात मोठ्या प्रमाणात जहाजे, विमाने आणि सैन्य तैनात केले आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संघर्षाची शक्यता वाढली आहे.

### पुणे पोलिसांकडून मध्यप्रदेशात अवैध शस्त्रास्त्रे अड्डा नष्ट

**पुणे** : मध्यप्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील एका गावातून चालवल्या जाणाऱ्या एका मोठ्या आंतरराज्यीय बेकायदेशीर शस्त्रास्त्र निर्मिती आणि तस्करी रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे, ३६ जणांना ताब्यात घेतले आहे आणि शस्त्रांचा मोठा साठा जप्त केला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गत तीन आठवड्यात महाराष्ट्रातील पुणे शहरापासून सुमारे ५०० किमी अंतरावर असलेल्या मध्य प्रदेशातील उमर्ती गावात अनेक पिस्तूल जप्त करण्यात आल्यानंतर पोलिसांनी कारवाई सुरू केली, असे अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले. मध्य प्रदेश पोलिसांसोबत संयुक्तपणे केलेल्या या कारवाईदरम्यान, बेकायदेशीरपणे शस्त्रे तयार केली जात असलेल्या ५० भट्ट्या नष्ट करण्यात आल्या, असे त्यांनी सांगितले.

### पंजाबी गायक हरमनचा अपघातात मृत्यू

**जालंधर** : पंजाबी गायक हरमन सिद्धू याचे काल रात्री उशिरा एका रस्ते अपघातात निधन झाले. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. त्याची कार एका ट्रकला धडकली आणि त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. हरमन सिद्धू मानसाहून त्याच्या गावी, ख्याला येथे जात होता. अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. मानसा पोलिस घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मृतदेह सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेला आणि कुटुंबाला माहिती दिली. हरमन सिद्धूवर त्याच्या गावी, ख्याला येथे अंत्यसंस्कार केला जाईल.हरमन सिद्धूच्या निधनाने पंजाबी संगीत उद्योगात शोककळा पसरली आहे.

### मुख्यमंत्र्यांनी एका लग्नासाठी बदलले वेळापत्रक

**जामनगर** : गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचा मानवतावादी आणि संवेदनशील दृष्टिकोन अधोरेखित झाला आहे. जामनगरमध्ये त्यांच्या नियोजित सार्वजनिक कार्यक्रमाचे ठिकाण बदलण्यात आले. कारण एका कुटुंबाने तिथे मुलीचे लग्न आयोजित केले होते. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमामुळे सुरक्षा व्यवस्था सुरू होती. त्यामुळे लग्नाच्या तयारीत कुटुंबाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. कुटुंबाने कसेबसे मुख्यमंत्र्यांना त्यांच्या चिंता कळवल्या. मुख्यमंत्री पटेल यांना हे कळताच त्यांनी तातडीने अधिकाऱ्यांना कार्यक्रमाचे ठिकाण बदलण्याचे निर्देश दिले.

### महिलेने ट्रेनमध्ये इलेक्ट्रिक केटलमध्ये बनवले नूडल्स

**मुंबई** : एका महिलेने रेल्वेच्या एसी कोचमध्ये बसून इलेक्ट्रिक केटलमध्ये नूडल्स शिजवल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर, मध्य रेल्वेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधितांवर लवकरच कारवाई केली जाईल. २० नोव्हेंबर रोजी रेकॉर्ड केलेला हा व्हिडिओ पहिल्यांदा सरिता लिंगायत यांच्या इंस्टाग्राम हँडलवर पोस्ट करण्यात आला होता. त्यानंतर हा व्हिडिओ व्हायरल झाला आणि लाखो व्ह्यूज मिळाले.



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२३,५०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५३,००० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.८ | २०.५ |
| अमरावती | ३३.२ | १४.७ |
| भंडारा | ३०.० | १४.० |
| बुलडाणा | ३२.० | १७.९ |
| चंद्रपूर | ३२.० | १५.६ |
| गडचिरोली | ३१.४ | १३.६ |
| गोंदिया | २९.८ | १२.८ |
| नागपूर | ३१.० | १४.३ |
| वर्धा | ३१.१ | १४.५ |
| वाशीम | ३३.० | १२.२ |
| यवतमाळ | ३१.४ | १५.६ |

# 'मानवी बॉम्बर' उमर होता 'इसिस'चा कट्टर समर्थक

## स्फोटापूर्वीच दहशतवाद्यांमध्ये होते टोकाचे मतभेद






◆ **नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोटापासून तपास यंत्रणा काम करत आहेत आणि काळाबरोबर अनेक खुलासे समोर येत आहेत. दरम्यान, दिल्ली बॉम्बस्फोटातील संशयित उमर उल-नबी आणि त्याच्या सहकाऱ्यांमध्ये मतभेद असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. कट्टरपंथी विचारांमधील फरकांमुळे उमर उल-नबीने त्याच्या सहकाऱ्यांपासून स्वतःला दूर केले होते.

एका वृत्तानुसार उमरचे त्याच्या सहकाऱ्यांशी विचारसरणी, कामाच्या पद्धती आणि आर्थिक बाबींवरून मतभेद होते. या संघर्षामुळे त्याने सहकारी आरोपी आदिल अहमद राथेरच्या लग्नाला उपस्थित राहण्यास नकार दिला. तपासकर्त्यांच्या मते, हरयाणातील फरिदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठाशी संबंधित काश्मिरी डॉक्टर उमर उल-नबी इस्लामिक स्टेट (आयसिस) च्या विचारसरणीवर विश्वास ठेवत होता. याउलट, या दहशतवादी गटाचे इतर सदस्य अन्सार गजवत-उल-हिंद सारख्या अल-कायदा समर्थित गटांशी संबंधित होते.

### हिशेब मागितल्यावर उमर संतापला

वैचारिक मतभेदांव्यतिरिक्त, निधीवरून होणाऱ्या वादांमुळे दहशतवादी मॉड्यूलमधील दरी आणखी वाढली. गटाने स्फोटके आणि इतर रसद यासाठी एकूण सुमारे २.६ दशलक्ष रुपये गोळा केले होते. अहवालांनुसार, खर्चाचा संपूर्ण आणि तपशीलवार हिशेब मागितल्यावर उमर संतापला. हा वाद केवळ पैशापुरता मर्यादित नव्हता, तर हल्ल्याच्या पद्धतीबद्दल वादविवाद देखील झाला. उमरने मोठ्या आणि अधिक नाट्यमय हल्ल्याचा आग्रह धरला.

विचारसरणीतही फरक होते. जरी दोन्ही दहशतवादी संघटना सलाफीवाद आणि हिंसक जिहादमधून उदयास आल्या असल्या तरी, त्यांचे जागतिक दृष्टिकोन पूर्णपणे भिन्न होते.

त्यांचे मुख्य मतभेद सांप्रदायिक हिंसाचाराची पद्धत, प्राधान्यक्रम (जागतिक विरुद्ध प्रादेशिक उद्दिष्टे) आणि खलिफाट स्थापन करण्याचा मार्ग यासारख्या मुद्द्यांवर केंद्रित होते. या वैचारिक फरकामुळे गटात तणाव निर्माण झाला होता. उमरला गटातील सर्वात कट्टरपंथी म्हणून वर्णन केले जाते. या नाराजीमुळे त्याने या वर्षाच्या सुरुवातीला जम्मू आणि काश्मीरमध्ये त्याचा सहकारी आदिलच्या लग्नाला उपस्थित राहण्यास नकार दिला. (वृत्तसंस्था)

# चंदीगडमधील प्रशासकीय रचनेत बदल नाही

## नव्या विधेयकासंदर्भात गृह मंत्रालयाचे स्पष्टीकरण

◆ **नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

चंदीगड केंद्रशासित प्रदेशाचा कारभार संविधानाच्या कलम २४० अंतर्गत अर्थात् राष्ट्रपतींच्या अधिकार क्षेत्रात आणण्यासाठी प्रशासकीय रचनेत बदल करणारे विधेयक केंद्र सरकार हिवाळी अधिवेशनात आणणार असल्याची चर्चा सुरू होती. या निर्णयाला पंजाब सरकारकडून विरोध सुरू होता. यावर केंद्रीय गृहमंत्रालयाने निवेदन जारी करून अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. सर्वांसोबत चर्चा करून आणि सहमतीने निर्णय घेणार असल्याचे नमूद करण्यात आले.



गृहमंत्रालयाच्या निवेदनात म्हटले की, आम्ही चंदीगडसंदर्भात कोणतेही विधेयक आणणार नाही, सध्या सुरू असलेल्या चर्चा निरर्थक आहेत.

केंद्र सरकार सध्या केवळ कायदा बनवण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचा विचार करत आहे. या प्रस्तावावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. चंडीगडच्या राज्यपालांमध्ये आणि त्यांच्या प्रशासकीय रचनेत कोणताही बदल होणार नाही. (वृत्तसंस्था)

### कलम २४० काय आहे?

संविधानाच्या कलम २४० मध्ये विधिमंडळ नसलेल्या अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांच्या शांतता, प्रगती आणि सुशासनासाठी राष्ट्रपती नियम तयार करू शकतात. या यादीमध्ये विधानसभा विसर्जित किंवा स्थगित केलेली असताना पुद्दुचेरीचाही समावेश होतो. चंदीगडचाही या यादीत समावेश झाल्यास, त्यासाठी नियम व कायदे तयार करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना मिळेल. यामुळे चंदीगडला स्वतंत्र प्रशासक मिळेल. सध्या पंजाबच्या राज्यपालांकडे चंदीगड केंद्रशासित प्रदेशाचा अतिरिक्त प्रभार आहे.

### चंदीगड पंजाबचा अविभाज्य भाग : जाखड

पंजाब भाजपाचे अध्यक्ष सुनील जाखड म्हणाले, चंदीगड हा पंजाबचा अविभाज्य भाग आहे. चंदीगडचा मुद्दा असो अथवा पंजाबच्या पाण्याचा, पंजाब भाजपा राज्याच्या हितासाठी खंबीरपणे उभी आहे. चंदीगड संदर्भात जो काही संभ्रम निर्माण झाला आहे, तो सरकारशी बोलून सोडवला जाईल.

# ड्रोनमुळे अवघ्या काही मिनिटांत होणार फवारणी

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा



◆ **गाझियाबाद, २३ नोव्हेंबर**

नवनवीन तंत्रज्ञानाने आता शेतीच्या कामांचे स्वरूपही बदलत आहे. प्रगत शेतकरी नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काम सोपे करत आहे. गाझियाबादमधील शेतकरी उत्पादक संघटनेशी संबंधित शेतकरी आता ड्रोन पायलटना त्यांच्या शेतात युरिया, डीएपी आणि इतर खतांची फवारणी करण्यासाठी ड्रोन वापरण्याचे प्रशिक्षण देण्याची तयारी करत आहेत.

सध्या, बहुतेक शेतकरी रोजंदारी कामगारांना कामावर ठेवतात किंवा स्वतः त्यांच्या शेतावर युरिया आणि डीएपी फवारतात. एका एकर शेतजमिनीवर युरिया फवारणी करण्यासाठी अंदाजे चार ते पाच तास लागतात आणि तरीही संपूर्ण शेतात योग्य युरिया लागू शकत नाही. यामुळे पीक उत्पादकता कमी होते. हे होऊ नये म्हणून, जिल्हा प्रशासनाने एका कंपनीच्या मदतीने ड्रोन वापरून शेतात युरिया फवारणी करण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी शेतकरी उत्पादक संघटना आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये आधीच चर्चा झाली आहे.

असे सांगण्यात आले आहे की ड्रोन वापरून एक एकर शेतजमिनीवर युरिया फवारणी करण्यासाठी फक्त पाच मिनिटे लागतील. जे शेतकरी रोजंदारी कामगारांऐवजी ड्रोन वापरून युरिया फवारणी करण्याचा पर्याय निवडतात त्यांना १००-१५० रुपयांपर्यंत बचत होईल. ड्रोन वापरून शेताच्या सर्व भागात युरिया फवारणी केल्याने पीक उत्पादकता वाढेल आणि शेतकऱ्यांना फायदा होईल. (वृत्तसंस्था)

# एचआयव्हीवरील उपचारात महाराष्ट्र सर्वोत्तम

## उत्तम उपचारासाठी केंद्राकडून कौतुक

◆ **विजयवाडा, २३ नोव्हेंबर**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेद्वारे (नाको) घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील आढाव्यात आधार आणि उपचार सेवा प्रदान करण्यासाठी देशातील सर्वोत्तम राज्य म्हणून महाराष्ट्राला सन्मान मिळाला आहे.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेला (एमसॅक) विजयवाडा येथे आयोजित केलेल्या केंद्रीय समारंभात हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाला. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या काळजी आधार आणि उपचार विभागाच्या प्रमुख डॉ. चिन्मयी दास यांच्या हस्ते तो महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे प्रतिनिधी, आधार आणि उपचार विभागाच्या उपसंचालक डॉ. प्रियांका वाघेला आणि सहायक संचालक प्रदीप सोनवणे यांना प्रदान करण्यात आला.

**अँटी रेट्रोव्हायरलवर भर**

हा सन्मान एचआयव्हीसह जगणाऱ्यासाठी अँटी रेट्रोव्हायरल थेरपी उपचार सेवा पुरवण्यात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीला स्पष्ट करतो. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले. राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे प्रकल्प संचालक सुनील भोकरे, अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. विजय कंदेवाड आणि डॉ. भवानी मुरुगेसन यांनी सांगितले, हा पुरस्कार एचआयव्हीसह जगणाऱ्यांसाठी विनामूल्य आधार पुरवण्याच्या राज्याच्या कटिबद्धता अधोरेखित करतो.

**महाराष्ट्र अव्वलच**

नाकोच्या कामगिरी निर्देशांकानुसार 'ग्रीन झोन'मध्ये सर्वाधिक अँटी-रेट्रोव्हायरल उपचार केंद्रे असल्यामुळे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेने आपले अव्वल स्थान मिळविले आहे. या केंद्रांनी अनेक क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली.




सप्टेंबरच्या अंतिम गुणपत्रिकेत ७५ हून अधिक गुण मिळवलेल्या 'ग्रीन झोन'मधील १६ केंद्रांपैकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड, एएफएमसी पुणे, उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर आणि ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय धाराशिव या सर्वोत्कृष्ट पाच एआरटी केंद्रांचा सत्कार करण्यात आला.काशिबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय पुणे, आणि लोटस मेडिकल फाउंडेशन, कोल्हापूर या खाजगी वैद्यकीय संस्थांमधील दोन एआरटी केंद्रांचा 'ग्रीन झोन'मध्ये राहिल्याबद्दल सत्कार करण्यात आला. (वृत्तसंस्था)

# नकारात्मक गाणी गाणाऱ्या ३२ गायकांना राजदची नोटीस

◆ **पाटणा, २३ नोव्हेंबर**

बिहार निवडणुकीदरम्यान लालू यादव यांच्या पक्षाच्या नेत्यांना लक्ष्य करीत उपहासात्मक गाणी गाणाऱ्या ३२ गायकांना राष्ट्रीय जनता दलाने नोटीस बजावली आहे. गायकांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर पक्ष या गायकांवर कायदेशीर कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाही. पक्षाचे राज्य मुख्य प्रवक्ते शक्तीसिंह यादव यांनी सांगितले की, निवडणुकीपूर्वी राजदला बदनाम करण्यासाठी अनेक गाणी जाणूनबुजून बाजारात आणली गेली. ही गाणी पक्षाची किंवा त्यांच्या नेत्यांची नावे वापरून बनवण्यात आली. यातील बहुतेक गायकांचे भाजपाशी थेट संबंध आहेत. यामुळे केवळ राजदच नाही तर त्यांचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांचीही बदनामी झाली. या गायकांनी सामाजिक न्यायाला बदनाम करण्याचा कट रचला. यादवांबद्दल नकारात्मक गाणी गायली गेली.

निवडणूक प्रचारादरम्यान, पंतप्रधान मोदींनी कैमूर येथील एका सभेत आरजेडीच्या प्रचारात्मक गाण्यांचा उल्लेख केला होता. आणि ते म्हणाले होते की, तुम्ही त्यांची गाणी ऐकली आहेत का? गाण्यातील ओळ अशी आहे... भावाचे सरकार येईल - खंडणीखोर निर्माण होतील. म्हणजे, ते त्यांचे सरकार सत्तेत येण्याची वाट पाहत आहेत जेणेकरून ते खंडणी आणि जंगलराज सुरू करू शकतील.मरब सिक्सर के छे गोली चाटी में. जर ते सत्तेत परतले तर ते पैसे उकळतील. (वृत्तसंस्था)

# नादुरुस्त टँकरवर कार आदळून २ ठार


### तीन गंभीर जखमी

◆ **तळेगाव (श्या. पं.), २३ नोव्हेंबर**

नादुरुस्त टँकरवर भरधाव कार धडकल्याने झालेल्या अपघातात दस्तगरी खान आणि दिलीप पाटील जागीच ठार झाले, तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले. ही घटना शनिवारी रात्री १०.३० च्या सुमारास आष्टी ते तळेगाव (श्या. पं.) या राष्ट्रीय महामार्गावरील गोरक्षणजवळ घडली.



आष्टी येथील दिलीप पाटील लग्न कार्यावरून गावाला परत येत असताना त्यांची कार दस्तगीर खान चालवत होता. या कारमध्ये दिलीप पाटील यांच्या भावाचे कुटुंब होते. शहराच्या हद्दीत येताना गोरक्षणजवळ नादुरुस्त टँकर उभा होता. अंधारात उभा असलेला ट्रक कारचालकाला दिसला नाही आणि भरधाव कार टँकरवर आदळली. यात चालक दस्तगीर खान आणि दिलीप पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. तर मागे बसलेले रागिनी पाटील, विजय पाटील, संगीता पाटील गंभीर जखमी झाले. जखमींना अमरावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातात कारचा चेंदामेंदा झाला. ठाणेदार जोशी यांनी पोलिस बंदोबस्तात अपघातग्रस्त वाहने घटनास्थळावरून हलवून वाहतूक सुरळीत केली. (वृत्तसंस्था)




### उत्तरप्रदेशात भाजपाचा नवा एमवाय फॅक्टर

**बिहारमध्ये** राजदचे सर्वेसर्वा, माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री लालूप्रसाद यादव यांचे संपूर्ण राजकारण एमवाय म्हणजे मुस्लिम यादव या दोन घटकांवर होते. या 'एमवाय' समीकरणाने लालूप्रसाद राजकारणात यशस्वी झाले, बिहारवर त्यांनी अनेक वर्ष राज्य केले. भाजपाने यावेळी काट्याने काटा काढावा तसे लालूप्रसादांच्या 'एमवाय' समीकरणाला आपल्या 'एमवाय' समीकरणाने छेद दिला, पण भाजपाचे 'एमवाय' समीकरण हे मुस्लिम व यादव असे नव्हते, तर ते महिला आणि युवा असे होते. म्हणजे महिलांचा 'एम' आणि युवाचा 'वाय'. महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेप्रमाणे नितीशकुमार सरकारने महिलांच्या बँक खात्यात दहा हजार रुपये जमा केले, तर १ कोटी युवांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे बिहारात भाजपाचा हा नवा 'एमवाय' फॅक्टर जोरात चालला, त्याने लालूप्रसादांच्या जुन्या 'एमवाय' फॅक्टरला धुळ चारली. लालूप्रसादांच्या बिहारप्रमाणे उत्तरप्रदेशातही मुलायमसिंह यादव यांचे राजकारण 'एमवाय' म्हणजे मुस्लिम आणि यादव या दोन घटकांवर अवलंबून होते. २०२७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीत अखिलेश यादव आपल्या पारंपरिक 'एमवाय' घटकासोबत ओबीसींना गोळा करीत आहे. बिहारप्रमाणे या राज्यातही भाजपाने अखिलेश यादव यांच्या 'एमवाय' घटकाला छेद देण्यासाठी नवीन 'एमवाय' फॅक्टर आणण्याचा निर्णय घेतला आहे. बिहारप्रमाणे भाजपाचा हा 'एमवाय' फॅक्टर महिला आणि युवाचा नाही, तर मोदी आणि योगींचा आहे. मोदींचा एम तर योगींचा वाय, उत्तरप्रदेश विधानसभेची निवडणूक भाजपा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वात लढवणार आहे. उत्तरप्रदेशातील भाजपाचा हा नवा 'एमवाय' फॅक्टर अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरेल, यात शंका नाही.

●● ●●

### बिहारमधील काका पुतणे

**काका** पुतण्याचे राजकारण महाराष्ट्रातच नाही बिहारमध्येही चर्चेचा विषय असतो. महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे, शरद पवार अजित पवार आणि गोपीनाथ मुंडे, धनंजय मुंडे या गाजलेल्या काका-पुतण्याच्या जोड्या आहेत. याशिवाय आणखी किमान डझनभर काका-पुतण्याच्या जोड्या महाराष्ट्रात आहे. यातील बाळासाहेब ठाकरे आणि गोपीनाथ मुंडे हे काका आज हयात नसले, तरी राज ठाकरे आणि धनंजय मुंडे हे त्यांचे पुतणे राजकारणात सक्रिय आहेत. महाराष्ट्राप्रमाणे बिहारातही काका पुतण्याची एक जोडी गाजत आहे. महाराष्ट्रात पुतण्याने काकाचा पक्ष फोडला, तर बिहारात काकाने पुतण्याचा पक्ष पळवला. महाराष्ट्रात पुतण्याने काकाचा विश्वासघात केला, तर बिहारात काकाने पुतण्याचा केसाने गळा कापला. पशुपतीनाथ पारस आणि चिराग पासवान हे ते बिहारमधील काका-पुतणे. काका पशुपतीकुमार यांनी आपल्या पुतण्याच्या पक्षातील पाच खासदार पळवत केंद्रात मंत्रिपद मिळवले होते. तेव्हा या काका-पुतण्यात जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले. काका पशुपतीकुमार यांची मजल पुतण्याला म्हणजे चिराग पासवान यांना चांडाळ म्हणण्यापर्यंत गेली होती. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत पुतण्या चिराग पासवान यांच्या पक्षाला उल्लेखनीय यश मिळाले, १९ जागा त्याने जिंकल्या. पुतण्याने काकावर राजकीयदृष्ट्या मातच केली नाही, तर त्यांना त्यांची जागाही दाखवली. त्यामुळे काका पशुपतीकुमार यांना पुतण्याचे अभिनंदन करावे लागले. आपल्या काकाच्या अभिनंदनाचा मी स्वीकार करतो, काकांनी कधीकाळी मला शिव्या दिल्या होत्या, चांडाळ म्हटले होते. पण, त्यांच्या शिव्या मी आशीर्वाद समजतो; कारण ते मोठे आहेत. त्यामुळे त्यांनी केलेले अभिनंदन मी मनापासून स्वीकारतो, असे चिराग पासवान यांनी म्हटले. या संयमी भूमिकेसाठी चिराग पासवान यांचे अभिनंदन करायला पाहिजे.

●● ●●

### अश्विनी वैष्णव यांची अभिनंदनीय कृती

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी स्वच्छ भारत अभियानाचा गेल्या अनेक वर्षांपासून पुरस्कार करीत आहे. स्वच्छ भारत अभियान हे फक्त सरकारी पातळीवर न राहता ते लोकअभियान व्हावे, असा मोदी यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी वेगवेगळ्या व्यासपीठावरून ते याचा आग्रह धरत असतात. केंद्रीय मंत्री आणि नोकरशाहीनेही आपल्या कृतीतून जनतेसमोर याचा आदर्श घालून द्यावा, असे आवाहन ते करीत असतात. अश्विनी वैष्णव हे मोदी यांच्या मंत्रिमंडळातील वजनदार मंत्री आहेत. रेल्वे, माहिती तंत्रज्ञात आणि माहिती आणि प्रसारण या तीन महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. वैष्णव आधी नोकरशाहा होते, नंतर ते राजकारणात आले आणि मंत्री झाले. त्यामुळे त्यांच्यावर दुहेरी जबाबदारी आली. अश्विनी वैष्णव एका कार्यक्रमासाठी राजधानी दिल्लीतील एका पंचतारांकित हॉटेलात गेले. कार्यक्रम संपवून परतत असताना त्यांना जिन्यात कागदाचे काही तुकडे पडलेले दिसले. वैष्णव यांचे त्याकडे लक्ष जाताच ते थांबले आणि वाकून त्यांनी तो कागदाचा कचरा उचलत हॉटेलच्या सफाई कर्मचाऱ्यांना दिला. वैष्णव यांच्या कृतीला उपस्थितांची चांगली दाद मिळाली. न बोलता आपल्या कृतीतून वैष्णव यांनी एक आदर्श घालून दिला. स्वच्छता राखा, असे आवाहन फक्त भाषणातूनच करायचे नाही, तर ते कृतीतही आणायचा, असा धडा त्यांनी सगळ्यांना दिला.

●● ●●

### मंत्रालयाचा स्तुत्य निर्णय

**केंद्र** सरकारमधील सचिव तसेच अन्य अधिकाऱ्यांना आदरातिथ्य भत्ता मिळत असतो. मंत्रालयात येणाऱ्या पाहुण्यांच्या चहा-पानासाठी हा खर्च त्यांना मिळत असतो. आतापर्यंत या खर्चावर कोणतीही मर्यादा नव्हती. संयुक्त सचिव, अतिरिक्त सचिव आणि सचिव दर्जाचे वरिष्ठ अधिकारी यांना खर्चाची पूर्ण मोकळीक होती, त्यावर कोणतेही बंधन नव्हते. आता मात्र पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यपालन मंत्रालयाने आपल्या मंत्रालयातील सचिव श्रेणीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या खर्चावर निर्बंध आणले आहेत. संयुक्त सचिव आणि अतिरिक्त सचिव श्रेणीच्या अधिकाऱ्यांसाठी खर्चाची मर्यादा १२ हजारापर्यंत निश्चित केली. त्यामुळे या मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांत नाराजी पसरली आहे. आपल्याकडे येणाऱ्या पाहण्यांचे चहा-पान कसे करावे, असा प्रश्न त्यांना पडला आहे. आपण काय प्यावे आणि समोरच्याला काय आणि किती पाजावे, अशी चिंता त्यांना भेडसावत असावी. खरं म्हणजे, हा अतिशय चांगला निर्णय म्हटला पाहिजे. अन्य सर्व मंत्रालयांनीही आपल्याकडे हा निर्णय लागू केला पाहिजे.

● **दिल्लीवाला**

# पंकजा मुंडेंच्या 'पीए'च्या पत्नीची आत्महत्या

### कुटुंबाकडून छळाचा आरोप | सीबीआय चौकशीची मागणी

◆ **मुंबई, २३ नोव्हेंबर**

महाराष्ट्राच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीने घरगुती वादातून मध्य मुंबईतील त्यांच्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.



राज्याचे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नी गौरी पालवे यांचा मृतदेह शनिवारी सायंकाळी वरळी परिसरातील त्यांच्या राहत्या घरी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

या जोडप्याने या वर्षी फेब्रुवारीमध्ये लग्न केले होते व पालवे ही नागरी संचालित केईएम रुग्णालयातील दंत विभागात डॉक्टर होती. अनंत गर्जे यांनी आमची मुलगी गौरी पालवे यांच्यावर अत्याचार केले व तिला त्रास दिला. त्यामुळेच तिने हे टोकाचे पाऊल उचलले, असा आरोप पालवे यांच्या कुटुंबाने केला आहे. गृह विभागाने गौरीच्या मृत्यूची सखोल चौकशी करावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, घरगुती वादातून ही आत्महत्या झाल्याचा संशय आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले, तसेच अपघाती मृत्यूचा अहवाल दाखल करण्यात आला आहे आणि चौकशी सुरू आहे. दरम्यान, संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच यावर बोलेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**पंकजा मुंडेंच्या पीएवर गुन्हा दाखल**

गौरी पालवे गर्जे यांच्या शनिवारी संध्याकाळी आत्महत्या ( ) केल्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी पाठवला होता. मात्र, पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्यामुळे गौरी पालवे गर्जे यांचे कुटुंबीय आक्रमक झाले होते. अखेर रविवारी वरळी पोलिसांनी याप्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. (वृत्तसंस्था)

### चौकशी सीबीआय मार्फत व्हावी

ही आत्महत्या नसून हत्या आहे. एका कुटुंबाने मिळवून आमच्या गौरीची केलेली हत्या आहे. या प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी व्हावी आणि आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी गौरी पालवेंचे मामा हृषिकेश गर्जे यांनी केली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# जमिनी युद्धाद्वारेच विजय शक्य

## ● लेफ्टनंट जनरल कटियार यांचे प्रतिपादन ● पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी लष्कराचा युद्ध सराव

◆ **हरिद्वार, २३ नोव्हेंबर**

पाकिस्तानने यापुढे कोणतीही चूक केल्यास भयंकर त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल. कोणतेही युद्ध हे जमिनीवरील लष्करी कारवाई करूनच जिंकले जाऊ शकते. त्यामुळे पाकिस्तानात घुसून करण्यात येईल. लष्कराचा युद्ध सराव या कारवाईचाच एक भाग असल्याचा इशारा भारतीय लष्कराचे लेफ्टनंट जनरल मनोज कटियार यांनी दिला आहे.






हरिद्वारजवळील झिलमिल तलावाजवळील दुधाला दयालवाला भागात मागील चार आठवड्यापासून सुरू असलेल्या राम प्रहार युद्धसरावाच्या अखेरच्या दिवशी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना लष्कराच्या पश्चिम कमांडचे कमांडर लेफ्टनंट जनरल कटियार म्हणाले, पाकिस्तानच्या कोणत्याही आक्रमणाच्या बाबतीत लष्कर ऑपरेशन सिंदूरपेक्षा मोठ्या कारवाईसाठी सज्ज आहे. या सरावात सीमापार कब्जा, नदी ओलांडणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश होता. युद्धात तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर कसा करता येईल यावर लष्कराचे प्राधान्य आहे आणि या सरावात आम्ही अनेक प्रात्यक्षिक केली.

### एआयचा वापर वाढवला जाईल

जनरल कटियार म्हणाले की एआयचा वापर पाळत ठेवणे आणि निर्णय घेण्यासारख्या क्षेत्रात केला जात आहे आणि भविष्यात याची व्याप्ती आणखी वाढवला जाईल. सैन्य सायबर, रासायनिक, अणु आणि जैविक यासारख्या सर्व प्रकारच्या युद्धांसाठी तयार आहे. युद्धात वापरण्यात येणारी बहुतांश उपकरणे स्वदेशी आहे आणि ड्रोन देखील सैन्याच्या स्वतःच्या कार्यशाळांमध्ये तयार केले जातात. ■

**आधुनिक युद्धात प्रशिक्षण महत्त्वाचे**

आधुनिक युद्धात तंत्रज्ञानाची मोठी भूमिका असते, परंतु प्रशिक्षण हे सर्वात महत्त्वाचे आहे. अनेक भागात युद्धे लढली जातील, परंतु १९६५ चे युद्ध असो किंवा १९७१ चे युद्ध असो, विजय केवळ जमिनीवरील युद्धाद्वारेच मिळवता येईल. जोपर्यंत आम्ही त्यांचा प्रदेश काबीज करत नाही तोपर्यंत पाकिस्तान आमचा विजय स्वीकारणार नाही. आम्ही प्रत्येक प्रकारच्या युद्धाची तयारी करत आहोत, परंतु अंतिम विजय जमीन काबीज करून निश्चित केला जातो. ◀(वृत्तसंस्था)

### शत्रूचा प्रदेश काबीज करण्याचा सराव

भारताविरोधात शत्रू पुन्हा कुरघोडी करू शकते, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे आणि त्यामुळेच लष्कराचा विविध भागात युद्ध सराव सुरू आहे. आम्ही नद्या ओलांडून शत्रूचा प्रदेश काबीज करण्याचा सराव केला आहे, कारण पाकिस्तानविरुद्धच्या जमिनीवरील कारवाईत सैन्याला चिनाब, रावी आणि सतलज यासारख्या नद्या पार कराव्या लागतील. पाकिस्तानी हद्दीत घुसून सामरिक स्थाने काबीज करणे हा यामागील उद्देश आहे. ■

# तालिबान पाकिस्तानला धडा शिकवण्याच्या तयारीत

## भारतासोबत वाढवणार मसाल्याचा व्यापार

◆ **नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

पाकिस्तानसोबत संबंध कटू झाले असतानाच आता अफगाणिस्तान पाकिस्तानी सरकारला धडा शिकवण्यासाठी भारतासोबत नव्या व्यापारी संबंधांचा अध्याय सुरू करण्याच्या तयारीत आहे.

अफगाणिस्तानचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री अल-हज नूरुद्दीन अजिजी सध्या पाच दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. या भेटीत त्यांनी भारतीय मसाले मंडळाच्या सदस्यांशी भेट घेतली आणि मसाल्यांचा व्यापार वाढवणे, निर्यात वाढवणे आणि संयुक्त गुंतवणूक यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली.

अफगाणिस्तान मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर सांगितले की, भारताने अफगाणिस्तानात मसाले उत्पादन कारखाने उभारण्यात आणि व्यापाराला चालना देण्यात रस दर्शविला आहे. बैठकीत दोन्ही देशांनी औषध आयात, मसाल्यांची गुणवत्ता सुधारणे, गुंतवणुकीच्या संधी आणि औषध व्यापारातील आव्हानांशी संबंधित मुद्द्यांवरही चर्चा केली. अफगाणिस्तान मंत्रालयाच्या मते, अजिजी यांनी अफगाणिस्तानात काम करू इच्छिणाऱ्या कोणत्याही भारतीय औषध कंपन्यांना पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. भारताच्या मसाले क्षेत्रातील प्रतिनिधींनी सांगितले की, त्यांच्या परिषदेत सुमारे ५७ मानक आणि जागतिक दर्जाचे कारखाने सदस्य आहेत.

बैठकीत असाही निर्णय घेण्यात आला की, अफगाणिस्तान मसाले क्षेत्रातील अधिकारी भारतातील प्रगत कारखान्यांना भेट देतील. यानंतर एक भारतीय शिष्टमंडळ काबुलला भेट देईल, जेणेकरून ते औषध उत्पादन युनिट्स स्थापन करण्याच्या आणि निर्यात वाढवण्याच्या शक्यतांचा आढावा घेतील.

**भारतीय मंत्र्यांसोबत बैठक**

ही बैठक अजिजी यांच्या उच्चस्तरीय भारत भेटीचा एक भाग आहे, ज्यात अनेक महत्त्वाच्या बैठका समाविष्ट आहेत. यापूर्वी अफगाणिस्तानच्या मंत्र्यांनी केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री जितीन प्रसाद यांची भेट घेतली. दोघांनी व्यापार आणि आर्थिक सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा केली. ◀(वृत्तसंस्था)

### अफगाणिस्तानची पाकिस्तानपासून फारकत

अजिजी यांनी भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यातही भाग घेतला. त्यांनी व्यापार मेळ्याच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि भविष्यातील प्रदर्शनांमध्ये अफगाणच्या सहभागाबद्दल चर्चा केली. मंत्र्यांनी मेळ्यात अफगाण उत्पादनांचे प्रदर्शन करणाऱ्या स्टॉल्सनाही भेट दिली आणि भारतीय व्यापाऱ्यांशी बाजार विस्ताराबद्दल चर्चा केली. पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेवर अलिकडच्या तणाव तसेच वाढत्या व्यापार अडथळ्यांनंतर अफगाणिस्तान भारत, इराण आणि मध्य आशियाशी व्यापार वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. अफगाण मंत्रालयाने म्हटले आहे की, ते पाकिस्तानने वारंवार लादलेल्या निर्बंधांपासून वाचण्यासाठी, सुरळीत व्यापार सुनिश्चित करण्यासाठी आणि वाढत्या दबावापासून वाचण्यासाठी इराणच्या चाबहार बंदराचा वापर करीत आहेत. ■

# उत्तरेकडे कडाक्याची थंडी; दक्षिणेत मुसळधार

◆ **नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

उत्तर भारतातील वाढत्या थंडीमुळे तेथील राज्ये गारठली असताना, हवामान खात्याने दक्षिणेकडील चार राज्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. दक्षिण अंदमान समुद्र आणि मलाक्का सामुद्रधुनीजवळ कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे, जे वेगाने विकसित होत आहे. २४ नोव्हेंबर रोजी ते बंगालच्या उपसागरात जाण्याची अपेक्षा आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिमेकडे सरकताना हे कमी दाबाचे क्षेत्र अधिक तीव्र होऊ शकते. यामुळे बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाची स्थिती निर्माण होईल आणि अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याने वादळाचा अलर्ट जारी केला आहे, यात असे म्हटले आहे की, दक्षिण अंदमान समुद्र आणि मलाक्का सामुद्रधुनीजवळ कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. २४ नोव्हेंबरपर्यंत बंगालच्या उपसागरात ते आणखी मजबूत होऊ शकते.

**चार राज्यांसाठी पावसाचा अंदाज**

हवामान खात्याने २५ नोव्हेंबर दरम्यान तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश आणि अंदमान आणि निकोबार बेटांच्या किनारी भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. आगामी दोन दिवस या भागात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात मुसळधार पावसासोबत गडगडाटी वादळे आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. ◀(वृत्तसंस्था)

# युरोपात हमासने रचला हल्ल्याचा कट

## मोसादचा दावा, आत्मघाती स्फोट घडविण्याची योजना

◆ **तेल अवीव, २३ नोव्हेंबर**

गाझा पट्टीत सक्रिय असलेली दहशतवादी हमास संघटना युरोपियन देशात मोठ्या हल्ल्याचा कट रचत आहे. विविध शहरांत आत्मघाती बॉम्बस्फोट घडविण्याची योजना त्यांनी आखली असल्याचा दावा इस्रायली गुप्तचर संस्था मोसादने केला आहे.

सुरक्षा दलांनी मोहम्मद नईम नावाच्या संशयिताची चौकशी केली असता, त्याने ही माहिती दिली. नईम हा हमासचा उच्च ब्युरो अधिकारी बसेम नईमचा मुलगा आहे, जो गाझामधील हमासचा सर्वोच्च नेता खलील अल-हय्याचा जवळचा आहे. मोसादने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, हमास स्लीपर सेलद्वारे दहशतवादी नेटवर्क विकसित करीत आहे. युरोपियन सुरक्षा संस्थांच्या सहकार्याने दहशतवादी नेटवर्क उद्ध्वस्त करण्यात आले आणि शस्त्रे जप्त करण्यात आली. याशिवाय काही संशयितांना अटक करण्यात आली आहे आणि हल्ले रोखण्यात यश आले. हमास दहशतवादी नेटवर्क युरोपमधील ज्यू समुदाय आणि इस्रायली नागरिकांविरुद्ध हल्ल्यांचा कट रचत आहे. जर्मनी आणि ऑस्ट्रियासारख्या देशांमध्ये मोसादने स्थानिक सुरक्षा संस्थांसोबत समन्वयित कारवाई करीत अनेक संशयितांना ताब्यात घेतले. ◀(वृत्तसंस्था)

### हमासला जर्मनीतील धार्मिक संघटनांकडून निधी


मोसादचा आरोप आहे की, हमास नेतृत्व युरोपमध्ये दहशतवादी नेटवर्क स्थापित करण्यास देखील मदत करीत आहे. तुर्कीमध्ये हमासचा अड्डा आहे. जर्मनीने अलिकडेच हमासचा कार्यकर्ता बुरहान अल-खतिबला अटक केली. तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, तो जर्मनीत येण्यापूर्वी तुर्कीमध्ये सक्रिय होता. जर्मनीतील संस्था आणि धार्मिक संघटना हमाससाठी निधी उभारत असल्याचे तपासात समोर आले. ■



## चित्रपट वार्ता

### कार्तिकने वाढदिवसाला घेतले सिद्धिविनायकाचे दर्शन

**मुंबई** : अभिनेता कार्तिक आर्यनने ३५ व्या वाढदिवसाला मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतले. दर्शन घेतल्यानंतर कार्तिकने चाहत्यांसोबत फोटो काढले. त्याच्या स्वागतासाठी आलेल्यांकडून पुष्पगुच्छ स्वीकारले. यावेळी उपस्थित पापाराझी आणि चाहत्यांनी कार्तिकला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्याने सर्वांचे आभार मानले. कार्तिकचे खरे नाव कार्तिक तिवारी आहे. त्याचा जन्म २२ नोव्हेंबर १९९० रोजी मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे झाला. अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना तो चित्रपटांकडे वळला. २०११ मध्ये लव रंजनच्या 'प्यार का पंचनामा' या चित्रपटातून त्याने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. ■




### इफ्फीमध्ये होणार '१९४२ : अ लव्ह स्टोरी'चे स्पेशल स्क्रीनिंग




**मुंबई** : शुक्रवारी ५६ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) बॉलिवूडचा प्रतिष्ठित चित्रपट '१९४२: अ लव्ह स्टोरी' प्रदर्शित करण्यात आला. इफ्फीमध्ये विशेष प्रदर्शनासाठी हा चित्रपट ८ मध्ये पुनर्संचयित करण्यात आला आहे. त्याचा साउंडट्रॅक ५.१ साउंडमध्ये एका बारकाईने केलेल्या प्रक्रियेचा वापर करून रीमास्टर करण्यात आला आहे, जो अंशतः इटलीच्या बोलोन्या येथील लइमॅजिन रिट्रोवाटा येथे केला गेला आहे. या खास प्रसंगी चित्रपटातील कलाकार जॅकी श्रॉफ आणि अनुपम खेर उपस्थित होते. दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा, लेखिका कामना चंद्रा आणि निर्मिति देखील उपस्थित होते. त्या सर्वांनी चित्रपटाच्या आठवणी शेअर केल्या. ■

### ऐतिहासिक चित्रपटाची जोरदार कमाई

**मुंबई** : फरहान अख्तर यांच्या '१२० बहादुर' या ऐतिहासिक चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. या चित्रपटासोबतच कॉमेडी एंटरटेनर 'मस्ती ४' चित्रपटही प्रदर्शित झाला आहे. देशाला अभिमान वाटेल अशी कथा सांगणारा '१२० बहादुर' हा चित्रपट बिग बजेटमध्ये बनवला आहे. प्रदर्शनापूर्वी झालेल्या 'पेड प्रीमियर'मधून सुमारे १० लाखांची कमाई झाली. त्यानंतर चित्रपटाने 'ओपनिंग डे'वर भारतात २.३५ कोटींची कमाई केली आहे. अशा प्रकारे पहिल्या दिवसापर्यंतचे एकूण कलेक्शन २.४५ कोटींच्या आसपास पोहोचले आहे. रिपोर्ट्सनुसार चित्रपटाचे बजेट साधारण ८० कोटी इतके आहे. ■




# बांगलादेश सीमेलगत ६६ टक्के वाढले मतदार

## निवडणूक आयोगाच्या आकडेवारीतील माहिती

◆ **कोलकाता, २३ नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमध्ये बांगलादेश सीमेला लागून असलेल्या नऊ जिल्ह्यांमधील नोंदणीकृत मतदारांच्या संख्येत वाढ झाल्याचे निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवरून समोर आले. २००२ मध्ये राज्यात एकूण ४.१५ कोटी मतदार होते, ही संख्या आता ७.६३ कोटी झाली आहे. मतदारांच्या संख्येत तब्बल ६६ टक्के वाढ नोंदवण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, पश्चिम बंगालमधील उत्तर दिनाजपूर, मालदा, मुर्शिदाबाद, उत्तर २४ परगणा, दक्षिण २४ परगणा, जलपाईगुडी, कूचबिहार, नादिया आणि दक्षिण दिनाजपूर या बांगलादेश सीमेला लागून असलेल्या जिल्ह्यांमध्ये मतदारांची संख्या लक्षणीय वाढली आहे. भाजपा नेते राहुल सिन्हा यांनी या वाढीसाठी थेट बांगलादेशातून होणाऱ्या मुस्लिम घुसखोरीला जबाबदार धरले.

तृणमूल काँग्रेस मतपेढीच्या राजकारणातून घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आणि त्यामुळे हे जिल्हे पूर्णपणे मुस्लिमबहुल होण्याची भीती असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रत्युत्तर देताना तृणमूल काँग्रेसचे



प्रवक्ते अरूप चक्रवर्ती यांनी हा आरोप निराधार ठरवला. त्यांनी म्हटले की, बांगलादेशात हिंदू लोकसंख्या ८ टक्क्यांनी कमी झाली आहे, याचा अर्थ तेथील हिंदू निर्वासित मोठ्या संख्येने बंगालमध्ये आले आणि त्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे. भाजपावर सांप्रदायिक राजकारण करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. याशिवाय माकपचे प्रदेशाध्यक्ष मोहम्मद सलीम यांनी घुसखोरीचा मुद्दा मान्य केला आणि म्हटले की, सीमा सुरक्षा दलाने सीमावर्ती भागातील पाळत अधिक कडक करायला हवी होती. ◀(वृत्तसंस्था)

# ३७ वर्षांपासून बेपत्ता मुलगा एसआयआरमुळे सापडला

### बंगालमध्ये घडला चमत्कार

◆ **कोलकाता, २३ नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमधील पुरुलिया जिल्ह्यात एसआयआर दरम्यान एक आश्चर्यकारक घटना घडली. मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेने (एसआयआर) जवळजवळ चार दशकांपासून विभक्त असलेल्या कुटुंबाला पुन्हा एकत्र आणले.

चक्रवर्ती कुटुंबाने त्यांचा मोठा मुलगा विवेक १९८८ मध्ये गमावला. विवेक घराबाहेर पडल्यानंतर त्याचा कुठेही पत्ता लागला नाही. वर्षानुवर्षे शोध सुरू राहिला, परंतु कोणताही सुगावा लागला नाही. त्यांना तो पुन्हा कधी भेटेल, अशी आशा नव्हती. तथापि, एसआयआर मोहिमेने त्यांना बंद वाटणारा दरवाजा उघडला.

विवेकच्या धाकट्या भावाचे नाव प्रदीप चक्रवर्ती आहे. तो त्याच भागात बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) आहे. एसआयआर दरम्यान प्रत्येक फॉर्मवर त्याचे नाव आणि मोबाईल नंबर छापलेला होता. कोलकात्यात राहणाऱ्या विवेकच्या मुलाला त्याच्या काकांबद्दल काहीही माहिती नव्हते. त्याने कागदपत्रांसाठी मदत मागण्यासाठी प्रदीपला फोन केला. सुरुवातीला कागदपत्रांवर चर्चा केंद्रित झाली, परंतु हळूहळू कुटुंबातील संबंध निर्माण होऊ लागले. प्रदीपने स्पष्ट केले, माझा मोठा भाऊ शेवटचा १९८८ मध्ये घरी आला होता. तेव्हापासून तो बेपत्ता आहे. आम्ही सर्वत्र शोध घेतला, पण त्याने सर्व संबंध तोडले. जेव्हा या मुलाची उत्तरे आमच्या कुटुंबाबद्दल फक्त आम्हाला माहिती असलेल्या गोष्टींशी जुळू लागली, तेव्हा मला कळले की, मी माझ्या भावाशी बोलत आहे.

**आनंदाने भारावले कुटुंब**

३७ वर्षांपासून बेपत्ता असलेल्या चक्रवर्ती कुटुंबातील मोठा मुलगा सापडला. दोन्ही बाजूंनी आनंदाची लाट उसळली. यानंतर, प्रदीप स्वतः विवेकशी बोलला. ३७ वर्षांच्या शांततेनंतर दोन्ही भावांचे आवाज एकमेकांपर्यंत पोहोचले. ◀(वृत्तसंस्था)

### कार दरीत कोसळली; तिघांचा मृत्यू

**नैनीताल** : अल्मोडाहून हल्द्वानीला जाणारी कार कैंची धामजवळ अनियंत्रित होऊन दरीत कोसळली. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. खैरना पोलिस ठाण्याचे निरीक्षक राजेश जोशी यांनी सांगितले की, अल्मोडा येथून पाच नागरिक कारने हल्द्वानी येथे जात होते. शनिवारी रात्री कैंची धामजवळील वळणावर रतीघाट भागात चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार ६० मीटर दरीत कोसळली. अपघात इतका भीषण होता की, कारचा चक्काचूर झाला. ■




राजधानी नवी दिल्लीत ४४वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा सुरू आहे. या मेळाव्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# भारत-आस्ट्रेलिया संबंध बळकट करणार

## पंतप्रधान मोदी, अल्बानीज यांच्यात बैठक ● विविध मुद्यांवर चर्चा

◆ **जोहान्सबर्ग, २३ नोव्हेंबर**

जी-२० शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी जोहान्सबर्ग येथे पोहोचलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. ही भेट शिखर परिषदेच्या निमित्ताने झालेल्या द्विपक्षीय बैठकीचा भाग होती, ज्यात दोन्ही नेत्यांनी भारत-ऑस्ट्रेलिया संबंध अधिक मजबूत करण्यावर सविस्तर चर्चा केली.

बैठकीत संरक्षण सहकार्य, व्यापार संबंधांचा विस्तार, शिक्षण क्षेत्रातील भागीदारी आणि स्वच्छ ऊर्जेमध्ये संयुक्त गुंतवणूक यासारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, जोहान्सबर्ग येथे ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांची भेट घेतली आणि द्विपक्षीय तसेच परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली. आम्ही संरक्षण आणि सुरक्षा, महत्त्वाची खनिजे, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण आणि लोकांमधील संपर्क यासह विविध क्षेत्रातील सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला.



परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, व्यापक धोरणात्मक भागीदारीला पाच वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या बळकटीकरण आणि विस्ताराबद्दल समाधान व्यक्त केले. भारत आणि ऑस्ट्रेलियाने अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवले आहे आणि ते आणखी पुढे नेण्याच्या मार्गांवर यावेळी चर्चा झाली. ◀(वृत्तसंस्था)

### दहशतवादाविरोधात एकत्र लढणार

दोन्ही नेत्यांनी जागतिक दहशतवादाविरोधात एकत्र लढणे, त्यासाठी माहितीची देवाणघेवाण करण्यावरही सहमती दर्शविली. अल्बानीज यांनी दिल्लीतील अलिकडच्या दहशतवादी हल्ल्यात आणि सौदी अरब येथील एअर शोमध्ये भारतीय वायुदलाच्या विमान अपघातावर शोक व्यक्त केला. ■

### आर्थिक भागीदारी मजबूत करणार : अल्बानीज

अल्बानीज म्हणाले, भारतासोबत आमचे संबंध खोलवर आहेत आणि आर्थिक भागीदारी आणखी मजबूत करण्यावर आमचा भर आहे. संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ऑस्ट्रेलिया आणि भारत हे जवळचे मित्र आणि भागीदार आहेत आणि व्यापारापासून संरक्षण, सुरक्षा, शिक्षण आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या संबंधांमध्ये हे संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत. ■

### मिझोरममध्ये ४.७९ कोटींचे मादक पदार्थ जप्त

◆ **ऐझवाल, २३ नोव्हेंबर**

मिझोरममध्ये, सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफ आणि राज्य अमली पदार्थविरोधी पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत ४.७९ कोटी रुपयांचे मादक पदार्थ जप्त करण्यात आले. या कारवाईत म्यानमारच्या दोन नागरिकांसह चार जणांना अटक करण्यात आली.

बीएसफच्या अधिकाऱ्याने सांगितले की, शनिवारी रात्री गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने सैलोंग-ऐझवाल महामार्गावर एक संशयास्पद वाहन थांबवले आणि वाहनातील लोकांची चौकशी केली असता, त्यांनी अमली पदार्थ घेण्यासाठी जात असल्याचे सांगितले.

त्यानंतर पथकाने संशयितांचा चांदमारी पश्चिम भागातील एका घरावर छापा टाकला असता, ५.८९ किलोग्रॅम वजनाचे मेथॅम्फेटामाईनचे सहा पॅकेट आणि ४१ ग्रॅम हेरॉईन सापडले. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# कायद्यांचा फायदा होणे महत्त्वाचे!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातील सरकार धडाकेबाज आणि दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेत असल्याचे सर्वांनी पाहिले आहे. २०१६ मध्ये घेतलेला नोटबंदीचा निर्णय, २०१७ मधील जीएसटी, २०१९ मधील कलम ३७० निष्प्रभ करणे हे ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर मोदी सरकारने आता चार नव्या कामगार संहिता लागू केल्या आहेत. भारताचाच नव्हे तर जगाचा इतिहास पाहता कामगारांच्या नशिबी फारसे चांगले दिवस कधी आलेले नाहीत. शोषणासाठी उपलब्ध असलेले हक्काचे घटक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. शासन अथवा शासनाच्या अधिनस्थ असलेले शासकीय, निमशासकीय कर्मचारी अथवा कामगार आणि खाजगी असंघटित क्षेत्रातील कामगारांची दैनावस्था अजूनही संपलेली नाही. श्रीमंत आणि गरीब यांच्यात जेवढी मोठी दरी आहे, तेवढीच शासकीय कर्मचारी आणि खासगी-असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या वेतनातही आढळून येते.

खाजगी-असंघटित क्षेत्रातील कामगारांना कोणत्याही प्रकारचे सामाजिक अथवा आर्थिक कवच लाभलेले नसते. बोटावर मोजण्याइतक्या खाजगी संस्थांमध्ये काही कामगारांना चांगले फायदे मिळतही असतील; पण सामाजिक लाभापासून वंचित असलेल्यांची संख्या प्रचंड आहे. केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या चारही कामगार संहिता आता कायदा बनल्या आहेत आणि त्या तत्काळ प्रभावाने लागूही झाल्या आहेत. देशात यापूर्वीही अनेक कामगार कायदे तयार करण्यात आले. यापूर्वीचे कायदेही कामगारांच्या हिताचेच होते; पण नेहमी प्रश्न येतो तो या कायद्यांची अंमलबजावणी करणारी शासकीय यंत्रणा किती इमानदार आणि सक्षम आहे याचा. दुर्दैवाने असेच म्हणावे लागते की, देशाला भ्रष्टाचाराची मोठी कीड लागलेली आहे. ती वाळवीसारखी देशाला पोखरत आहे. कायदे कितीही चांगले तयार करा, सरकारी यंत्रणाच जर भ्रष्ट असेल, तर कायद्यांचे फायदे अपेक्षित घटकांपर्यंत किंवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतच नाहीत. देशातील जुने कामगार कायदे १९३० ते १९५० या काळात तयार करण्यात आले होते. वर्तमान परिस्थितीत ते मुळीच सुसंगत नव्हते. असे जुने २९ कायदे अत्यंत गुंतागुंतीचे आणि नियोक्त्यांसाठी पळवाट शोधता येईल, असे पूरक होते. केंद्र सरकारने हे सर्व जुने कायदे बाजूला केल्याने श्रम आणि मोबदल्याची रचना आता पूर्णपणे बदलणार आहे. आत्मनिर्भर भारताचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणजे या चार कामगार संहिता आहेत. या चार संहितांमधून वेतन संबंधित नियम, कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील संबंध, कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना, कामाच्या ठिकाणची सुरक्षा आणि आरोग्याच्या अटी स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. वेतन संहितेला संसदेत २०१९ मध्येच पारित केले गेले होते. नवीन कायदे असंघटित क्षेत्रातील कामगार आणि महिलांसाठी वेतन, आरोग्यविषयक सुविधा आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणारे असल्याचे केंद्रीय कामगार मंत्रालयाने म्हटले आहे. महिलांना रात्रपाळीत काम करण्याची मुभा मिळणार आहे, जी पूर्वी अनेक क्षेत्रांमध्ये नव्हती. तथापि, यासाठी कंपनीला सुरक्षा उपाययोजना कराव्या लागणार आहेत. कामगारांच्या आरोग्याकडेही लक्ष देण्यात आले आहे. ४० वर्षांवरील सर्व कामगारांची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी अनिवार्य केली गेली आहे.

औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यायसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थिती संहिता या तीन संहितांना २०२० मध्ये संसदेची मान्यता मिळाली होती. हे सारे नवे श्रम कायदे कामगारांच्या हिताचे असल्याचे दिसत आहे. कामगार आणि उद्योजक यांच्यातील संबंध नव्या श्रम कायद्याने सुलभ केले आहेत. विशेष म्हणजे, आता कामगारांच्या योगदानाची दखल घ्यावीच लागणार आहे. वेतनातील असमानता दूर होण्यास देखील मदत होईल. अर्थात्, स्थायी आणि अस्थायी कामगारांच्या वेतनातील तफावत कमी होईल काय, हा प्रश्न आहेच. कामगारांना कामाच्या ठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्याच लागणार आहेत. सोबतच सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभही मिळण्याची तरतूद आहे. उद्योजक आणि कामगार यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यात आल्याने स्थायी, अस्थायी कर्मचाऱ्यांच्या लाभांची व्याख्या निश्चित करण्यात आली आहे. नवीन कामगार संहिता लागू झाल्याने ग्रॅच्युईटीचा मुद्दा अधिक सुटसुटीत आणि कामगारांच्या हिताचा झाला आहे. यापूर्वी कामगारांना ग्रॅच्युईटीचा लाभ मिळण्यासाठी किमान पाच वर्षे सेवा करावी लागत होती. आता अस्थायी कामगारांना एक वर्ष सेवा दिल्यानंतरही ग्रॅच्युईटीचा लाभ मिळणार आहे. नवीन लेबर कोड लागू झाल्याने भविष्य निर्वाह निधी मिळणाऱ्या कामगारांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. कारण, आता स्थायी कामगारांबरोबच अल्पकालीन कामगार (गिग वर्कर्स), प्लॅटफॉर्म वर्कर्स यांनाही याचा फायदा होणार आहे. पण, यासाठी संबंधित कंपनीत भविष्य निर्वाह निधी कायदा लागू असणे आवश्यक असेल. सुटी मिळणे हा मुद्दाही सुटसुटीत झाला आहे. स्थायी आणि अस्थायी कामगारांना मिळणाऱ्या वेतनात जशी तफावत होती, तशीच मिळणाऱ्या सुट्यांबाबतही दिसून येते. नव्या कायद्यानुसार आता २० दिवस काम करणारा कामगार एका दिवसाच्या सुटीसाठी पात्र ठरणार आहे. याचा सर्वांत जास्त फायदा स्थलांतरित आणि कंत्राटी कामगारांना होईल. ज्या उद्योगात ३०० अथवा त्यापेक्षा जास्त कामगार काम करतात, तो उद्योगच कामगाराला स्थायी आदेश देऊ शकेल. यापेक्षा कमी कामगारांना स्थायी आदेश देण्यापासून सुट देण्यात आली आहे. यामुळे अनुपालनाचा भार कमी होणार आहे. यापूर्वी १०० कामगार असलेल्या संघटनांनाही कामगारांना स्थायी आदेश द्यावा लागत असे. नव्या कामगार कायद्यांनुसार कामगारांना नोकरी सुरू करताना नियुक्तिपत्र देणे अनिवार्य असेल. परिणामी रोजगाराच्या अटींमध्ये पारदर्शकता येण्यात मदत होईल. किमान वेतनाचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. देशभरात किमान वेतन नियम लागू होणार असल्याने जगण्यासाठी आवश्यक असलेले वेतन द्यावेच लागणार आहे आणि तेही ठरलेल्या तारखेनुसार. नियोक्त्यांना कामगारांना वेळेवर वेतन देणे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे.

नव्या कामगार संहितांना डाव्या संघटना आणि काँग्रेसने विरोध करण्यास सुरुवात केली आहे. जवळपास दहा मोठ्या कामगार संघटना या कायद्याच्या विरोधात उतरल्या आहेत. केंद्र सरकारच्या या कायद्यांमुळे कामगारांचे मोठे नुकसान होणार असल्याचा आरोप करीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मा-ले) या पक्षांनी तामिळनाडूत ८ डिसेंबरला राज्यव्यापी बंद पुकारला आहे. आता ३०० कर्मचारी असलेले उद्योगही नव्या कायद्यानुसार दिवाळखोरीत निघाल्यानंतर बंद केले जाऊ शकतात. पूर्वी ही मर्यादा १०० कर्मचारी असलेल्या उद्योगांना लागू होती. लघु उद्योजकांना आता कारखाना बंद करण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागणार नाही. लघु उद्योगातच मोठ्या प्रमाणात कामगार आहेत. नव्या कायद्यांमुळे हे कामगार देशोधडीला लागणार आहेत. नवे श्रम कायदे हे हिंदुत्वाच्या अजेंड्यावर आधारित असून, उद्योगपतींना फायदे देणारे असल्याचा आरोप काँग्रेस आणि डाव्या संघटनांनी केला आहे. राष्ट्रीय पातळीवरील दहा कामगार संघटनांनी देशव्यापी संप पुकारण्याचा इशारा दिल्यानंतर केंद्र सरकारनेही त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे ठरविले. नव्या चार कामगार संहितांबाबत कामगार संघटना आणि अन्य संबंधित घटकांचा फिडबॅक घेतल्यानंतर या चार संहिता नव्याने अधिसूचित केल्या जाऊ शकतात. याचे कारण म्हणजे, नव्या कामगार संहितांना संसदेने जवळपास पाच वर्षांपूर्वी मान्यता दिली आणि अंमलबजावणी करण्याचा निर्णय आता घेतला आहे.

नव्या कामगार कायद्यांचे भवितव्य काय असेल, हे येणारा काळ ठरविणार आहे. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो कायद्याचा फायदा कामगारांना मिळण्याचा! तो साध्य झाला तरच या नव्या संहितांचे चीज होईल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# सरन्यायाधीशांनाही तीन वर्षे!

३४ वर्षे आणि १७ दिवस! या दोन आकड्यांची तुलना करणे अवघड असले तरी जगातील दोन मोठ्या लोकशाही देशांच्या न्यायपालिकेबाबतचे हे दोन आकडे बरेच काही सांगणारे आहेत.

अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयात जॉन मार्शल यांनी सलग ३४ वर्षे सरन्यायाधीशपदी राहण्याचा विक्रम नोंदविला आहे आणि जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीत म्हणजे भारतात के. एन. सिंग नावाचे सरन्यायाधीश फक्त १७ दिवस सरन्यायाधीशपदावर होते. २५ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर १९९१ या काळात ते २२ वे सरन्यायाधीश होते. न्या. के. एन. सिंग यांनी आपल्या १७ दिवसांच्या कार्यकाळात किती व कोणते निवाडे दिले याची कल्पना नाही. मात्र जॉन मार्शल यांनी आपल्या ३४ वर्षे ५ महिने व ११ दिवसांच्या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निवाडे दिले. त्यांच्या निवाड्यांनी अमेरिकन लोकशाहीला समृद्ध, सुसंगत व सुसंस्कृत केले. १७५-१८० वर्षांपूर्वी त्यांनी दिलेल्या निवाड्यांचा आजही संदर्भ दिला जातो.

**न्या. गवईंचा कार्यकाळ** : काल २३ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश न्या. गवई आपल्या सहा महिन्यांच्या कारकीर्दीनंतर सेवानिवृत्त झाले आणि आज न्या. सूर्य कांत सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. त्यांचाही कार्यकाळ काही महिन्यांचा राहणार आहे. अशीच स्थिती देशाच्या सरसेनापतींची होत होती. काही लष्करप्रमुखांना एक दोन वर्षांचा कालावधी मिळत होता तर काहींना काही महिन्यांतच सेवानिवृत्त व्हावे लागत होते. एवढ्या कमी कालावधीत सरसेनापती देशाच्या सुरक्षेचा कोणता विचार करणार, कोणत्या नव्या बाबी लागू करणार? कोणती नवी दिशा देणार? किती सीमा भागांना भेट देऊ शकणार?

**तीन वर्षांचा कालावधी** : बहुधा याचाच विचार करीत सरकारने काही वर्षांपूर्वी एक निर्णय घेत सरसेनापती, वायुदल प्रमुख व नौदल प्रमुख यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असावा असा एक निर्णय घेतला. याचा फायदा म्हणजे देशाच्या सेनापतींना काही मूलभूत गोष्टींचा विचार करून योग्य तो निर्णय घेण्याचा, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वेळ मिळू लागला. याचे सुपरिणाम दिसू लागले.

**सरन्यायाधीशांना का नाही?** : देशाच्या न्यायपालिकेत हे सूत्र का लागू करण्यात आले नाही? न्या. गवईंसारख्या कर्तबगार न्यायाधीशास केवळ सहा महिन्यांनंतर सेवानिवृत्त व्हावे लागत आहे. न्या. गवई यांच्यानंतर सरन्यायाधीश होणारे न्या. सूर्य कांत यांचा कार्यकाळ १४-१५ महिन्यांचा राहणार आहे. त्यांच्यानंतर सरन्यायाधीश होणारे न्या. विक्रमनाथ ७ महिने सरन्यायाधीश राहतील. न्या. पारडीवाला यांना दोन वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे. हा एक अपवाद वगळता सर्व सरन्यायाधीशांचा कार्यकाळ फार कमी राहणार आहे.



**पहिल्या महिला सरन्यायाधीश** : न्या. विक्रमनाथ यांच्यानंतर श्रीमती नागरत्ना पहिल्या महिला सरन्यायाधीश होतील. त्यांचा कार्यकाळ केवळ ३६ दिवसांचा राहणार आहे. पाच दिवसांचा आठवडा विचारात घेतल्यास सरन्यायाधीश म्हणून केवळ २२-२४ दिवस त्या सर्वोच्च न्यायालयात काम करतील. म्हणजे पहिल्या महिला सरन्यायाधीश एवढी नोंद होण्याव्यतिरिक्त त्यांची उपलब्धी काय राहणार आहे?

**घटनापीठाचे काय?** : सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्त्वाची प्रकरणे वेळोवेळी जात असतात. त्यांच्या निवाड्यासाठी सरन्यायाधीश घटनापीठ नियुक्त करीत असतात आणि परंपरेनुसार सरन्यायाधीशच घटनापीठाचे प्रमुख असतात. मात्र, त्यांचाच कार्यकाळ काही दिवसांचा वा काही महिन्यांचा राहणार असेल तर ते कोणता निवाडा करणार? अनेक महत्त्वाच्या प्रकरणांचा यामुळे निवाडा होऊ शकलेला नाही. ते सारे विषय सर्वोच्च न्यायालयात सुनावणीअभावी पडून आहेत.

**हा तर भेदभाव** : सरन्यायाधीश नियुक्त करण्याच्या सध्याच्या प्रक्रियेत सेवाज्येष्ठतेचे पालन केले जात असले तरी एक वेगळा भेदभाव होतो. काही सरन्यायाधीशांना मोठा कार्यकाळ मिळतो तर काहींना फक्त काही महिन्यांचा. माजी सरन्यायाधीश न्या. चंद्रचूड यांच्या वडिलांना ७-८ वर्षांचा कार्यकाळ मिळाला होता आणि आता बहुतेकांना काही महिन्यांचा कार्यकाळ मिळतो. हा भेदभाव कशासाठी?

**निवृत्तीचे वय** : उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय वाढविण्यात यावे अशी एक सूचना वारंवार करण्यात येत आहे. मात्र, त्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. वकिलांसाठी निवृत्तीचे वय नाही, मात्र न्यायाधीशांसाठी ६५ ही वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. सध्याच्या युगात ६५ ही वयोमर्यादा कालबाह्य मानली जाते.

भारत सरकारचे ॲटर्नी जनरल के. के. वेणुगोपाल वयाच्या ८० व्या वर्षी ॲटर्नी जनरल होऊ शकतात. वयाच्या ९२ व्या वर्षी ते सर्वोच्च न्यायालयात वेगवेगळ्या राज्य सरकारांचे वकील होऊ शकतात आणि सरन्यायाधीशांसाठी ६५ ही वयोमर्यादा ठरविली जावी हा विरोधाभास नाही काय? या एका कारणामुळे काही नामवंत वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होण्याऐवजी वकिली करणे पसंत केले.

**आजीवन न्यायाधीश** : अमेरिकेत तर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीसाठी कोणतीही वयोमर्यादा ठरविण्यात आलेली नाही. ते आजन्म या पदावर राहू शकतात. जगात सर्वाधिक कार्यक्षम सर्वोच्च न्यायालय डेन्मार्कचे समजले जाते. तेथील न्यायाधीशांसाठी ७० हे सेवानिवृत्तीचे वय ठरविण्यात आले आहे. भारतासारख्या विशाल देशात सर्वोच्च न्यायालयात ३४ न्यायाधीश असताना लहानशा डेन्मार्कच्या सर्वोच्च न्यायालयात १८ न्यायाधीश आहेत.

**ब्रिटनमध्ये ७५ वर्षे** : ब्रिटनमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी ७५ ही वयोमर्यादा ठरविण्यात आली आहे. ब्रिटनमधील न्यायाधीशांच्या निवाड्यांचा संदर्भ भारतातील न्यायालयांमध्ये दिला जातो. फ्रान्समध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६७ वर्ष पूर्ण झाल्यावर निवृत्त होतात.

कोणत्याही न्यायाधीशासाठी अनुभव- अभ्यास या बाबी फार आवश्यक असतात. साठी गाठेपर्यंत तो जणू परिपक्वता गाठीत असतो आणि ६५ व्या वर्षी त्याला चक्क निवृत्त केले जाते. यातून एक अपप्रवृत्ती जन्मास आली आहे, ती म्हणजे सेवानिवृत्तीनंतर एखादे सरकारी पद मिळविण्याची. काही न्यायाधीश यावर डोळा ठेवून असतात.

**निवृत्तीनंतरची आश्रयस्थाने** : मानवाधिकार आयोग, हरित न्यायाधिकरण, वेगवेगळे लवाद, विधि आयोग, लोकपाल, परदेशातील नियुक्त्या अशी ही सेवानिवृत्तीनंतरची आश्रयस्थाने मानली जातात. या पदावर नियुक्त होणाऱ्या न्यायाधीशांकडे, त्यांच्या निवाड्यांकडे संशयाने पाहिले जाते. यात प्रामाणिक न्यायाधीशांवरही अन्याय होतो आणि मग या प्रक्रियेत न्यायाधीशाच्या व पर्यायाने सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिमेला तडा जातो. असे होऊ देण्याऐवजी सरकारने न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीचे वय वाढवावे, त्यांचे वेतन वाढवावे आणि नंतर मात्र त्यांना कोणतेही सरकारी पद घेण्याबाबत बंदी करावी.

**दोन फायदे** : न्यायाधीशांच्या निवृत्तीची वयोमर्यादा वाढविल्यास दोन फायदे होतील. पहिला फायदा म्हणजे न्यायाधीशांच्या अनुभवाचा फायदा देशाला, समाजाला मिळू लागेल आणि दुसरा फायदा म्हणजे सेवानिवृत्तीनंतर सरकारी पदे मिळविण्याच्या मानसिकतेवर अंकुश लागेल. याचा सकल परिणाम म्हणजे देशाच्या न्यायपालिकेची प्रतिमा उंचावली जाईल.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# प्रेशर कूकर फुटतोय्!

आज सर्वांसाठी अगदी सर्वसामान्य आणि समसमान ठरलेली समस्या म्हणजे ताण. मग तो कामकाजी लोकांना असो किंवा नोकरदारांना, ताणतणाव कोणालाच चुकलेला नाही. असे तणावात असणारे लोक लहान मुलांकडे पाहून म्हणतात की, यांचे बरे आहे, यांना काही ताण नाही, काही मिळविण्याची धडपड नाही. मस्त निश्चिंत जीवन आहे. पण, दुर्दैवाने आता चित्र बदलले आहे.

मागील काही दिवसांमध्ये अगदी दिल्लीपासून नागपूरपर्यंत अनेक शाळकरी विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी चिठ्ठी लिहून ठेवली की, आम्हाला शिक्षकांकडून त्रास होतोय्. कोणाला शिक्षक नृत्य सरावादरम्यान रागावले, तर कोणाला अन्य काही कारणाने. पण, हा ताण स्वत:चे जीवन संपवण्याइतका मोठा आहे का? आजकाल तसेही एक किंवा दोनच अपत्य असतात. त्यातही त्यांना तणावामुळे जीवन संपवावेसे वाटत असेल, तर पालकांनी कोणाकडे पाहावे? १०, १३, १६ हे वय हसण्या-बागडण्याचे असताना, त्या वयात स्वत:ला संपवण्याचा विचार या चिमुकल्यांच्या मनात येणे, ही बाब अतिशय भयावह आहे. जेव्हा अशा घटना सातत्याने घडतात, तेव्हा एखादी सामाजिक समस्या आक्राळविक्राळ रूप घेऊन समोर येते आहे का, असे मंथन सुरू होते आणि ते व्हायलाही हवे.



आजच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर अनेक घटक परिणाम करतात. शैक्षणिक स्पर्धा, गुणांचे अत्याधिक महत्त्व, करिअरबाबत असलेले अपेक्षांचे दडपण आणि प्रत्येक क्षेत्रात 'परिपूर्ण' असण्याची सक्ती... ही काही प्रमुख कारणे आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर भावनिक ताण वाढत जातो. अनेक घटकांमुळे त्यांचा प्रेशर कूकर झालाय् की काय, असे वाटण्याइतपत स्थिती आहे. याशिवाय शिक्षकांकडून होणारा अपमान, समाजातील घटकांशी तुलना आणि घरच्या वातावरणातील अस्थिरता यांचाही गंभीर प्रभाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर पडतो. भारतात राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या आकड्यांनुसार, २०२३ मध्ये १३,८९२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या, जे प्रमाण गेल्या दहा वर्षांत सुमारे ६५ टक्क्यांनी वाढले आहे. तर २०२२ मध्ये ते आकडे १३,०४४ इतके असल्याचे अहवालात म्हटले आहे. या वाढत्या आकड्यांनी भारतातील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची स्थिती किती गंभीर झाली आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येते.

दिल्लीतील एका विद्यार्थ्याने शिक्षकांनी अपमान केल्याचे सांगत आत्महत्या केली. मुळात, शिक्षकांचे बोलणे म्हणजे अपमान असतो, ही धारणाच मनाला न पटणारी आहे. शिक्षक, पालक हे मुलांना आकार देणारे, प्रसंगी आधार देणारे घटक असतात. त्यांनी काहीतरी म्हटल्याने विद्यार्थ्यांना तो अपमान वाटावा, हे समाजाचे खरे बदललेले चित्र आहे. पूर्वी 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' हे गाणे किती आनंदात गायले जायचे. शिक्षकांच्या हातचा आम्ही इतका मार खाल्ला, हे सांगणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. त्यापैकी अनेकजण आपल्या चांगल्या आयुष्याचे श्रेय शिक्षकांच्या शिस्तीला देतात. आता चित्र बदलले आहे. अर्थात्, नाण्याची दुसरी बाजू देखील आहेच. आज त्या तोडीचे शिक्षकही नाहीत, ही वास्तविकता आहे. पूर्वी शिक्षकी पेशा हे व्रत होते. आता तो दृष्टिकोन राहिलेला नाही. शिक्षकांपासून पत्रकारांपर्यंत जे कोणी व्रत वगैरे म्हणून काम करायचे, ते सारेच कारकून झाले आहेत. त्यामुळे कसेही करून काम हातावेगळे करायचे आणि आजचा दिवस ढकलायचा, ही प्रवृत्ती वाढीस लागली आहे. शेवटी तेही कुठेतरी व्यवस्थेच्या तणावाचे भुक्तभोगी आहेतच. पण, याचा अर्थ विशेषत: शिक्षकांनी कोणताही ताण विद्यार्थ्यांवर काढावा, हे योग्य नाहीच. बदलत्या काळात शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा जास्त काळजीपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे. आज विद्यार्थ्यांवर असणाऱ्या ताणातून त्यांना पालक आणि शिक्षकच बाहेर काढू शकतात. यासाठी दोन्ही घटकांनी या उमलत्या कळ्या-फुलांना नीट समजून घेणे गरजेचे आहे. त्यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे, त्यांच्या आवडीनिवडींचे निरीक्षण करून त्यात विधायक बदल केला पाहिजे. बदलत्या काळानुरूप मुलांच्या भावनिक आणि मानसिक जडणघडणीचा प्रवास काहीसा क्लिष्ट, गोंधळलेल्या स्वरूपाचा झाला आहे. त्यांना शांतपणे, समंजसपणे समजून घेणारे पालक आणि शिक्षक हवे आहेत. कारण जे स्वत: शांत आणि समंजस असतील, तेच गोंधळलेल्या बालकांना शांत करू शकतील. आता दिसणारे चित्र बदलावे, हाच यामागील प्रामाणिक उद्देश आहे.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# 'हिंद'ची चादर

शिखांचे नववे गुरू, गुरू तेगबहादूर यांना हिंदची चादर असे संबोधले जाते. 'हिंद'ची चादर म्हणजे हिंदुस्थानचे संरक्षक असा त्याचा अर्थ आहे. अधिकांश भारतावर त्यावेळेला मुगल बादशहा औरंगजेबाचे राज्य होते. तो धर्मवेडा होता. जवळपास सर्वच मुस्लिम बादशाहांप्रमाणे त्याला सुद्धा इतरांवर आपला धर्म थोपवायला आवडत होते. हिंदू धर्म मुगलांच्या राज्यात अत्याचार सहन करून आपले अस्तित्व टिकवून होता. ही गोष्ट त्याला आवडत नव्हती. त्यामुळे तो विविध ठिकाणी जबरदस्तीने लोकांचे धर्मांतरण करणे, लोकांवर अत्याचार करणे, त्यांचे प्राण घेणे, नरसंहार करणे अशा पद्धतीची कृत्ये करीत होता. परंतु त्याच्या सैन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंदू सरदार सुद्धा होते. ते नाराज होतील व आपल्या विरोधात विद्रोह करतील, ही पण सातत्याने त्याला भीती असायची. त्यामुळे तो धर्मांतरणासाठी विविध युक्त्या वापरत असायचा.

एकदा त्याने काश्मीरमधील हिंदूंना व त्यातही विशेषत: काश्मिरी पंडितांना आदेश दिला की, तुम्ही सर्व मुसलमान बना. पंडितांसमोर धर्मसंकट निर्माण झाले. परंतु त्यांनी आपली अक्कल हुशारी वापरली व औरंगजेबाला त्यांनी निरोप पाठवला की आमचे राजे व गुरू हे गुरू तेगबहादूर आहेत. ते जर इस्लाम धर्म स्वीकारतील तर आम्ही सुद्धा इस्लामचा स्वीकार करू शकतो. औरंगजेब मनातून खुश झाला. त्याला असे वाटले की हजारो पंडित हे एका फटक्यात मुसलमान बनतील. ही फार मोठी संधी चालून आलेली आहे. त्यामुळे त्याने गुरू तेगबहादूर यांना आपला आदेश पाठविला की तुम्ही इस्लामचा स्वीकार करा. त्यासाठी त्याने त्यांना भेटीला येण्याचे निमंत्रण पाठविले. ज्या वेळेस गुरू तेगबहादूर यांना हा निरोप मिळाला, त्या वेळेला त्यांना समजले की आता त्यांचे आयुष्य फार थोडे राहिलेले आहे. त्यांनी आपल्या जवळच्या लोकांना विचारले की धर्मासाठी बलिदान करण्यासाठी कोणता महापुरुष योग्य आहे? हाच प्रश्न त्यांनी त्यांचा मुलगा गोविंदसिंह याला सुद्धा विचारला. त्यावेळी त्यावर हा लहानसा मुलगा म्हणाला की, धर्मासाठी बलिदान करण्यासाठी तुमच्यापेक्षा योग्य पुरुष कोण असू शकतो? आपल्या मुलाचे हे उत्तर ऐकून गुरू तेगबहादूर यांनी निश्चय केला की त्यांच्याकडे मदत मागायला जे काश्मिरी पंडित आलेले आहेत, त्यांना निराश करायचे नाही. ते त्या काश्मिरी पंडितांना म्हणाले की, तुम्ही निश्चिंतपणे जा व आपल्या धर्माचे पालन करा. मी औरंगजेबाच्या भेटीला जाईन आणि धर्माकरिता बलिदान करण्याचा प्रसंग आल्यास मी त्याहीसाठी सज्ज आहे. गुरू तेगबहादूर औरंगजेबाला भेटले. औरंगजेबाने त्यांना इस्लामचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. त्यावेळेला गुरुजींनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे औरंगजेबाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली. धर्मासाठी त्यांनी आपले शिश म्हणजे मस्तक समर्पित केले. या घटनेचा संपूर्ण भारतावर परिणाम झाला. औरंगजेबाच्या धर्मांतरणाच्या विरोधामध्ये ठिकठिकाणी लोकांचा विद्रोह आणि उठाव होऊ लागला. गुरू गोविंदसिंह यांनी या पापी औरंगजेबाच्या विरोधामध्ये शिखांना संघटित केले, आपले सैन्य उभारले व औरंगजेबाशी प्रबळ लढाई मांडली. गुरू तेगबहादूरांच्या बलिदानातून संपूर्ण भारताला प्रेरणा मिळाली. त्यांच्या बलिदानामुळे हजारो लोक धर्मांतरित होण्यापासून वाचले. त्यांनी केलेले हे महान कार्य देश, धर्म, संस्कृती, इतिहास यासाठी प्रेरणास्पद आहे. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' म्हणजे हिंदची चादर, हिंदूंचा संरक्षणकर्ता असे म्हणतात. हा इतिहास इस्लामी अत्याचारांची कहाणी आहे. हजारो लोकांना ठार मारण्यात आले, हजारोंना धर्मांतरित करण्यात आले, हजारो महिलांवर अत्याचार झाले. याच विचारामुळे देशाचे दोन तुकडे झाले. ज्या पाकिस्तानची निर्मिती या कट्टरवादी विचारातून झाली, तो पाकिस्तान सुद्धा त्याच्या जन्मापासूनच आमचा वैरी बनलेला आहे. खरं पाहिलं तर भारत मातेच्या अंगभंगातून हिंदुस्थान आणि पाकिस्तान जन्माला आले. एकाच मातेच्या पुत्रांना आपण एकमेकांचे भाऊ समजतो. परंतु कट्टरवादी विचारसरणीच्या लोकांनी भारत मातेला कधीच भारत माता मानले नाही. त्यामुळे भारत मातेच्या अंगभंगातून जन्म घेऊन सुद्धा पाकिस्तान, हिंदुस्थानचा भाऊ होऊ शकला नाही. कोणीही एकमेकांचे भाऊ तेव्हाच होतात, जेव्हा त्यांची आई एक असेल. इथे तर त्यांनी भारत मातेला माता मानलेलेच नाही.

काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये धर्मांतरणाचे रॅकेट चालविणारा छंगूर बाबा याला अटक करण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वी मोबाईल गेमच्या माध्यमातून धर्मांतरणाचे प्रयत्न उघडकीस आले होते. कुठे बळजबरीने तर कुठे आमिष देऊन हे सर्व प्रकार देशामध्ये सुरूच असतात. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की धर्मांतरण हे राष्ट्रांतरण आहे. इथे राहणारा समाज बदलला की तिथे संविधानाचे राज्य समाप्त होते आणि धर्मवेडाचे राज्य सुरू होते.

संपूर्ण जगामध्ये यांचा इतिहास पाहिला तर धर्माच्या आधी यांची तलवार तिथे पोहोचलेली आहे आणि मग उठले आहेत असहाय लोकांचे चीत्कार, वाहिले आहे निरपराध लोकांचे रक्त! विश्वातील मानवतेने आणि शांतीने लज्जेने मान खाली घालावी इतका नरसंसार यांनी धर्माच्या नावावर केलेला आहे. आजही यांच्यातील कट्टरवादी विविध रूपांनी संपूर्ण जगभर थैमान घालतात. भारतालाही यांच्या कट्टरवादाची झळ नेहमीच पोचते. ज्या समाजाने यांना भावासारखे वाढविले, वागविले; प्रार्थना स्थळे बांधायला जमिनी दिल्या; आपल्या धर्माचे पालन करण्याची मुभा दिली, संधी दिली; अनुकूल वातावरण दिले, हे लोक त्याच समाजाचे गळे कापायला कमी करत नाहीत. हा त्यांचा इतिहास आहे.

गुरू तेगबहादूरांचे बलिदान हे वीर पुरुषाचे बलिदान आहे. शरीराला नश्वर मानणाऱ्या एका आध्यात्मिक गुरूचे बलिदान आहे. सर्व धर्म जर समान असते, तर गुरू तेगबहादूरांनी हसत हसत त्याच वेळेला आपला धर्म बदलविला असता व हजारो लोकांना यांचा धर्म स्वीकारण्याची प्रेरणा दिली असती. परंतु त्यांनी तसे केले नाही. यावरून त्यांचाही संदेश स्पष्ट आहे की, दहशत पसरविणारा हा धर्म स्वीकारण्यासारखा नाही. चंदीगड येथे काही पगडीधारी लोकांना मी प्रार्थना स्थळामध्ये जाऊन चादर चढविताना पाहिले. त्यावेळेला मला वाटले की, ज्या पंजाबने संपूर्ण देशाला ''धर्मासाठी मस्तक देऊ'' हा संदेश दिला, त्याच पंजाबचे सुपुत्र असे कृत्य करीत आहेत. यावरून पुन्हा एकदा गुरू तेगबहादूरांचा इतिहास सर्वांनाच सांगण्याची आवश्यकता आहे. आज गुरू तेगबहादूरांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त 'हिंद'ची चादर असलेल्या गुरू तेगबहादूर यांना शतशत नमन.

९५५२५३५८१३
(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## संभ्रमच संभ्रम...!

आपले मन नित्य द्विधा अवस्थेत असते. काय करावे आणि काय करू नये या विचारातच अधिक वेळ आणि शक्ती खर्च होत असते. अशातच हाती असलेला भ्रमणध्वनी मनात अधिकच संभ्रमावस्था निर्माण करत असतो. आपली जीवनशैली कशी आहे यावर आपले आरोग्य अवलंबून असते आणि आरोग्य कसे आहे यावर आपली कार्यक्षमता अवलंबून असते.

वास्तविक ताणतणाव हाच मनात अधिक संभ्रम निर्माण करतो. आपली जीवनशैली निसर्गाच्या अनुरूप असावी. प्रांतानुसार तसेच ऋतूनुसार आहार घेतला तर आरोग्याच्या तक्रारी जवळजवळ नाहीशा होतात. आहार, विहार, व्यायाम आणि संयमाचे पालन नित्य नेमाने केले तर सगळे जीवन सहज होऊन जाते. आहार कधी, किती, कसा घ्यावा हे आपले आपण नियोजन केले पाहिजे तसेच व्यायामाचे देखील आहे. कोणी दोन वेळाच जेवण करा असे सांगतात तर कोणी चार वेळा. कोणी फक्त फळे खायला सांगतात तर कोणी चौरस आहार घ्यायचा असा सल्ला देतात, कोणी चार लिटर पाणी पिण्याचा आग्रह करतात तर कोणी तहान लागली की पाणी पिण्याची सूचना करतात. सोशल मीडियावर तर या संदर्भात अक्षरशः धुमाकूळ सुरू असतो आणि मग काय करावे काही सुचेना अशी मनाची अवस्था निर्माण होते. मनातील हा संभ्रम दूर करण्याचा काहीही उपाय इथे दिसत नाही हे मात्र खरे. थोडा आपल्या आरोग्याचा अभ्यास केला असता आपल्याला काय चांगले आहे आणि काय घातक आहे याची ओळख होते. आपल्या प्रकृतीनुसार पोषक, पूरक आणि नैसर्गिक आहार घ्यावा. फास्ट फूडपासून दूर राहणे गरजेचे आहे कारण आरोग्य हीच आपली खरी संपत्ती आहे. ती संपत्ती आपली आपणच जपली पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

### अभ्यासातून घडते मुलांचे खरे व्यक्तिमत्त्व

आज अनेक घरांमध्ये एकच तक्रार ऐकू येते ''मुले अभ्यास करत नाहीत.'' सतत मोबाईल, टीव्ही पाहणे, शाळेतून घरी आल्यानंतर दप्तर बाजूला टाकून खेळायला धाव घेणे, अभ्यासासाठी वारंवार सांगावे लागणे. शालेय विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सगळ्यांसाठी मुलांचा अभ्यास ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु केवळ पुस्तकासमोरील वेळ म्हणजेच अभ्यास, अशी संकुचित व्याख्या करणे योग्य ठरेल का? अभ्यास हा केवळ वही-पुस्तकांपुरता मर्यादित नसून तो एक निरंतर चालणारी शिकण्याची प्रक्रिया आहे. विद्यार्थी जेव्हा घरातून शाळेकडे निघतो, तेव्हा तो आजूबाजूचा परिसर पाहतो, लोकांचे वागणे निरीक्षण करतो, विविध आवाज ऐकतो हे सर्व त्याचेच एक प्रकारचे अप्रत्यक्ष शिक्षण असते. अवांतर वाचन, आवडीची गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, बाजारात खरेदी करताना पैशांचा हिशेब करणे, सुंदर चित्रे काढणे, खेळात तलीन होणे, एखाद्या विषयावर निबंध लिहिणे, दैनंदिनी लिहिणे, गणिती उदाहरणे सोडवणे, कुंडीत झाड लावून त्याचे निरीक्षण करणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाणी व वीज वाचवणे, परिसर भेटी करणे या सर्व क्रियाकलापांतूनही मुलांचे शिक्षण घडत असते. अशा विविधांगी अभ्यासातून मुलांमध्ये मूलभूत शैक्षणिक कौशल्ये, भाषिक व गणितीय क्षमता, तर्कशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, समयसूचकता, निर्णयक्षमता, हजरजबाबीपणा, नेतृत्वगुण आणि संवाद कौशल्ये विकसित होतात.

जर अभ्यासात नावीन्य, खेळाधारित उपक्रम आणि मेंदूला चालना देणारे आनंददायी अनुभव असतील, तर मुले तो अभ्यास आवडीने करतात. कोणतीही गोष्ट मनापासून केली तर तिचे फळ निश्चितच चांगले मिळते. म्हणूनच, मुलांच्या अभ्यासाकडे केवळ 'पुस्तकातील धडे' म्हणून न पाहता, त्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक शिकण्याच्या संधीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. अशा पद्धतीनेच आपण अभ्यासातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवू शकतो.

**अरुण सोपानराव कराळे**/९०९६३२६२७२

## आजचे संघगीत-९२

सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५

### अपुल्या ध्येयावरी असू दे दृष्टि तुझी रे पुरी

अपुल्या ध्येयावरी असू दे दृष्टि तुझी रे पुरी ॥धृ.॥

प्रवास करिता आयुष्याचा मार्गी तव रे बागबगीचा
सुगंध आणिक रंग फुलांचा भुरळ पाडिती जरी ॥१॥

असंख्य पर्वत तुझ्याभोवती अथांग सागर जरी खवळती
तनू थरारुनि तुझी टाकिती धीर मनी रे धरी ॥२॥

मार्गी कंटक तुला बोचतिल ठेचा तैशा अनेक बसतिल
प्रसंग नाना निराश करतिल भिऊ नको तू परी ॥३॥

मार्गी तुजला मिळेल सोबत आक्रम मार्ग तयासमवेत
जरी गळाली मार्गी संगत थांबु नको तू तरी ॥४॥

थकशिल रस्त्यामधे चालुनी हिंमत परि अंगांत आणुनी
निजध्येयाला देव मानुनी ठेवि भाव त्यावरी ॥५॥

# राज्य पणन महामंडळाच्या उपक्रमांतर्गत शेतमाल खरेदीस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महामंडळ, मुंबई व नाफेड यांच्या संयुक्त विद्यमाने हंगाम २०२५-२६ साठी कडधान्य खरेदीस प्रारंभ झाला आहे. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार नाफेड व NCCF मार्फत मुग, उडीद व सोयाबीन खरेदीकरीता ३० ऑक्टोबर २०२५ पासून नोंदणी सुरू करण्यात आली असून, प्रत्यक्षात खरेदी प्रक्रिया १५ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मूग ८,७६८/- रूपये प्रति क्विंटल, उडीद ७८००/- रूपये प्रति क्विंटल, सोयाबीन ५३२८/- रूपये प्रति क्विंटल असे केंद्र शासनाने आधारभूत दर निश्चित केले आहेत.

राज्य शासनाने नियुक्त केलेल्या दोन केंद्रीय नोडल एजन्सींची जिल्हानिहाय खरेदी केंद्रे पुढीलप्रमाणे आहेत. नाफेड - अकोला, अमरावती, बीड, बुलढाणा, धाराशिव, धुळे, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नंदुरबार, परभणी, पुणे, सांगली, सातारा,वर्धा, वाशिम, संभाजीनगर, नांदेड, यवतमाळ,भंडारा, गडचिरोली. NCCF - नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, हिंगोली, चंद्रपूर,नागपूर तसेच सोलापूर जिल्ह्याकरीता सोयबीन, उडीद व मूग खरेदी केंद्र पुढीलप्रम णे आहेत.

**बार्शी** - बार्शी कृ.उ.बा.स - तुळजाभवानी कृषी साधन व पुरवठा सहकारी संस्था मर्या, उंबरगे, मंगळवेढा - मंगळवेढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि, मंगळवेढा, पंढरपूर - पंढरपूर कृ.उ.बा.स - पंढरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि, पंढरपूर, माळशिरस - अकलुज - शेकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि, अकलुज, अक्कलकोट - अक्कलकोट कृ.उ.बा.स - वि.का. सेवा सहकारी सोसायटी मर्या. किणी, करमाळा - कृ.उ.बा.स - विठ्ठल सर्वसाधरण सहकारी संस्था मर्या, मांगी, कुडुवाडी - कृ.उ.बा.स - माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. माढा, सदर योजना ही शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा याकरीता राबविण्यात येत असून सर्व शेतकऱ्यांनी मुग, उडिद व सोयाबीन विक्रीकरीता आपल्या गावाजवळील नाफेड/NCCF च्या नजिकच्या खरेदी केंद्रावर जावुन ७/१२ उतारा, आधारकार्ड व बँकेचे पासबुक घेवुन प्रथम आपल्या पिकाची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. नोंदणी ऑनलाईन पध्दतीने झेड मशिद्वारे करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांनी आधारकार्ड, बँक पासबुक, चालु वर्षाचा ७/१२ उतारा, पीकपेरा इ. कागदपत्रांसह नोंदणीकरीता प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे गरजेचे आहे. तसेच खरेदीकरीता आपणास SMS प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर आणावा. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार मुग, उडीद व सोयाबीन खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम व व्यवस्थापकीय संचालक श्रीधर बी. डुबे-पाटील तसेच संचालक मंडळ यांनी केले आहे.

# किशोरावस्था : बदलांचा टप्पा, घडवणुकीची संधी : डॉ.कहाते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

किशोरावस्था हा केवळ बदलांचा नाही, तर संधींचाही काळ आहे. योग्य दिशादर्शन मिळाल्यास या वयातील ऊर्जा, क्षमता आणि सर्जनशीलता उज्ज्वल भविष्य घडवू शकते. त्यामुळे मुलांना समजून घेऊन त्यांच्या सोबत चालणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे असे मत प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रज्ञ डॉ.गौरी कहाते यांनी व्यक्त केले.

त्या लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ला. दीनानाथ धुळम यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने नीलकंठेश्वर प्रशालेत सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिर, शैक्षणिक साहित्य व सॅनिटरी नॅपकिन वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.



यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी, दीनानाथ धुळम, संस्थेचे सचिव रवी नादर्गी, मुख्याध्यापिका संगीता आडकी आदी उपस्थित होते. कार्यक्रमात ८ वी ते १० वीच्या मुलामुलींना वह्या, पेन वाटप, मोफत हिमोग्लोबिन तपासणी केली तर मुलींना सॅनिटरी नॅपकिन वाटप करण्यात आले. कल्पना गडगडे, सुकेशिनी सोनकांबळे, सुगतरत्न गायकवाड यांनी ३ दिवशीय शिबिरात मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, किशोरावस्था हा मानवी आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक टप्पा मानला जातो. साधारणपणे १० ते १९ वर्षे या वयोगटाला किशोरावस्था असे म्हणतात. या काळात शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक पातळीवर अनेक मोठे बदल घडतात.

बाल्यावस्थेतून प्रौढत्वाकडे वाटचाल सुरू होते आणि व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी इथेच होते.कार्यक्रमाचे स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी, सूत्रसंचालन एल. बी. कनकी यांनी तर आभार के. एस. मुटकेरी यांनी मानले.

## श्रीशैल पीठाच्या जगद्गुरुंची यात्रेसंदर्भात उद्या महासभा

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

श्री श्रीशैल पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉक्टर चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे श्री वीरभद्रदेव काडदेवर मठ श्रीक्षेत्र येडूर येथे संचारी धर्म जागृती यात्रा कार्यक्रम १४ जानेवारी ते ६ मार्च दरम्यान आयोजित केले आहे. त्याचबरोबर राजगोपुराचे लोकार्पण, महाकुंभाभिषेक, लक्षदीपोत्सव तसेच कृष्णारती आदी कार्यक्रम होतील. कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री बृहन्मठ होटगी एम आयडीसी अक्कलकोट रोड येथील मठात २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सभेचे आयोजन केले आहे. याप्रसंगी काशी पीठाचे जगद्गुरु श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींचे दिव्य सानिध्य लाभणार आहे. सोलापुरातील भक्तगणांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मठाच्या वतीने करण्यात आले.

# भाजपात उपेक्षा; श्रीनिवास संगा यांनी केला शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सोलापुरातील युवा नेते श्रीनिवास संगा यांना भाजपाम ध्ये उपेक्षा झाल्याने त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे पूर्व भागातील राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे सांगण्यात येते.

श्रीनिवास संगा यांनी श्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्य केले-करीत आहेत. यानिमित्ताने त्यांनी युवकांची भक्कम फळी उभे केल्याने शहराच्या राजकारणात त्यांचे महत्व वाढले आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करताना श्रीनिवास संगा.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीनिवास संगा यांच्या कार्याचे कौतुक करत, सोलापुरातील युवकांना संगा यांच्या रुपाने खंबीर नेतृत्व मिळणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीकडून सोलापूर शहर मध्यमधून ते निवडणूक लढण्यास इच्छुक होते. मात्र या मतदारसंघातून आ.देवेंद्र कोठे यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला होता. तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विनंतीवरून त्यांनी आपला अर्ज मागे घेतला होता.

राज्यात पुन्हा भाजपची सत्ता आल्यास योग्य संधी देणार असल्याचे शब्द संगा यांना देण्यात आले होते. परंतु आजतागायत दिलेला शब्द पाळला गेला नाही. उलट पक्षात उपेक्षा करण्यात येत होते. त्यामुळे श्रीनिवास संगा हे अस्वस्थ होते. अखेर आपल्या राजकीय भवितव्यासाठी त्यांनी रविवारी शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष प्रवेश केला.

दरम्यान, श्रीनिवास संगा यांच्या शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून पूर्वभागातील जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. याप्रसंगी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे यांच्यासह सचिन चव्हाण अमर पाटील, शंकर म्हेत्रे आदी उपस्थित होते.

## सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटला महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २३ नोव्हेंबर-**

शिक्षण क्षेत्रातील अग्रणी असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांनी समाज स्वतःचे अढळ स्थान निर्माण करणाऱ्या पुणे येथील सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या शिक्षण संस्थेस अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा यंदाचा महात्मा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार जाहीर झाला आहे याची घोषणा साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी केली आहे.

या पुरस्काराचे वितरण पुणे येथील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे २३ नोव्हेंबर रोजी संपन्न होणाऱ्या १९ व्या अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनात होणार आहे, सूर्यदत्ता शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजय चोरडिया यांनी समाजातील गरीब विद्यार्थ्यांना सदोदित शिक्षणासाठी मोठी मदत केली आहे गेली अनेक दशके त्यांचे हे कार्य अविरतपणे सुरू आहे याच कार्याची दखल घेऊन त्यांच्या शिक्षण संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे,सुप्रसिद्ध साहित्यिक किशोर टिळेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने साहित्यिक व रसिक उपस्थित राहणार आहेत दत्तात्रय भोंगळे संमेलाचे स्वागताध्यक्ष असून सुनील लोणकर निमंत्रक पद भूषवणार आहेत.

## महत्वाचे...

### कुत्र्याच्या कारणावरुन पाचजणांना मारहाण

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

कुत्र्याच्या कारणावरून जुना विडी घरकुलमध्ये पाचजणांना म रहाण करण्यात आली. अजय अंबादास भोसले (वय १०), अंबादास विजयकुमार भोसले (वय ५१), उदय देविदास भोसले (वय १८), आदर्श देविदास भोसले (वय १७), देविदास विजयकुमार भोसले (वय ४५, सर्व रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) अशी जखम ींची नावे असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. २३ नोव्हेंबर रेजी सकाळी सातच्या सुमारास राहत्या घराजवळ भोसले यांनी कुत्रा बांधला होता. त्यावेळी कामले व इतर पाचजणांनी तुम्ही कुत्रा येथून काढा, तुमच्या बापाचा रस्ता आहे का असे म्हणून फरशी व लाथाबुक्क्याने भोसले यांना माहराण केली. यामध्ये पाचजण जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मुलाने चाकू फेकून मारल्याने आई जखमी

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

मुलाने चाकू फेकून मारल्याने आई जखमी झाली. असे जखमी महिलेचे नाव आहे. २२ नोव्हेंबर रोजी रात्री राहत्या घरी पैसे दे म्हणून सागर काटकर याने चाकू फेकून मारल्याने शोभा काटकर यांच्या तोंडास चाकू लागून जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

शहरातील दत्त नगरात तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अलोक भुमेश गाजुल (वय २१, रा. न्यु पाच्छा पेठ, दत्त नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. २२ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे आठच्या सुमारास महेश विभुते यांच्या घरात भाड्याने असलेल्या घरी मोकळ्या जागेत पत्र्याच्या शेडमधील लोखंडी अँगलला अलोक याने सुतीच्या दोरीने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्याने अलोकचा भाऊ अनमोल व आई भारती उर्फ गीता यांनी अलोक यास गळफासातून उतरवून बेशुध्दावस्थेत हवालदार डी जी राठोड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतीक माने यांनी अलोक यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पुरुषाने केली मारहाण, दोन महिला जखमी

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

घरगुती भांडणाच्या कारणावरून नवऱ्याने केलेल्या मारहाणीत दोन महिला जखमी झाल्या. यमुनाबाई बसू गवंडी (वय ६०, रा. सोरेगाव चौत्रा नाका, सोलापूर) आणि लक्ष्मी दामोदर गवंडी (वय २५, रा. भारती विद्यापीठ, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास द्वारकाधीश मंदीराजवळ घरगुती भांडणाच्या कारणावरून नवरा शांतप्पा लोणारी याने लोखंडी सळईने दोघींना मारहाण केली. यामध्ये यमुनाबाई यांच्या डोक्यास तर लक्ष्मी यांचा हातस व सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# 'देवदूत'च्या मंचीय आविष्काराने रसिक मंत्रमुग्ध

## त्र्यं.वि.सरदेशमुख यांच्या जयंतीनिमित्त नाट्यपरिषदेचा विशेष कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२३ नोव्हेंबर-**

जन्मभूमीची अनिवार ओढ लागलेल्या अलमुस्तफाला, समुद्रकिनाऱ्यावरील त्याच्या गावातील लोक जीवनाविषयी विचार व्यक्त करायला सांगतात आणि त्यातून आकाराला येते 'देवदूत' हे प्रज्ञानाट्य! प्रेम, विवाह, संतती, दान, कर्म, स्वरूपज्ञान, कायदे आणि मृत्यू याविषयीच्या विचारांचा अभिवाचनातून झालेला आविष्कार पाहताना रसिक सोलापूरकर मंत्रमुग्ध झाले.



जिब्रान जगविख्यात तत्वचिंतक, कवी, चित्रकार, लेखक होते. 'द प्रॉफेट' हे त्यांचे पुस्तक जगभरात गाजले. जगातील बहुतेक सगळ्या भाषेत त्याचे अनुवाद झाले. जिब्रानच्या शब्द आणि भावम धुर्याचं प्रत्यंतर त्र्यं. वि. सरदेशम ुखांच्या अनुवादातून येतं. देवाचा थांगपत्ता नसलेल्या या जगात, युगयुगांतरी, वेगवेगळ्या रूपात 'देवदूत' आपल्याला भेटी देतात. आपल्याशी संवाद-संगत करतात. समाजमनात असलेले संदेह दूर करण्याचं काम ते करतात. म नवी भावभावना आणि वर्तनाचे

जगविख्यात साहित्यिक खलील जिब्रान यांच्या लेखणीतून उतरलेल्या 'द प्रॉफेट' या विचारमौक्तिकांचा अनुवाद प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी 'देवदूत' या नावाने केला, त्याचे अभिवाचन रजनीश जोशी यांनी केले. निमित्त होते, प्रा. सरदेशमुख यांच्या १०६ व्या जयंतीचे.

अ.भा.नाट्य परिषदेच्या वतीने पद्माकर देव सभागृहात आयोजिलेल्या या कार्यक्रमात कार्यकारिणीचे ज्येष्ठ सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले. त्यानंतर माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या हस्ते श्री. जोशी आणि संगीतकार प्रशांत देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.

अवघे ४८ वर्षांचे आयुष्य लाभलेले खलील अर्थ समग्रतेने लावणाऱ्या या अभिजात कलाकृतीचे सादरीकरण रजनीश जोशी यांनी समर्पणाने केले. मंचसज्जा रेवती जोशी यांनी केली होती.

या कार्यक्रमास नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे सहकार्यवाह सुहास मार्डीकर, शरदकुमार एकबोटे, सुनील गुरव, व्यंकटेश रंगम, सुलभा पिशवीकर, पुष्पा आगरकर डॉ. सुहास पुजारी, रेवती जोशी, नितीन वैद्य,

सीमंतीनी चाफळकर, मनीषा जोशी, संतोष पवार, अच्युत काटीकर, डॉ.नसीम पठाण, हेमकिरण पत्की, गिरीश दुनाखे, मारुती कटकधोंड, राजेंद्र भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.



# पहिलीपासून हिंदी सक्तीला मनसे शिक्षक सेनेचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२३ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या नावाखाली महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून हिंदी विषय सक्तीचा किंवा पर्यायी म्हणून लागू करण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनाप्रणित महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक-शिक्षकेतर सेनेने तीव्र विरोध दर्शवला आहे.

मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के, राज्य उपाध्यक्ष संतोष घोडके, जिल्हाध्यक्ष प्रकाश कोळी, शहर अध्यक्ष विरसंगप्पा भोज महिला प्रमुख मंगल चव्हाण बाळकृष्ण लाड यांनी समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव आणि डॉ. वामन केंद्रे यांना निवेदन दिले. शासनाने पूर्वी हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केला असला तरी, आता काही विद्यार्थ्यांसाठी तो पर्यायी विषय म्हणून ठेवण्यासही मनसे शिक्षक सेनेचा ठाम विरोध आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा नाही, त्यामुळे महाराष्ट्रात तिची सक्ती करता येणार नाही. स्वामी विवेकानंद यांच्या मतानुसार, चारित्र्य घडविण्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांना मराठी मातृभाषेतूनच शिक्षण मिळणे आवश्यक आहे. मराठीतून शिक्षण मिळाल्यास आकलन क्षमता वाढते व विचारांना चालना मिळते. इयत्ता १ ली पासून मुलांना फक्त मातृभाषा मराठीतून शिकू दिले पाहिजे. भविष्यात त्यांना गरज पडल्यास ते भाषा निवडू शकतात. परिणामी हिंदी सक्ती केल्यास मुलांमध्ये शिक्षणाची भीती, नापसंती आणि मानसिक कुचंबना वाढेल, तसेच त्यांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेतल्यासारखे होईल. मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता, संस्कृती आणि मूल्यांचे प्रतीक आहे. तिचे संवर्धन करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सक्ती नसून, राज्याला स्थानिक संस्कृतीनुसार भाषा निवडण्याचा अधिकार आहे. या अधिकाराचा गैरवापर करू नये, महाराष्ट्रात इयत्ता १ ली पासून हिंदी विषय सक्तीचा किंवा पर्याय म्हणून देण्यास तीव्र विरोध आहे. मराठी भाषेमुळेच महाराष्ट्राची ओळख आणि मराठी माणूस उभा राहिला आहे, त्यामुळे मराठी भाषेतूनच शिक्षण देऊन तिचे अस्तित्व अबाधित राखले पाहिजे, अशी मागणी निवेदनात केली आहे.

# चिवरी फाट्याजवळील अपघातातील दोन जखमींचा उपचारावेळी मृत्यू

## अपघातातील मयतांची संख्या झाली पाच

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या क्रुझर जीपला टायर फुटून देवदर्शनापूर्वीच झालेल्या चिवरी फाट्याजवळील अपघातातील दोन जखमींचा उपचारावेळी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातात मरण पावलेल्यांची संख्या पाच झाली आहे

बालाजी पांडुरंग शिंदे (वय ४७, रा. उळे) आणि माऊली कदम ( वय ३०, रा. हडपसर) अशी मरण पावलेल्या दोघांची नावे आहेत. या अपघातात यापूर्वी पुजा हरी शिंदे (वय ३०, रा. उळेगांव), सोनाली माऊली कदम (वय २२, रा. हडपसर), साक्षी बडे (वय १९, रा. हडपसर) यांचा मृत्यू झाला आहे. तर कुणाल लक्ष्मण भिसे (वय ३२), अंजली रवी अमराळे (वय १५), आकाश दत्ता कदम (वय २५, सर्व रा. हडपसर), कार्तिक रवींद्र आमराळे (वय १३), कार्तिकी रवींद्र आमराळे (वय १५), शिवांश माऊली कदम (वय ०१ वर्षे, सर्व रा. हडपसर), ओमकार हरी शिंदे (वय १०), रुद्र हरी शिंदे (वय १२), हरी बाळकृष्ण शिंदे (वय ३६), श्लोक हरी शिंदे (वय ८, सर्व रा. उळे) अशी जखमींची नावे आहेत. शनिवारी सकाळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव येथील भाविक आणि त्यांचे पुणे येथील हडपसरचे नातेवाईक एमएच २४ व्ही ४९४८ या क्रुझर जीपमधून नळदुर्गजवळील खंडोबा मंदिराकडे निघाले होते. चिवरी गावाजवळ त्यांच्या जीपचे पुढील टायर अचानक फुटल्याने चालकाचे जीपवरील नियंत्रण सुटले व जीप पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात क्रुझर जीपमधील तीन भाविकांचा मृत्यू झाला तर इतर १२ जण जखमी झाले होते. अपघातातील जखमींना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असताना शनिवारी रात्री माऊली कदम आणि रविवारी सकाळी बालाजी शिंदे यांचा मृत्यू झाला. याबाबत सोलापूरच्या सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली आहे.

# कित्तुर चन्नम्मा नगरात दोन लाखांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

विजापूर रोडवरील कित्तूर चन्नम्मा नगरातील बंद घर फोडून चोरट्याने २ लाख २ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

याबाबत सतिश शिवप्पा सोलापूरे (वय ६२, रा. कित्तूर चन्नम्मा नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सोलापूरे हे २१ नोव्हेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास घराच्या वरच्या मजल्यावर झोपण्यासाठी गेले होते. अज्ञात चोरट्याने बाहेरून त्यांच्या खोलीस कडी लावली. तळमजल्यावरील मुख्य दरवाज्याचे कुलूप तोडून देवघरातील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने व चांदीचे साहित्य त्यामध्ये २.५९ ग्रॅम सोन्याची चैन, २.५९ ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स, ३०७ ग्रॅम वजनाचे चांदीचे जेवणाचे ताट, वाटी, ग्लास, १० ग्रॅम वजनाचे चांदीचा कुंकवाचा करंडा व रोख रक्कम असा एकुण २ लाख २ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. स.पोलिस निरीक्षक गायकवाड तपास करीत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारतीय महिला विश्वविजेत्या

## दिव्यांगाची पहिली टी-२० क्रिकेट : नेपाळला सात गडी राखून नमविले




### विजयी संघात महाराष्ट्रातील एकमेव सोलापूरची गंगा कदम

**कोलंबो, दि. २३ नोव्हेंबर -**

भारताच्या महिला संघाने दिव्यांगांच्या (अंध) पहिल्या टी-२० क्रिकेट स्पर्धे चे विजेतेपद पटकावले. नाबाद ४४ धावा फटकाविणारी फुला सारेन ही सामन्याची मानकरी ठरली. विजयी संघात उपकर्णधार असलेल्या सोलापूरच्या गंगा कदम हिचा समावेश आहे. गंगा ही महाराष्ट्रातील एकमेव क्रिकेटपटू आहे.

श्रीलंकेतील कोलंबो येथील पिसारा ओव्हल मैदानावर रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात त्यानी नेपाळवर सात गडी रखून दणदणीत विजय मिळविला. भारताने नाणेफेक जिंकून नेपाळला प्रथम फलंदाजीस आमंत्रित केले. त्यांना निर्धारित २० षटकात ५ बाद ११४ धावाच करता आल्या. नेपाळकडून सलामीचे तिघी लवकर बाद झाल्यानंतर मध्य फळीतील बीमला राय (२६) व सरिता घिमीरे (नाबाद ३५) यांनी शानदार खेळी करीत संघाचा डाव सावरला. भारताकडून जमुना राणी व अनुकुमरी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

विजयी ११५ धावांचे लक्ष भारतीय महिलांनी १२.१ षटकात (११७) ३ गडी गमावित गाठले. भारताचे सलामीचे दीपिका(६) व अनेकादेवी (२) हे धावबाद झाल्यानंतर के. करुणाने ४२ धावा करीत संघाचा डाव सावरला. त्यानंतर फुला सारेन व बसंती हंसदा यांनी संघाचा विजय सुकर केला. फुला सारेन (४ चौकारासह नाबाद ४४) व बसंती हंसदा ( नाबाद १३) यांनी शानदार खेळी केली. नेपाळकडून दिलीसारा धमारा हिने एक गडी बाद केला.

### तिरंग्याची शान वाढवण्याची संधी



अंध महिलांचा पहिला टी ट्वेंटी विश्वचषक भारतीय संघाने जिंकला आणि त्याच विजयी संघाची मी उपकर्णधार असल्याचा मला अभिमान आहे. नेपाळचा पराभव करत आमच्या संघाने विश्वचषकावर भारताचे नाव कोरले ही अभिमानाची गोष्ट आहे. विश्वचषकातील अंतिम सामना जिंकल्यानंतर भारताचा तिरंगा पाठीवर घेतल्यानंतरचा जो अनुभव आहे, तो शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. तिरंग्याची शान वाढवण्याची मला संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. सर्व भारतीयांनी आम्हाला खूप मोठा सपोर्ट केला, त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

**-गंगा कदम, उपकर्णधार**

### विश्वचषक जिंकण्याची स्वप्नपूर्ती झाल्याची अनुभूती



गंगा कदमला मागील पाच वर्षापासून मी क्रिकेटचे प्रशिक्षण देत आहे. मागील दीड वर्षापासून तिने अथक परीश्रम घेतले. संपूर्ण स्पर्धेत तिने उत्तम गोलंदाजी व अप्रतिम क्षेत्ररक्षण केले. यात तिने तीन गडी बाद तर सहा गडी धावबाद गेले. विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात ती सामनावीर ठरली होती. अंतिम सामन्यात गोलंदाजीत तिने दोन षटकांमध्ये केवळ नऊ धावा दिल्या. गंगाला प्रशिक्षण देताना तिच्या माध्यमातून भारताने विश्वचषक जिंकावा हे माझे स्वप्न होते, ते तिने पूर्ण केले. एक प्रशिक्षक म्हणून तिच्या माध्यमातून माझे विश्वचषक जिंकण्याची स्वप्नपूर्ती झाल्याची अनुभूती मला आज होत आहे.

**-राजू शेळके, प्रशिक्षक**

## महत्त्वाचे

### मॅक्स व्हर्स्टापेनने जिंकली लास वेगास ग्रांप्री



**लास वेगास** : रविवारी येथे मॅक्स व्हर्स्टपिनने लास वेगास ग्रांप्री जिंकली. व्हर्स्टपिनने चार शर्यतींमध्ये दुसऱ्यांदा विजय मिळवला. चार वेळचा फॉर्म्युला १ विजेत्या मॅक्सने लास वेगासच्या रस्त्यांवर विजय मिळवून विजेतेपदाच्या चित्रात परतण्याचा यशस्वी प्रयत्न केला. तीन वर्षांत दुसऱ्यांदा नेदरलॅण्डच्या मॅक्सने प्रसिद्ध स्ट्रिपचा एक भाग वापरणाऱ्या कोर्सवर विजय मिळवला आहे. त्याने २०२३ मध्ये पहिली शर्यत जिंकली. ही स्पर्धा फारच सुंदर होती, असे मॅक्स व्हर्स्टपिन आपल्या रेड बुल टीम रेडिओवर म्हणाला. व्हर्स्टपिनने कॅडिलॅक एफ संघाचा राजदूत व अभिनेता टेरी क्रूजसोबत गुलाबी कॅडिलॅकमध्ये विजयी फेरी मारली. हा व्हर्स्टपिनच्या कारकिर्दीतील ६९ वा विजय होता. हा व्हर्स्टपिनचा अमेरिकेत सलग आठवा विजय होता. त्याने पॉइंट्स लीडर लँडो नॉरिसला २० सेकंदांपेक्षा जास्त वेळ मागे टाकले. व्हर्स्टपिनने दुसऱ्या क्रमांकावर सुरुवात केली पण सुरुवातीलाच नॉरिसने त्याच्यासमोर आक्रमक चाल केली पण तो त्याच्या मॅकलरेनमध्ये वळणाच्या बाहेर सरकला तेव्हा त्याने पहिल्याच वळणावर शर्यतीचा ताबा घेतला.

### आशिया ओशनिया १०० कि.मी. अल्ट्रा स्पर्धेत अमरसिंग अव्वल



**नवी दिल्ली** : अमरसिंग देवंदाने बँकॉक येथे झालेल्या आशिया ओशनिया १०० कि.मी. अल्ट्रा चॅम्पियनशिप जिंकण्यासाठी ६:५९:३७ चा राष्ट्रीय विक्रमी वेळ नोंदवला. आंतरराष्ट्रीय अल्ट्रारनर्स असोसिएशनने आयोजित केलेल्या या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ११ सदस्यांच्या पथकाचा अमर हा भाग आहे. अमरसिंग देवंदाने ६:५९:३७ च्या राष्ट्रीय विक्रमी वेळेत आशिया ओशनिया १०० कि.मी. अल्ट्रा चॅम्पियनशिप जिंकून भारतासाठी इतिहास घडविला, असे एएफआयने रविवारी एक्स वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. भारतीय संघातील इतर सदस्यांमध्ये सौरव कुमार रंजन, गीनो अँटनी, वेलू पेरुमल, योगेश सानप, जयद्रथ, आरती झंवर, रणजी सिंग, सिंधू उमेश, नामग्याल ल्हमो आणि तेन्झिन डोल्मा यांचा समावेश आहे.

### लक्ष्यची लढाऊ वृत्ती उल्लेखनीय : विमल कुमार

**नवी दिल्ली** : लक्ष्य सेनची लढाऊ वृत्ती उल्लेखनीय असून त्याने आपण प्रभावित झालो. ऑस्ट्रेलियन ओपनचा किताब अगदी योग्य वेळी मिळाला असून हे विजेतेपद आगामी हंगामापूर्वी त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करेल, असे भारतीय बॅडमिंटन संघाचे माजी प्रशिक्षक विमल कुमार म्हणाले. लक्ष्यने रविवारी ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० च्या अंतिम फेरीत सिडनी येथे झालेल्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत जपानच्या युशी तनाकाचा २१-१५, २१-११ असा पराभव करून दमदार कामगिरी केली. मी लक्ष्यसाठी खरोखर आनंदी आहे. हा विजय खूप पूर्वी अपेक्षित होता आणि तो त्याला पात्र होता. गेल्या तीन स्पर्धांमध्ये त्याने दाखवलेली उल्लेखनीय लढाऊ वृत्ती मला सर्वात जास्त प्रभावित करते, असे ते म्हणाले. चौ तिएनविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या आदल्या रात्री त्याला ताप आला तेव्हा मी थोडा चिंतेत होतो, परंतु त्याने प्रचंड धैर्य आणि संयम दाखवला, असे त्यांनी सांगितले. या विजयासह, लक्ष्यने आंतरराष्ट्रीय सर्किटवरील एका कठीण टप्प्याचा अंत केला. त्याने शेवटचे २०२४ मध्ये लखनौ येथील सय्यद मोदी इंटरनॅशनलमध्ये सुपर ३०० जेतेपद जिंकले होते.

### वडिलांची प्रकृती बिघडल्यामुळे स्मृती मंधानाचे लग्न पुढे ढकलले

**मुंबई, २३ नोव्हेंबर -**

रविवारी सांगली येथे होणाऱ्या या विवाह सोहळ्याच्या आधी भारताची स्टार क्रिकेटपटू स्मृती मंधाना हिचे वडील श्रीनिवास आजारी पडल्याने स्मृतीचा विवाह सोहळा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. विश्वचषक विजेत्या क्रिकेटपटू स्मृतीचे वडील श्रीनिवास मंधाना आज सकाळी नाश्ता करत होते आणि त्यांची प्रकृती बिघडू लागली. आम्ही वाट पाहत होतो की ते लवकरच बरे होतील, पण त्यात सुधारणा झाली नाही, असे मंधाना यांचे व्यवस्थापक तुहिन मिश्रा यांनी सांगितले. म्हणून आम्ही कोणताही धोका पत्करायचा नाही असे ठरवले आणि रुग्णवाहिका बोलावली आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. ते डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहे, असे ते म्हणाले. वडिलांच्या प्रकृतीचा विचार करता, मिश्रा म्हणाले, स्मृती मंधानाने आपले लग्न वडील बरे होईपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला.

## मुथुसामीचे पहिले शतक, जॅन्सेनच्या ९३ धावा

### दक्षिण आफ्रिकेच्या सर्वबाद ४८९, भारत बिनबाद ९

**गुवाहाटी, २३ नोव्हेंबर**

सेनुरन मुथुसामीचे पहिले शतक आणि मार्को जानसेनच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम ९३ धावांच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने भारताविरुद्धच्या दुसऱ्या व अंतिम कसोटी क्रिकेट सामन्याता दुसऱ्या दिवशी १५१.१ षटकांत सर्वबाद ४८९ धावांचा डोंगर उभारला आणि वर्चस्व गाजविले. प्रत्युत्तर देताना भारताने दिवस अखेर ६.१ षटकांत बिनबाद ९ धावा केल्या. भारत अजून ४८० धावांनी पिछाडीवर आहे.

दक्षिण आफ्रिकेने ६ बाद २४७ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरु केल्यानंतर २४२ धावांची भर घातली आणि ४८९ धावांचा डोंगर रचला. कालचा नाबादवीर सेनुरन मुथुसामी व काईल व्हेरेनीने संघाचा डाव सावरत सातव्या गड्यासाठी ८८ धावांची भागीदारी केली, परंतु व्हेरेनीचे अर्धशतक जडेजाने हुकवले. व्हेरेनीने १२२ चेंडूंत ५ चौकारांसह ४५ धावांचे योगदान दिले. पुढे सेनुरन मुथुसामीने मार्को जानसेनच्या साथीने आपले पहिले शतक साजरे केले. मोहम्मद सिराजने मुथुसामीची घोडदौड थांबविली. मुथसामीने जॅन्सेनसोबत ९७ धावांची भागीदारी कर संघाला ४३१ धावांचा पल्ला गाठून दिला. जॅन्सन व मुथुस्वामी मिळून १७.४ षटकांत ९७ धावांची मालिकेतील सर्वोच्च भागीदारी केली. मुथुसामीने २०६ चेंडूंचा सामना करत १० चौकार व २ षट्कारांसह १०९ धावांची शतकी खेळी केली. मुथुस्वामी या वर्षी दक्षिण आफ्रिकेसाठी नववा शतक करणारा ठरला, परंतु एका वर्षात दहा वेगवेगळ्या शतकांच्या जागतिक विक्रमाशी बरोबरी करण्यात जॅन्सन सात धावांनी कमी पडला.



शतकाचा आनंद साजरा करताना सेनुरन मुथुसामी

जसप्रीत बुमराहने सायमन हार्मरला (५) त्रिफळाचित केले असताना मार्को जॅन्सेन वैयक्तिक शतकाच्या उंबरठ्यावर होता, मात्र याचवेळी कुलदीप यादवने त्याला आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले. जॅन्सनने ९१ चेंडूत ९३ धावा केल्या, यामध्ये भारतात भारताविरुद्ध ६ चौकार व विक्रमी सात षट्कारांचा समावेश आहे.

जॅन्सनच्या आधी मुथुस्वामी व व्हेरेनने भारताला निराश करण्यासाठी पुरेसे काम केले होते. पहिल्या दिवशी गोलंदाजांना रस निर्माण करणारी खेळपट्टी चांगली नव्हती कारण सुरुवातीची ओलावा पूर्णपणे सुकला होता.

भारताकडून फिरकीपटू कुलदीप यादवे ४ बळी, तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज व अष्टपैलू रवींद्र जडेजाने प्रत्येकी २ बळी टिपण्यात यश मिळविले.

प्रत्युत्तर देताना भारताकडून यशस्वी जयस्वाल व केएल राहुलने डावाची सुरुवात केली व दिवस अखेर ६.१ षटकांत बिनबाद ९ धावा केल्या. जयस्वाल नाबाद ७ धावांवर, तर राहुल नाबाद २ धावांवर खेळत होते. (वृत्तसंस्था)

## लक्ष्य सेनने जिंकले ऑस्ट्रेलियन ओपनचे किताब

### वर्षभराची प्रतीक्षा संपली

**सिडनी, २३ नोव्हेंबर**

रविवारी सिडनी येथे झालेल्या ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत भारताचा स्टार खेळाडू लक्ष्य सेनने जपानच्या युशी तनाकाला पराभूत करून विजेतेपद पटकावले. या यशाबरोबरच लक्ष्यने वर्षभराची आंतरराष्ट्रीय विजेतेपदाची प्रतीक्षा संपविली आणि हंगामातील आपले पहिले विजेतेपद पटकावले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथे स्थान मिळवल्यानंतर कठीण टप्प्याचा सामना करणाऱ्या अल्मोराच्या २४ वर्षीय लक्ष्य सेनने एका पुनरुज्जीवित आठवड्याची सुरुवात दमदार कामगिरीने केली. त्याने २६ वर्षीय तनाकाला ३८ मिनिटांत २१-१५, २१-११ असे हरवले आणि कानात बोटे घालून विजय साजरा केला.

मी या हंगामात बरेच चढ-उतार पाहिले आहेत, हंगामाच्या सुरुवातीला काही दुखापती झाल्या होत्या. परंतु मी संपूर्ण हंगामात माझे कठोर परिश्रम चालू ठेवले आणि हंगामाचा शेवट चांगल्या पद्धतीने केल्याबद्दल मला खूप आनंद होत आहे, असे लक्ष्य सामन्यानंतर म्हणाला.



विजेतेपदाच्या चषकासह लक्ष्य सेन

मी खूप उत्साहित आहे, आता पुढील हंगामाची वाट पाहत आहे. आज आणि या आठवड्यात मी ज्या पद्धतीने खेळलो त्यावर मी खरोखरच खूश आहे, असे तो म्हणाला.

चांगली सुरुवात करणे व शेवटच्या सेटमध्ये गती राखणे महत्त्वाचे होते कारण पहिल्या सेटमध्ये ते अगदी बरोबरीचे होते.

मला चांगली आघाडी मिळाली आणि मी ती पूर्ण करू शकलो. दुसरा सेट चांगल्या पद्धतीने सुरू झाला आणि नंतर मी आघाडी कायम ठेवत सामना संपवला, असे त्याने सांगितले.

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता लक्ष्यने २०२४ मध्ये लखनौ येथे सय्यद मोदी इंटरनॅशनलमध्ये शेवटचा सुपर ३०० किताब जिंकला होता. तथापि, त्याच वर्षी कॅनडा ओपनमध्ये विजय मिळवल्यानंतर तो अव्वल दर्जाचा किताब गमावून बसला. तो सप्टेंबरमध्ये हाँगकाँग सुपर ५०० विजेतेपदाचा समीप आला होता, परंतु त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

जागतिक क्रमवारीत २६ व्या स्थानावर असलेल्या तनाकाचा सामना करताना, या वर्षी ऑर्लियन्स मास्टर्स आणि यूएस ओपनमध्ये दोन सुपर ३०० किताब जिंकणाऱ्या लक्ष्यने एकही गेम न गमावता स्पर्धा संपवण्यासाठी स्पष्ट नियंत्रण, तीक्ष्ण स्थान आणि स्वच्छ कामगिरी दाखवली.

या विजयासह, विद्यमान राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा विजेता, या हंगामात बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर किताब जिंकणारा दुसरा भारतीय ठरला, आयुष शेट्टीने अमेरिकन ओपनमध्ये पहिला सुपर ३०० किताब जिंकल्यानंतर लक्ष्य सेनने बाजी मारली.

सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टीने हाँगकाँग आणि चायना मास्टर्समध्ये अंतिम फेरी गाठली होती, तर किदाम्बी श्रीकांतनेही वर्षाच्या सुरुवातीला मलेशिया मास्टर्समध्ये उपविजेतेपद पटकावले होते. (वृत्तसंस्था)

### ईस्ट बंगाल एएफसीचे आव्हान संपुष्टात

**वुहान, २३ नोव्हेंबर**

रविवारी उझबेकिस्तानच्या पीएफसी नासाफकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर ईस्ट बंगालला एएफसी महिला चॅम्पियन्स लीग गट फेरीतून बाहेर व्हावे लागले.

दियोराखोन खाबीबुल्लाएवाने (१८ व्या आणि ९०+८) दोन गोल केले, तर झारिना नोरबोएवाने ५२ व्या मिनिटाला गोल केला.

ईस्ट बंगालने पदार्पणाच्या मोहिमेचा शेवट तीन गुणांसह केला. त्यांना तिसऱ्या क्रमांकाच्या दोन सर्वोत्तम संघांपैकी एक म्हणून स्थान मिळविता आले नाहीत. (वृत्तसंस्था)

## दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वन-डे मालिकेसाठी राहुल कर्णधार

**नवी दिल्ली, २३ नोव्हेंबर**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी रविवारी वरिष्ठ फलंदाज के. एल. राहुलची भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली, तर अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा आठ महिन्यांच्या विश्रांतीनंतर संघात परतला.

कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात झालेल्या मानेच्या दुखापतीमुळे नियमित कर्णधार शुभमन गिल मालिकेतून बाहेर पडल्यानंतर राहुलला संघाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. दक्षिण आफ्रिका मालिकेचे अल्पकालीन ध्येय लक्षात घेऊन राहुलला कर्णधारपद देण्यात आले आहे. राहुलचे कर्णधारपद एकदाचे आहे आणि ते एकाकीपणाने पाहिले पाहिजे. गत एका वर्षात ऋषभ पंतचा विचार करण्यात आला नाही, कारण त्याने केवळ एकच एकदिवसीय सामना खेळला आहे. निवडकर्त्यांना अशी अपेक्षा आहे की शुभमन गिलची मानेची दुखापत बरी होईल आणि तो न्यूझीलंडविरुद्ध (जानेवारी २०२६ मध्ये ३ एकदिवसीय सामने) परत येईल, असे बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले.

ही मालिका ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे सुरू होईल त्यानंतर रायपूर (३ डिसेंबर) आणि विशाखापट्टणम (६ डिसेंबर) येथे सामने होतील.





सोलापूर : स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात १२ व १७ वर्षांखालील गटातील विजेते व उपविजेते मुले व प्रशिक्षक झेड.एम. पुणेकर

## विनोद मगजी व अनुष्का रावत विजेते

### रोटरी क्लबच्या टेबल टेनिस स्पर्धा : अन्य गटात वीरेन माळवे, शिवानी सानप, राजवर्धन तिवारी व वेदांकित पाटील अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर -**

रोटरी क्लब सोलापूर व सोलापूर ज़िल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष व महिला एकेरीत विनोद मगजी व अनुष्का रावत यांनी अजिंक्यपद पटकाविले.

इंदिरा गांधी स्टेडियमवरील मुळे पॅव्हेलियनमध्ये झालेल्या या स्पर्धेत १२ वर्षांखालील गटात वीरेन माळवे व शिवानी सानप तर १७ वर्षांखालील गटात राजवर्धन तिवारी व वेदांकित पाटील यांनी अजिंक्यपदाचा मान मिळविला.

या स्पर्धेत ५० स्पर्धाकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्घाटन रोटरीच्या अध्यक्षा धनश्री केळकर व टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्राधान यांचे हस्ते झाले.

या प्रसंगी रोटरीचे सेक्रेटरी निलेश पोफलिया, रोटेरियन पार्थ दावडा, सुनील मदान व सेक्रेटरी झेड. एम. पुणेकर व सिद्रामप्पा मनोली आदी उपस्थित होते.

**अंतिम निकाल (विजयी व उपविजयी)**

**१२ वर्षांखालील- मुले :** वीरेन माळवे वि वि अक्षित ऐनापुरे (३-०) **मुली :** शिवानी सानप वि वि आरोही पातेड (३-०).

**१७ वर्षांखालील- मुले :** राजवर्धन तिवारी वि वि औधूत चौधरी (३-१). मुली : वेदांकिता पाटील वि वि अनुष्का रावत (३-१).

**पुरुष एकेरी :** विनोद मगजी विवि श्रीकांत असावा (३-०). **महिला एकेरी :** अनुष्का रावत वि वि वेदांकिता पाटील (३-०)







वेदांकिता अनुष्का शिवानी

## आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालय उपविजेता



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

शहर आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले. संघास क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी , मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे व सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले.

**उपविजयी संघ :** यश जाधव, युग जाधव, सोहम जानराव, अथर्व हब्बु, सोहम गायकवाड, अरहान इनामदार, कृष्णा कांबळे, विश्वनाथ जाने, श्लोक लामकाने, आनंद शिंदे, विठ्ठल धोत्रे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### कत्तलखान्याकडे जाणारे जनावराचे वाहन पोलीसांनी पकडले

**मंगळवेढा दि. २३ नोव्हेंबर -**

महिंद्रा कंपनीच्या बोलेरो गाडीत ३ जर्शी गायींना क्रुरपणाची वागणूक देवून त्यांची कत्तक करण्याच्या उद्देशाने घेवून जात असताना पोलीसांनी जनावरे बोलेरो वाहनासह २ लाख २५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन निलेश जालिंदर पवार (रा. जगतापवाडी जि.सातारा) याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सत्यजीत कळकुंबे (रा.कासेगाव पंढरपूर) हे दि.२३ रोजी रात्री २.१५ वाजता मंगळवेढ्यातील हजारे पेट्रोल पंपासमोर असताना अमोल घाडगे व निलेश पवार या दोघा आरोपींनी त्यांच्या ताब्यातील महिंद्रा बोलेरो वाहन क्रमांक ०९ ई.एम.९१८३ यामध्ये एकूण ३ जर्शी गायी दाटीवाटीने भरुन आखूड दोरीने बांधून क्रुरपणाची वागणूक देवून कत्तल करण्याच्या उद्देशाने घेवून जात असताना मिळून आल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास महिला पोलीस हवालदार सुनिता ताई चवरे ह्या कसोशीने करीत आहेत.



### मंगळवेढा-मरवडे मार्गावर मोटर सायकलच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू

**मंगळवेढा दि. २३ नोव्हेंबर -**

मंगळवेढा-मरवडे मार्गावरुन पायी चालत निघालेल्या हणमंत मधुकर गवळी (वय ३६) या तरुणाला पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मोटर सायकलस्वाराने जोराची धडक देवून गंभीर जखमी करुन त्याच्या मरणास कारणीभूत ठरल्याप्रकरणी मोटर सायकलस्वार इरफान गडवाल (रा.सोलापूर) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनुसार यातील फिर्यादी समर्थ गवळी (रा.भालेवाडी) यांचे चुलते तथा मयत हणमंत गवळी हे दि.१९ रोजी सायंकाळी ७.१५ वाजता मंगळवेढा-मरवडे मार्गावरुन घराकडे जात असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेली मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ ई.एल.११७५ वरील चालक तथा आरोपी इरफान गडवाल याने जोराची धडक देवून गंभीर जखमी करुन मृत्यूस कारणीभूत ठरला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान जखमीला उपचाराकरिता घेवून जाणे अपेक्षीत असताना त्याने नेले नाही. याचा अधिक तपास पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

### फटेवाडी येथून २५ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची पोलीसात तक्रार

**मंगळवेढा दि. २३ नोव्हेंबर -**

मंगळवेढा शहरात फटेवाडी येथून लॅबच्या कामानिमित्त गेलेला प्रदीप अनिल पवार (वय २५) हा तरुण बेपत्ता झाला असल्याची तक्रार त्याच्या वडिलाने मंगळवेढा पोलीसात दिली असून पोलीस त्या तरुणाचा कसून शोध घेत आहेत. या घटनेची हकीकत अशी,यातील तक्रारदार अनिल पवार हे दि.२२ रोजी सकाळी ८ वाजता त्यांच्या पत्नीसह कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यावेळी मुलगा प्रदीप हा एकटाच घरी होता. तो मंगळवेढा येथे लॅब व्यवसाय करीत असल्याने दररोज सकाळी ९ वाजता जातो व संध्याकाळी ९ वाजता घरी फटेवाडी येथे येतो. त्या दिवशी रात्री ९ पर्यंत तो घरी परतलाच नसल्याने त्याच्या मोबाईलवर फोन केला असता फोन बंद लागला. तद्नंतर रात्री उशीरापर्यंत तो घरी आला नसल्यामुळे सर्वत्र शोधाशोध केली,मात्र तो मिळून आला नाही. त्याचे वर्णन उंची ५.५ फुट,रंग गोरा,अंगात नेसणेस शर्ट व पँट,शरीर बांधा सडपातळ,शिक्षण बी.ए.,बोली भाषा मराठी अशा वर्णनाचा मुलगा कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

### झोक्यावरून पडल्याने तरूणीचा मृत्यू

**सोलापूर,दि.२३ नोव्हेंबर-**

शहरातील मार्कंडेय उद्यानात रविवारी दुपारी झोका खेळत असताना एक तरुणी झोक्यावरून खाली पडली.डोक्यास गंभीर जखम झाल्याने त्या तरुणीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.आयेशा रफीक नदाफ (वय २६ रा. शास्त्री नगर सोलापूर)असे मयत झालेल्या तरुणींचे नाव आहे. आयेशा ही रविवारी दुपारी मार्कंडेय उद्यानात गेली होती, त्या ठिकाणी असलेला झोक्यावर बसली,झोका खेळत असताना झोक्यावरून खाली पडली, तीच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली होती,तीस बे शुध्द अवस्थेत भाऊ अब्बास आली याने सिव्हिलमध्ये उपचारासाठी दाखल केले,ती उपचारापूर्वीच मयत झाली होती.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

### सराफाकडील आयकरची तपासणी अखेर संपली, ४ दिवस झाली चौकशी

**सोलापूर,दि.२३ नोव्हेंबर-**

आपटे यांच्या दालनाबरोबर रविवारी नाराणपेठकर यांच्या सुवर्ण पेढ्या ग्राहकांसाठी खुल्या झाल्या होत्या. चार दिवसांपासून आयकर विभागाकडून सुवर्णपेढ्यामध्ये करण्यात आलेल्या तपासणीमध्ये आवश्यक ती कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. तपासणी अंती काही अनियमितता आढळल्यास पथक पुन्हा तपासणीसाठी येवू शकते असे सूत्रांनी सांगितले. बुधवारी (ता. १९) अधिकाऱ्यांची पथके शहरात आली. सराफांसह वकील, बांधकाम व्यावसायिकांची निवासस्थाने, कार्यालये यांचा ताबा घेऊन तपास सुरू केला. चार दिवसापासून तपास सुरूच होता,तपास पूर्णत्वाला आला आहे. आयकर विभागाने अनेक कागदपत्रे ताब्यात घेतलेली आहेत. त्यानुसार आयकर विभागाकडून पुढील कारवाई होईल. शनिवारी आपटे यांचे दालन सुरु झाले तर रविवारी नारायणपेठकर यांच्या सुवर्ण पेढ्या ग्राहकांसाठी सुरु केल्या होत्या. ग्राहकांची दुकानामध्ये रेलचेल दिसत होती.

### योगिनी सोनलकर यांचे निधन



**सांगोला,दि.२३ नोव्हेंबर -**

सांगोला येथील महिला सूतगिरणीच्या माजी संचालिका व डॉ.मच्छिंद्र सोनलकर यांच्या पत्नी योगिनी सोनलकर (वय-६१) यांचे अल्पशा आजाराने रविवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. डॉ.अभिजित सोनलकर यांच्या त्या मातोश्री होत्या.

# तीन तारखेला मी पुन्हा येईन : उपमुख्यमंत्री शिंदे

## मोहोळमध्ये गुलाल उधळण्यासाठी बोलावण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२३ नोव्हेंबर-**

मोहोळ शहरासाठी ३ हजार कोटीचा विकास आराखडा मंजूर केला. आम्ही शब्द देणारे माणसे आहोत आणि तो पाळतो म्हणून मोहोळकरांनी धनुष्यबाणाच्या पाठीशी उभे राहून मला ३ तारखेला गुलाल उधळायला बोलवा अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोहोळ येथील प्रचारसभेत व्यक्त केली.

मोहोळ तालुका शिवसेनेच्यावतीने मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी प्रचार सभा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते व्यासपीठावर ओमदार राजू खरे, राष्ट्रवादी(अजित पवार) चे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील शिवसेना (शिंदे)चे ज जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, शिवसेनेच्या नगराध्यक्षाच्या उमेदवार सिद्धी राजू वस्त्रे, माजी नगराध्यक्षतथा शिवसेना (शिंदे)ओबीसी विभागाचे म हाराष्ट्राचे अध्यक्ष रमेश बारसकर आदीसह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले मी मी बाळासाहेबांचा कडवट शिवसैनिक असून एकदा शब्द दिला की तो पाळतो



म्हणून मोहोळचा विकास करायचा असेल तर शिवसेनेच्या हातात सत्ता द्या असे आवाहन केले . शब्द देताना आम्ही विचार करतो आणि तो पाळतोय.पुढे बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की येथील शिवसैनिक पंडित देशमुख याचे बलिदान वाया जाऊ देणार नाही चुकीला माफी नाही शिक्षा झाली पाहिजे आणि ती होणार चुकीला माफी नाहीअसा इशारा त्यांनी दिला .

प्रारंभीशिवसेना शिंदे गटाचे राज्याचे ओबीसी प्रमुख आणि मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी या प्रास्ताविक करताना माजी आमदार यांनी मोहोळ शहराचा विकास कसा थांबवला याबाबतची माहिती कथन केली .

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी आपल्या खास शैलीत मनोगत व्यक्त करताना माजी आमदार यशवंत माने यांनी मोहोळ मतदार संघात वसुली सुरू केली असे सांगत तालुक्यामध्ये वाढलेली दहशत गुंडगिरी संपवली पाहिजे संपवली पाहिजे शिवसैनिक पंडित देशमुख यांना उचलून नेऊन मर्डर केला अडीच वर्ष त्यांना दिली तर मोहोळ मध्ये शिवसैनिकाचा मर्डर केला जातो पुढील काळात त्यांना सत्ता दिली तर ते काय करतील याचा विचार गांभीर्याने करणे गरजेचे असून त्यांना सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा असे सांगत मोहोळ मध्ये आमची एकी होती म्हणून आम्ही त्यांना ओळखू शकलो .त्यांनी त्यासाठी शिवसेनेच्या नेत्या बरोबर मिलीभगत केली.

> मी शब्द देत नसतो आणि दिला तर दिलेला शब्द पाळत असतो, असे सांगत असतानाच 'कमेंटमेट तो हम करते नही, एक बार कमेंटमेंट कर दिया तो हम खुद की भी नही सुनते,' असा फिल्मी डायलॉग उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मारला

अनगर मध्ये सुरक्षा घेऊन उज्वला थिटे यांना उमेदवारी भरण्यासाठी जावे लागले जर मोहोळमध्ये त्यांना सत्ता दिली तर पुढच्या काळात मोहोळकरांनाही उमेदवारी भरण्यासाठी जाताना सुरक्षा रक्षक घेऊन जाव लागेल यासाठी बाहेरची घाण मोहोळ मध्ये येऊ देऊ नका असे ते म्हणाले उपमुख्यमंत्री तथाराज्याचे नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाली की आम्हाला खुर्चीचा मोह नाही खुर्ची ही जनतेच्या हितासाठी आहे ज्यांनी खुर्चीवर बसवलं त्यांचं काम करणं महत्त्वाचं आहे निधी मिळेलच निधीची कमतरता पडू देणार नाही निर्भयपणे लोकांना जगता आलं पाहिजे दहशतवाद गुंडगिरी रोखण्यासाठी परिवर्तन होणे यासाठी परिवर्तन करा असे ते म्हणाले

## मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रमातून बेरोजगारांना उद्योजक होण्याची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि.२३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाने सुशिक्षीत बेरोजगारांना स्वतः च्या पायावर उभे राहता यावे यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम अंतर्गत बेरोजगारांना उद्योग उभारण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या योजनेअंतर्गत युवक व युवतींना नवीन उद्योग सुरू करण्यासाठी उत्पादन क्षेत्रात ५० लाखापर्यंत तर सेवा क्षेत्रात २० लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्याची महत्त्वकांक्षी योजना आहे.

यावर तब्बल पस्तीस टक्के अनुदान देण्यात येणार आहे. राज्यात सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी याअंतर्गत नवीन व्यवसायासाठी १५ ते ३५ टक्के एवढी सबसिडी देण्यात येणार आहे. यासाठी बँकेकडून कर्ज घेताना कर्जासाठी व्यवहार, पात्रता स्कोअर, आवश्यक कागदपत्रे महत्वाची ठरणार आहेत. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील सुशिक्षीत तरूण व तरूणांना कारागीर, स्वतः चा व्यवसाय करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी ही योजना शासनाने हाती घेतली आहे. कर्जाची नियमीत परतफेड केल्यावर सबसिडी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे .ग्रामीण भागातील युवकांसाठी २५ टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. याचा लाभ कारागीर, स्वतःचा व्यवसाय सुरू करणारे व महीला बचत गटाला सुद्धा देण्यात येणार आहे.

> सरकारच्या या योजनेमुळे सुशिक्षीत बेरोजगारांना व्यवसाय करण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. ही योजना अत्यंत चांगली आहे.
>
> **- वैभव पाटील,**
> **सुशिक्षीत बेरोजगार.**

### निकष व पात्रता

यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. १० लाख रुपयांपर्यंत प्रकल्पासाठी सातवी पास असणे आवश्यक आहे. तर २५ लाखांवरील रूपये कर्जासाठी बारावी पास असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने यापूर्वी राज्य व केंद्र शासनाच्या स्वरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

# मंत्री मंगलप्रभात लोढा यांना काँग्रेसचे आ. अस्लम शेख यांनी दिली धमकी

## आ. शेख यांच्या कार्यालयाजवळ स्थानिकांचे जोरदार आंदोलन, गुन्हा दाखल करण्यासाठी भाजप नेत्यांचाही ठिय्या

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२३ नोव्हेंबर-**

बांगलादेशी आणि रोहिंग्यांच्या घुसखोरी विरोधात सातत्याने आवाज उठवणारे मुंबई उपनगरचे सह पालक मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांना मालवणीचे काँग्रेस आमदार अस्लम शेख यांनी दिलेल्या धमकी नंतर तिथले वातावरण तापले आहे. हजारो स्थानिक नागरिकांसह रविवारी भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते मालवणीच्या रस्त्यावर उतरले. बांगलादेशी आणि रोहिंग्यांना पळवा, मुंबई वाचवा, देशाच्या सुरक्षेशी खेळू देणार नाही.

आंदोलनातील या घोषणांनी मालवणनीचा परिसर दणाणून गेला होता. धमकी देणारे अस्लम शेख यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, मागणीसाठी मालवणी पोलीस ठाण्यात भाजप नेत्यांनीही यावेळी ठिय्या आंदोलन केले. मालवणीचे काँग्रेस आमदार अस्लम शेख बांगलादेशी आणि रोहिंग्यांच्या घुसखोरीला खतपाणी घालत असून देशाच्या सुरक्षेशी खेळत असल्याच्या अनेक तक्रारी मुंबई उपनगरचे सह पालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी केल्या होत्या. यावर सातत्याने प्रशासनाशी पाठपुरावा करून त्या भागात अनधिकृत बांधकामाच्या विरोधात कारवाई करण्यात येत आहे. याचा राग मनात धरून शेख यांनी मंत्री लोढा यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला संपवण्याची जाहीररीत्या भाषा केली आहे. या धमकीच्या संदर्भात लोढा यांनी मुंबई पोलीस आयुक्तांकडे तक्रार देखील केली आहे. आता याचे पडसाद उमटत असून स्थानिक नागरिक रस्त्यावर उतरले आहे. हा लढा अधिक तीव्र होताना दिसत असून स्थानिकांनी




शेख यांचे बॅनर फाडून आपला रोष व्यक्त केला.

स्थानिकांसह भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्तेही या आंदोलनात सहभागी झाले. स्थानिकांच्या आंदोलनात भाजप नेते आमदार अतुल भातखळकर, प्रवीण दरेकर , मनीषा चौधरी आणि संजय उपाध्याय देखील या आंदोलनात सहभागी झाले. यावेळी संजय उपाध्याय म्हणाले की, राज्याच्या मंत्री पदावर असलेल्या व्यक्तीला एखादा आमदार जीव म ारण्याची धमकी देतो हे अतिशय गंभीर आहे.

याचा आम्ही कायद्याचे पालन करून विरोध करत आहोत, पण शेख यांना समजेल अशा भाषेत देखील आम्ही उत्तर देऊ शकतो. तर बांगलादेशी आणि रोहिंग्यांच्या घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, जे या घुसखोरांना पाटबळ देत आहेत, त्यांच्या विरोधात कडक कारवाई झाली पाहिजे. आमदार अस्लम शेख यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, यासाठी आम्ही मालवणी पोलीस ठाण्यात देखील ठिय्या दिला आहे. त्यानुसार पोलीस प्रशासन कारवाई करेल असेही, आमदार प्रवीण दरेकर यांनी यावेळी सांगितले.

हा केवळ भाजप विरुद्ध काँग्रेस असा हा संघर्ष नाही तर, देशाच्या सुरक्षेसंदर्भात जनता विरुद्ध काँग्रेस असा हा संघर्ष असल्याचे आमदार श्री. अतुल भातखळकर यावेळी म्हणाले. या आंदोलनात भाजप युवा मोर्चाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, महिला पदाधिकारी यांच्यासह सकल हिंदु समाजाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. आमदार अस्लम शेख यांच्या विरोधात त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# हिंदू धर्मरक्षक श्री गुरु तेगबहादुर यांचे अविस्मरणीय बलिदान



***शिखांचे नववे गुरु तेगबहादुर यांच्या हिंदू धर्मासाठी झालेल्या अविस्मरणीय बलिदानाला २४ नोव्हेंबर २०२५ रोजी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त स्मरण. गुरु तेगबहादुर यांचा जन्म अमृतसर येथे १एप्रिल १६२१ या दिवशी झाला. सहावे गुरू हरगोविंद हे त्यांचे वडील व माता नानाकी ही त्यांची आई. त्यांचे मूळ नाव त्यागमल!तेग म्हणजे तलवार. तलवारबाजीत निष्णात असणारे आणि सन १६३५ मधील मुघलांविरोधात कर्तारपूरच्या लढाईत अद्वितीय पराक्रमामुळे त्यांचे नाव तेगबहादुर म्हणून प्रचलित झाले. लहानपणीच त्यांना भाई बुढा व भाई गुरुदास यांनी नेमबाजी व घोडेस्वारीचे प्रशिक्षण दिले.***

शिखांचे आठवे गुरू हरि क्रिशन यांनी अंत्यसमयी बाबा बकाला हे शब्द उच्चारून भावी गुरूंचे नाव सूचित केले. बकालाचे बाबा वा साधुपुरुष म्हणजे शिखांचे नववे गुरु तेगबहादुर होय. गुरुपदी पोहचण्यासाठी त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. बाबा बकाला या शब्दाचा अर्थ आकलन न झाल्याने बकाला येथे गुरुपदासाठी अनेक इच्छुक तयार झाले होते. परंतु अखेर ११ ऑगस्ट १६६४ रोजी तेगबहादुर गुरू म्हणून घोषित झाले. भाई बुढा यांचा मुलगा भाई गुरुदत्त यांनी नवीन गुरूंच्या कपाळी टिळा लावून शिखांचे नववे गुरु निश्चित केले. त्यावेळी गुरु तेगबहादुर यांचे वय ४३ वर्षे होते. त्यांनी देशभर प्रवास केला. कर्तारपूरपासून जवळ जुन्या माखोवाल या खेड्याच्या जागी चाक नानकी या गावाची स्थापना केली ह्याचाच काही भाग पुढे आनंदपूर या नावाने प्रसिद्ध झाला.

गुरूंनी वेद,पुराण आणि उपनिषदांचा अभ्यास केला होता. ते आध्यात्मिक क्षेत्रात विद्वान तर होतेच, तर उत्तम कवी सुद्धा होते. त्यांनी रचलेली ११५ भजनं श्रीगुरुग्रंथ साहिब या पवित्र ग्रंथात सामील आहेत.१६५७ मध्ये औरंगजेब सत्तेवर आल्यापासूनच अत्याचार सुरू झाले. अनेक देवळांचा त्याने विध्वंस केला. सोमनाथ, मथुरा, काशी विश्वेश्वर ही प्रख्यात मंदिरे पाडण्यात येऊन तेथे मशिदी बांधल्या. नव्याने देऊळ बांधायला बंदी, हिंदूंच्या पाठशाळा बंद करून त्याच्यावर जिझिया कर लावण्यात आला. दिवाळीत दिवे लावायला बंदी, होळी साजरी करण्याला प्रतिबंध, हिंदू यात्रा बंदी असे अनेक जुलुमी नियम त्याने लादले. त्याच्या काळात हिंदूंना दुप्पट कर द्यावा लागत असे.काश्मीरचा मुघल सुभेदार शेर अफगाण खान याने काश्मीरमध्ये हिंदूंचे सक्तीने धर्मांतर सुरू केले. मोठ्या प्रमाणावर अत्याचार झाल्यावर काश्मिरी पंडितांचे शिष्टमंडळ गुरू तेगबहादुर यांच्याकडे आले. त्यावेळेस त्यांना सहाय्यासाठी पंजाबमध्ये शीख गुरूकडे जावेसे वाटले हे महत्त्वाचे आहे. आनंदपूरला शीख सभेत हिंदूवरील अत्याचाराचे वर्णन ऐकून तेगबहादुर यांचे मन खिन्न झाले. त्यावेळेस त्यांचा लहान मुलगा गोविंदराय आपल्या वडिलांची स्तब्धता पाहून त्याने आपण बोलत का नाही असा प्रश्न केला, त्यावर गुरू म्हणाले की, मोगलांचे अत्याचार चालू आहेत, कोणी शूर योद्धा दिसत नाही. जो आपले प्राण पणाला लावेल तोच या अत्याचारापासून हिंदूंची सुटका करेल. त्यावर लहान गोविंदराय म्हणाला की आपल्याहून दुसरा योग्य पराक्रमी कोण आहे? त्यावर आपल्या मनातली गोष्ट लहान मुलाने बोलून दाखवली ह्यावर त्यांनी निर्णय घेतला आणि काश्मिरी पंडितांना ते म्हणाले की, नववा शीख गुरु गुरूनानक यांच्या आसनावर बसला आहे. तोआमच्या धर्माचा रक्षणकर्ता आहे. प्रथम त्याला मुस्लिम करा. मग आम्ही सुद्धा मुस्लिम होऊ! हा निरोप औरंगजेबाला कळवा.काश्मिरी पंडितांकडून असा निरोप औरंगजेबाला गेल्यावर तेगबहादुर यांना अटक झाली. आपल्या गुरुला शीख सच्चा पातशहा म्हणतात याबद्दल तसेच तेगबहादुर यांच्या नावातील बहादूर या शब्दावर औरंगजेबाचा रोष होता. त्याने तेगबहादुर आणि त्यांच्या बरोबर असलेल्या शिष्यांपुढे मुस्लिम होण्यासाठी पर्याय ठेवण्यात आला. तो त्यांनी धुडकावून लावला. याशिवायही अनेक पर्याय त्यांच्या समोर ठेवण्यात आले. परंतु ते सर्व नाकारल्याने शेवटी क्रूरपणे छळ सुरु केला. त्यांचे शिष्य मतीदासांना दिल्लीतील चांदणी चौकात दोन खांबांना बांधून डोक्यापासून खाली करवतीने चिरून टाकण्यात आले. तर शिष्य दयालदास यांना उकळत्या तेलात टाकून ठार मारण्यात आले.आपल्या प्रिय शिष्यांनी धर्मासाठी दिलेले बलिदान बघून तेगबहादुर डगमगले नाहीत. अखेर पर्यंत त्यांच्या पुढे मुस्लिम धर्म स्वीकारण्याचा आणि सुटका करून घेण्याचा पर्याय ठेवला होता. पण तेवढ्याच धैर्याने ते प्रसंगाला सामोरे गेले,आपला मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना सुद्धा त्यांनी आपला धर्म सोडला नाही व इस्लामचा स्वीकार केला नाही.परिणामी चांदणी चौकातील कोतवालीत गुरू तेगबहादुर यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज तेथे शीश गंज साहिब नावाचा गुरुद्वारा आहे. वयाच्या ५४ व्या वर्षी त्यांना हौतात्म्य आले. ह्यामध्ये औरंगजेबाचा पराभव झाला. बलिदानाने आपला धर्म आपल्या प्राणापेक्षा प्रिय आहे हे सिद्ध केले. बलिदानाची प्रेरणा घेऊन हिंदू समाज पुढे कायमच धर्मांतर विरोधी लढत राहिला. शिखांच्या आणि हिंदुस्थानाच्या इतिहासातील ही प्रेरणादायी आणि स्फूर्तिदायक घटना. गुरु अर्जुनानंतर हुतात्मा झालेले दुसरे गुरु म्हणजे तेगबहादुर!हिंदूंचे रक्षणाकरिता त्यांनी हौतात्म्य स्वीकारले.

यंदा त्यांच्या बलिदानांला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. गुरु तेगबहादुर बलिदानाचे स्मरण म्हणून देशभरात त्यांना वंदन करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र सरकार आणि हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादुर साहीबजी ३५० वी शहिदी समागम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तीन मोठ्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये दि.७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मा.योगी आदित्यनाथजी, तर दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे केंद्रीय गृहमंत्री मा.अमितजी शहा , तसेच दि.२४ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. त्याचबरोबर रथ यात्रा, लॉकेट वितरण, निबंध स्पर्धा इत्यादी उपक्रम समिती व महाराष्ट्र सरकार राबविणार आहेत. शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंग आणि तेगबहादुर यांचे पुत्र आपल्या पित्याच्या जीवनाविषयी नमुद करतात की, धरम हेत साका जिनि की, सीसु दिआ परू सिसरु न दिआ!इतिहास गुरू तेगबहादूर यांचे धर्मासाठीचे हे बलिदान कधीच विसरणार नाही. हिंद दि चादर म्हणून प्रसिद्ध असलेले महान, पराक्रमी गुरुंना आणि त्यांच्या जीवनकार्याला शतशः नमन!..

**- किशोर चव्हाण**
प्रांत मंत्री. विश्व हिंदू परिषद
प.महाराष्ट्र

# भाजपातील मेगा भरतीच्या विरोधात निष्ठावंतांतून उमटतोय नाराजीचा सूर

## पक्षांतर्गत कार्यक्रमांना जावे की नाही? याबाबत विचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपालिकांसह राज्याती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धडाका चालू आहे. मात्र या निवडणुकीपुर्वी इतर पक्षातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची भाजपात मेगा भरती करण्यात आले. या मेगा भरतीच्या विरोधात निष्ठावंतांतून नाराजीचा सूर उमटत आहे. इतर पक्षातील लोकांची खोगीर भरती करताना आम्हाला विश्वासात घेतले नाही. त्यामुळे पक्षांतर्गत कार्यक्रमांना जावे की नाही? याबाबत आम्ही विचार करु लागलो, असे भाजपाच्या अनेकांनेक निष्ठावंतांनी दैनिक सोलापूर तरुण भारतकडे बोलून दाखविले.

ज्या-त्या जिल्ह्यातील स्थानिक नेतेमंडळींना या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे अधिकार भाजपच्या हायटेक नेत्यांनी दिले आहेत. यामुळे सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे आपल्या विश्वासातील स्थानिक लोकप्रतिनिधींना घेवून भाजपाचे संघटन वाढवू लागले आहेत; ही चांगली गोष्ट आहे. मात्र त्यांनी जुन्या कार्यकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याची गरज असल्याचे मत या बुजुर्ग मंडळींचे येत आहे.

आम्ही शहर कार्यकारिणी, महानगरपालिकेत विविध पदांवर काम केले आहे. महापालिकेत आणि शहर-जिल्ह्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची बलाढ्य सत्ता असताना आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, माजी महापौर किशोर देशपांडे, शिवाजी सोनार, शंकर वाघमारे, शहाजी पवार, रामचंद्र जन्नू, पांडुरंग दिड्डी, विष्णू जगताप, नागेश वल्याळ, मधुकर वडनाल, सुरेश पाटील, शशिकला बत्तूल, बंडु कुलकर्णी, शोभा नष्टे, शोभा कुलकर्णी, अनुजा कुलकर्णी, मल्लेशप्पा कावळे, राजकुमार पाटील यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजप पक्षासाठी अहोरात्र काम केले आहे, अनेकांचा विरोध पत्करला आहे.

इतकेच कायतर तत्कालिन भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांनीही भाजपा शहरात वाढविण्यात मोठे योगदान दिले आहे. यातील काही मंडळी आजही राजकारणात सक्रीय आहेत मात्र अनेकांना पक्षाकडून कसलीच संधी मिळत नसल्याची खंतही काही निष्ठावंतांनी बोलून दाखविली.

सध्या भाजपात चालू असलेले प्रवेश भविष्यातील राजकीय गणितांनुसार आणि समीकरणांनुसार चालू आहेत. इतर पक्षातील नेते, माजी नगरसेवक, माजी उपमहापौर आदींना भाजपमध्ये येण्याचे वेध लागले आहेत. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी प्रवेशाचा धमाका चालू केला असून, काही आमदारांनाही त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत वर्षावर बैठक लावून पक्षात घेतले आहे. मित्रपक्ष असणाऱ्या अजित पवार गटालाही गोरे यांनी जोरदार धक्का दिला आहे.

पालकमंत्री गोरे यांनी महापालिका व जिल्हा परिषद निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विरोधी पक्ष व मित्र पक्षांना अनेक धक्के देण्याची तयारी सुरू केली असून, याचा मोठा फायदा सोलापूर लोकसभेसह जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला मिळणार आहे. मात्र पक्षातील जुन्या, बुजुर्ग मंडळींशी चर्चा करून आणि त्यांना विश्वासात घेवून पक्षप्रवेश वाढवावे आणि पक्ष संघटन करावे, अशी माफक अपेक्षा आम्हा भाजपा निष्ठावंत कार्यकर्त्यांची आहे, असेही सांगण्यात आले.

# शिक्षक पात्रता परीक्षा
# १ हजार ४२६ परीक्षार्थ्यांनी मारली दांडी

- २० हजार ४२३ जणांनी दिली परीक्षा
- एकाही केंद्रावर कोणताही गैरप्रकार नाही



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेला सोलापुरातील तब्बल १ हजार ४२६ परीक्षार्थ्यांनी दांडी मारली. यामध्ये पेपर क्रमांकच्या ६३४ तर पेपर क्रमांक २ च्या ७९२ परीक्षार्थीचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शखाली सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३४ केंद्रावर ही परीक्षा घेण्यात आली. एकूण २० हजार ४२३ जणांनी ही परीक्षा दिली. दरम्यान, यापैकी एकाही केंद्रावर कोणताही गैरप्रकार घडला नाही.

ही परीक्षा दोन सत्रात म्हणजे सकाळी १०.३० ते दुपारी १ यावेळेत पेपर क्रमांक १ तर दुपारी २.३० ते सायंकाळी ५ यावेळेत पेपर क्रमांक २ घेण्यात आले. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही आणि एआय आधारित तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. तसेच कडक सुरक्षा उपाययोजना आखण्यात आल्या होत्या.

परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया निर्दोष ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि सोलापूर जिल्ह्याचे परीक्षा निरीक्षक राजेश क्षीरसागर यांनी प्रत्येकी पाच तर शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी आठ परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. प्रत्येक केंद्रावर बैठे पथक देखील नियुक्त करण्यात आले होते.

| पेपर क्रमांक | एकूण नोंदणीकृत परीक्षार्थी | उपस्थित परीक्षार्थी | गैरहजर परीक्षार्थी |
|---|---|---|---|
| पेपर १ | ९,३४३ | ८,७०९ | ६३४ |
| पेपर २ | ११,९६२ | ११,१७० | ७९२ |
| एकूण | २१,३०५ | २०,४१३ | १,४२६ |



# आदिला नदीला पुनर्जीवित करणे गरजेचे:डॉ.अनिल नारायणपेठकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

आर्ट ऑफ लिविंग मार्फत सध्या ७७ नदी खोऱ्यावर काम चालू आहे, आदिला नदीवर डॉ.अनिल नारायणपेठकर यानी पीएचडी केली आहे. या आदिला व धुबधुबी नदीचे पुनर्जीवीत करणे गरजेचे आहे व ते काम करायची इच्छा व्यक्त करताना उगमस्थानी केवळ पावसाळी प्रवाहाचे ओहळ असले तरी पुरातन काळात कुठेतरी कायमस्वरुपी वाहणार झरा असावा, असेही त्यांनी सांगितले.

आदिला नदी संवर्धनासाठी जलबिरादरी, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशन यांच्या सहकार्याने रविवारी नदी परिक्रमा करण्यात आली. आदिला नदीच्या पाणलोट क्षेत्रात १३ तलाव आहेत. सुरतगाव तलाव भेट, सांगवी काटी तलाव तीन तलाव क्षेत्रत भेटी दिल्या, उगमस्थानी भेट देउन आदिला नदीच्या पानलोट क्षेत्राच्या विभाजन स्थानापासुन जवळ निघणाऱ्या उगास्थानाचे निरीक्षण केले. शेवटी तेलगाव याथिकानी संगमवर भेट डिली. आदिला नदी मधे येते ६० शिवाराचे (गावांचे) पाणी. या परिक्रमतेत आर्ट ऑफ लिव्हिंगचे जलतज्ज्ञ अनिल नारायणपेठकर, जलबिरादरीचे प्रकल्प संचालक श्रीनिवास वडगबाळकर यांनी मार्गदर्शन केले. या परिक्रमेच्या यशस्वीतेसाठी सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे सीइओ प्रविण रा.तळे, वाइल्ड फोटोग्राफर डॉ किशोर वाघमारे,पर्यावरण मित्र शिरीष गोळवलकर, संजय पैठणकर, पर्यावरण मित्र स्वप्नील पेकम, ओंकार सावन यांनी परिश्रम घेतले.

यावेळी वरदराज जी बँग मालक बँग डाटा फॉर्म्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी या परिक्रमेसाठी, शिवाजी कदम व मल्लिकार्जुन खेड मल्लिकार्जुन लँडमार्क, पद्म राका उद्योगपती यांनी सहकार्य केले.

# मंत्रालयावर धडकणार १० हजार महिला कामगारांचा मोर्चा

## 'सीटू'च्या १७ व्या जिल्हा अधिवेशनामध्ये करण्यात आला निर्धार

- सोलापूर ते मुंबईपर्यंत करण्यात येणार पायी प्रवास
- श्रम संहिता म्हणजे कामगार विरोधी धोरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

विडी कामगारांना दरहजारी ४०२ रुपये वेतन मिळावे, १० हजार रुपये पेन्शन मिळावे, मजुरी बँक खात्याऐवजी रोख स्वरुपात देण्यात यावी, गोदूताई परुळेकर वसाहतीत मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात आदी मागण्यांसंदर्भात १० हजार महिला कामगारांचा मोर्चा मंत्रालयावर धडकणार आहे. विशेष म्हणजे, सोलापूर ते मुंबईपर्यंत पायी प्रवास करण्यात येणार असल्याचा निर्धार 'सीटू'च्या १७ व्या जिल्हा अधिवेशनमध्ये व्यक्त करण्यात आला. सदर मोर्चा १४ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात येणार आहे, असे माजी आमदार नरसय्या आडम यांनी सांगितले.

'सीटू'चे राज्यस्तरीय नेते तथा सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी वसंत पवार याप्रसंगी बोलताना म्हणाले, केंद्र सरकारने २९ विविध कामगार कायद्यांचे चार श्रम संहितांमध्ये केलेले रुपांतर हे कामगार विरोधी पाऊल आहे. नवीन श्रम संहितांत लेबर कोर्ट व लेबर ऑफिसची संकल्पनाच संपवण्यात आली आहे. या कायद्याचा ६० टक्क्यांहून अधिक असंघटित कामगारांवर गंभीर परिणाम होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या या धोरणाच्या विरोधात कामगारांनी एकजुटीने उभे राहणे अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी २१ सदस्यीय पदाधिकारी कमिटी व ६१ सदस्यीय जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. जिल्हा सचिव ॲड.एम.एच. शेख यांनी मागील तीन वर्षांचा राजकीय व संघटनात्मक अहवाल सादर केला. जिल्हा कोषाध्यक्ष दीपक निकंबे यांनी आर्थिक अहवाल मांडला. विल्यम ससाणे यांनी शोकप्रस्ताव मांडला. माजी आमदार नरसय्या आडम यांच्यासह व्यंकटेश कोंगारी, युसुफ शेख, नसीमा शेख, नलिनी कलबुर्गी आदींनी अध्यक्षीय मंडळाचे काम पाहिले. दत्ता चव्हाण आणि किशोर मेहता यांनी अधिवेशनाचे वृत्तांत लेखन केले.

**अधिवेशनात मंजूर झालेले ठराव**

विडी कामगारांचे सुधारित किमान वेतन दरहजारी ४०२ फरकासहित अदा करा. निवृत्त कामगारांना १० हजार रुपये पेन्शन द्या, यंत्रमाग उद्योगातील कामगारांसाठी कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा, असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा लागू करा, जन सुरक्षा कायदा रद्द करा, शहराला दररोज पाणीपुरवठा करा, योजना कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्या, किमान वेतन लागू करा, गोदूताई परुळेकर वसाहतीतील पायाभूत सुविधा उपलब्ध करा, नवीन रे नगर परिसरात रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न करा.

# हैद्राबाद रोडवर अपघात; वृध्दाचा जागीच मृत्यू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२३ नोव्हेंबर-**

नातवाला घेवून राहत्या घराकडे जाणाऱ्या वयोवृद्धांच्या दुचाकीला मालट्रकने धडक दिली,या धडकेत दुचाकीवरील शेळगी येथील वयोवृद्ध व्यक्तीची ट्रकखाली येवून मृत्यू झाला आहे. सुदैवाने त्याच दुचाकीवर पाठीमागे बसलेला नातू वाचला आहे, त्यास काहीच झालेले नाही. ही घटना सोलापूर हैद्राबाद रोड,मुळेगाव क्रॉस रोड या ठिकाणी रविवारी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास घडली आहे. दुबराजम नरसय्या गोसकी (वय ७९ रा. कुमार स्वामी नगर, शेळगी, सोलापूर)अपघातात मयत झालेल्या वयोवृद्ध व्यक्तीचे नाव आहे.

दुबराजम गोसकी हे(एमएच १३ एच ८२२१) दुचाकीवरून मुळेगाव परिसरात गेले होते. काम उरकून ते शेळगी येथील घराकडे निघाले होते. दुचाकीवरून येत असताना त्याच्या पाठीमागे नातू व्हीनेश गोसकी हा देखील होता. नातवाला घेवून दुचाकीवरून जात होते. जात असताना रविवारी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास मुळेगाव क्रॉस रोड येथे हैद्राबाद वरून सोलापूरच्या दिशेने येणाऱ्या मालट्रक(एमएच १२ एमव्ही १२७७) ने धडक दिली. यामध्ये दुबराजम हे ट्रकच्या समोरील चाकाखाली आले,मात्र दुचाकीवर पाठीमागे बसलेला नातू हा दूर फेकला गेला,त्यास काहीच झाले नाही. मात्र ट्रकखाली आलेल्या वयोवृद्धांचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला आहे. ही घटना घडताच महामार्गावर बघ्याची गर्दी झाली होती.

या घटनेची माहिती एम आयडीसी पोलिसांत देण्यात आली. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. अंमलदार खटके हे घटना जखमी व बे शुध्द अवस्थेत असलेल्या दुबराजम यास सिव्हिल रुणालयात दाखल केले. ते उपचारापूर्वीच मयत झाले होते.

# तामलवाडीत एसटी थांब्यासाठी ग्रामस्थांचे निवेदन

## एसटी बस न थांबवल्यास रास्ता रोकोचा इशारा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी एसटी बसस्थानकावर मागील २५ वर्षांपासून सर्व विभागातील जलद, अतिजलद, रातराणी एसटी बस थांबत असताना अचानक एसटी चालक वाहक यांनी मनमानी करीत नवीन तिकीट मशीनमध्ये तामलवाडी बसस्थानक नसल्याचे कारण देत या ठिकाणी बस थांब्यावर एसटी बस थांबवत नाहीत. यामुळे तामलवाडीत सर्व प्रकारच्या एसटी थांब्यासाठी १२ गावातील ग्रामस्थांनी एकत्र येवून परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना दिले. दरम्यान, एसटी बस न थांबवल्यास रास्ता रोकोचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्या दरम्यान पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना याबाबत तामलवाडी परिसरातील दहा ते बारा गावातील ग्रामस्थांच्या वतीने शनिवार, दि.२२ रोजी तामलवाडी टोलनाक्यावर गाडी थांबवून एसटी बस थांब्यावण्याबाबत सुचना कराव्यात, यासाठी निवेदन दिले. या निवेदनात सोलापूर ते धुळे या राष्ट्रीय महामार्गावरील तुळजापूर-सोलापूर या मार्गावरील तामलवाडी हे एसटी बस स्थानक खूप गजबजलेले असून, या परिसरातील दहा ते बारा गावातील अनेक प्रवासी सोलापूर, तुळजापूर, धाराशिव या ठिकाणी दररोज प्रवास करीत असतात. मागील २५ वर्षांपासून सर्व विभागातील जलद, अतिजलद, रातराणी एसटी बस तामलवाडी बस स्थानकावर थांबत असताना अचानक एसटी चालक वाहक यांनी मनमानी करीत नवीन तिकीट मशीनमध्ये तामलवाडी बसस्थानक नसल्याचे कारण देत या ठिकाणी बस थांब्यावर एसटी बस थांबवत नाहीत. त्यामुळे कामावर जाणाऱ्या प्रवाशांची व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. खाजगी वाहतूकही पुर्णपणे बंद असल्याने पर्यायी व्यवस्थाही होत नाही. अनेक गावांमध्ये एसटी बसची सोय नसल्याने त्यांना तामलवाडी येथूनच प्रवास करावा लागतो. तसेच तामलवाडी या ठिकाणी शासकीय कामकाज, पोलीस स्टेशन, वैद्यकीय सुविधा, बँका, शाळा व कॉलेज, कृषी सेवा केंद्र व इतरही अनेक कामकाजासाठी तामलवाडी हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे सोलापूर, नांदेड, जालना, परभणी, संभाजीनगर, बीड, सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर या सर्व आगाराच्या जलद व रातराणी बसेस तामलवाडी एसटी बस थांब्यावर थांबवून प्रवाशी चढ-उतार करण्यासाठी संबधितांना आपण आदेशित करावे, अशी विनंती करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने रस्ता रोको करण्यात येईल असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी बसवराज मसुते, पंकज करंडे, विनायक पवार, विजय लोंढे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# संगणक विज्ञान, अभियांत्रिकी क्षेत्रातील नव्या घडामोडी या विषयावर व्याख्यान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, श्री सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि मराठी विज्ञान परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संगणक विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातील नव्या घडामोडी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

पाहुण्यांचे स्वागत पत्की यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ.श्रीशैल मळेवाडी यांनी करून दिली.

अध्यक्षस्थानी ॲड.आर. एस. पाटील होते. याप्रसंगी प्रा. डॉ. व्यंकटेश गंभीर यांनी संगणक, विज्ञान आणि संस्कृत भाषेचे आपल्या जीवनातील महत्त्व विशद केले.

प्रा.डॉ.अंबा कुलकर्णी यांनी संगणक भाषाविज्ञान, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), संशोधनातील नव्या दिशा, अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगती आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी याविषयीची माहिती दिली.

ॲड. आर. एस. पाटील यांनी प्रा. डॉ. अंबा कुलकर्णी या आमच्या संस्थेच्या माजी विद्यार्थिनी असून त्यांनी जागतिक संशोधन क्षेत्रात केलेले योगदान आमच्यासाठी अभिमानास्पद आहे, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी श्री सिद्धेश्वर ट्रस्टचे विश्वस्त डॉ.राजशेखर येळीकर, गव्हर्निंग बॉडी सदस्य काशिनाथ ढोले, प्रभारी प्राचार्या डॉ.नीता आळंगे, डॉ.टी.ए.चव्हाण, श्रेयस आळंद आदी उपस्थित होते.

प्रभारी प्राचार्या डॉ. नीता आळंगे यांनी पॉलिटेकनिक मध्ये राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व तांत्रिक उपक्रमांची माहिती दिली. श्री सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.टी.ए. चव्हाण यांनी महाविद्यालयातील प्लेसमेंटविषयीची माहिती दिली.

कार्यक्रमात सिद्धिका न्यूजलेटरच्या ३२ व्या अंकाचे (जुलै २०२५ - ऑक्टोबर २०२५) प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. या अंकाचे संपादन प्रा. मंजुषा झिपरे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. एस. एस. चौधरी यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
Digital NEWS
बातमी नव्हे विचार

राजकारण, समाजकारण,
विकास, शहर संस्कृती,
घडामोडी आणि सांस्कृतिक
कार्यक्रमांचा वेध,
आता बातमी मिळणार थेट.
#बातमी नव्हे विचार

## मतदार यादीत घोळात घोळ

# चक्क मुस्लिम घरात हिंदूंची नावे

- कार्यकर्ते गेले ऑन द स्पॉट, मृतांची नावे समाविष्ट
- जिवंत असलेल्यांना दाखविण्यात आले मृत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर-**

मतदार यादीतील घोळबाबत काँग्रेससह विरोधी पक्षाने देशभरात आवाज उठविलेला असताना इकडे सोलापुरात चक्क मुस्लिम घरात हिंदूंची नावे समाविष्ट असल्याची बाब समोर आली आहे. कार्यकर्ते मतदार यादी घेऊन ऑन द स्पॉट तपासणी करायला गेले असता हा प्रकार उघडकीस आला. दरम्यान, निवडणूक प्राधिकरणाकडे तक्रार देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आलेफ


महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिका प्रशासनाने मतदार यादी जाहीर केली. परंतु प्रभाग क्रमांक १५ मध्ये मतदारांच्या संख्येत विसंगती आढळली आहे. विशेष म्हणजे, एका मुस्लिम घरात हिंदूंची नावे समाविष्ट झाली आहेत. तसेच एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागातील मतदार यादीत समाविष्ट करण्यात आल्याचे दिसून आले.

मतदार यादीतील घोळसंदर्भात एकना अनेक उदाहरणे पुढे येत असल्याने सध्याच्या मतदार यादीवर मतदार राजांचा विश्वास ढासळत चालल्याचे सांगण्यात येते. मुस्लिम घरात हिंदूंची नावे कशी काय येऊ शकतात? असा संतप्त सवालही यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.



### सोमवारी कायदेशीर मार्गाने हरकत

गेल्या अनेक वर्षांपासून मतदार यादीवर काम करत आहे. अशा अचानक पध्दतीने नाव यादीतून गायब होत आहेत. मुस्लिम घरात हिंदूंची नावे आहेत. मृत व्यक्ती आणि जिवंत व्यक्तींच्या नावाचा घोळ आहे. प्रत्येकाच्या घरी जाऊन मतदारांची ओळख पटवली जात आहे. सोमवारी यावर कायदेशीर मार्गाने हरकत घेतली जाणार आहे, असे श्रीकांत गायकवाड या कार्यकर्त्याने सांगितले.



महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक प्रभागातील सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते ॲक्टिव्ह मोडवर आले आहेत. महापालिकेचे माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक यांच्यासह निवडणुकीसाठी नव्याने इच्छुक असलेले संभाव्य उमेदवार घरोघरी जाऊन मतदारांची माहिती घेत आहेत. मतदार यादी घेऊन कार्यकर्ते ऑन द स्पॉट मतदारांच्या घरी दाखल होत आहेत.

निवडणूक प्राधिकरणाने जाहीर केलेल्या मतदार यादीत घोळ असल्याची बाब समोर येत असल्याने निवडणूक आयोगाच्या प्राधिकरणावर संशयाची सुई आली आहे. मृत मतदारांची नावे मतदार यादीत कायम आहेत. तर जिवंत असलेले मतदार मृत दाखविण्यात आले. यावरुन बोगस मतदानाचे प्रमाण वाढून निकालाचे चित्र बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### माझ्याऐवजी दुसऱ्याच व्यक्तीचा फोटो

आमच्या कॉलनीत राहणाऱ्या व्यक्तींची नावे एका मतदार यादीत नावे असताना आमची नावे दुसऱ्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यावर माझा फोटो नसून दुसऱ्याच व्यक्तीचा फोटो आहे. माझ्या पत्नीचे नाव फोटो आहे. परंतु माझे नाही, असे नाथा यमगर या मतदाराने सांगितले.



# विरोधकांना चारीमुंड्या चित करा : उपमुख्यमंत्री शिंदे

### अक्कलकोट, दुधनीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकासासाठी आपण मुख्यमंत्री असताना मोठा निधी दिला. भविष्यात हे तीर्थक्षेत्र जागतिक स्तरावर आणू. त्यासाठी विरोधकांना चारीमुंड्या चित करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

अक्कलकोट व दुधनी नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ येथील जुना राजवाडा येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना ते पुढे म्हणाले, अक्कलकोट व दुधनी नगरपरिषदांवर शिवसेनेचा भगवा फडकवा. या नगरपालिकांसाठी विकास निधी कमी पडू दिला जाणार नाही.

माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे याप्रसंगी बोलताना आपल्या काही विरोधकांचे नाव न घेता 'काय होतास तू, काय झालास तू' असा शाब्दिक टोला लगावला. अक्कलकोट, दुधनी व मैंदर्गी या तीनही नगरपालिकांवर शिवसेनेचा भगवा फडकाविण्यासाठी जिवाचे रान करु, रक्ताचे पाणी करु, असेही ते म्हणाले.

यावेळी शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, संपर्क प्रमुख महेश साठे, जिल्हा प्रमुख अमर पाटील, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अनिता माळगे यांच्यासह शंकर म्हेत्रे, बाबा पाटील, प्रियंका परांडे, रविना राठोड, वर्षा चव्हाण, वैशाली हावनुर, शिवराज म्हेत्रे, शितल म्हेत्रे, संजय देशमुर, प्रथमेश म्हेत्रे, रईस टिनवाला आदी उपस्थित होते.

# अनगर वगळता ११ नगरपालिकांच्या प्रचाराचा उडतोय धुराळा

- ११ नगराध्यक्षपदांसाठी ६६ जण आखाड्यात
- नगरसेवकपदांच्या २७२ जागांसाठी ९५१ जण रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर-**

मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली असून सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपालिकांच्या प्रचाराचा धुरळा सुरु झाला आहे. ११ नगराध्यक्षपदांसाठी एकूण ६६ जण आखाड्यात आहेत. तर नगरसेवकपदांच्या एकूण २७२ जागांसाठी ९५१ जण रिंगणात उतरले आहेत.



या निवडणुकीत महायुतीत राजकीय संघर्ष होत असल्याचे दिसून येत आहे. तर इकडे महाविकास आघाडीने मात्र अनेक ठिकाणी एकीची मूठ बांधून निवडणुकीस सामोरे जाणे पसंत केले आहे. दरम्यान, माजी आमदार राजन पाटील यांनी अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध करुन भाजपात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

बार्शी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ६, नगरसेवक पदासाठी १२० उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ५, नगरसेवक पदासाठी १३३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी ७६ जण नशीब अजमावत आहेत.

अकलूज नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ९१ जणू शड्डू ठोकले आहेत. सांगोला नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. करमाळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ७१ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

कुर्डुवाडी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मंगळवेढा नगराध्यक्ष पदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मोहोळ नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी ७९ उमेदवार रिंगणात उतरले लढवित आहेत.

दुधनी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मैंदर्गी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी २ तर नगरसेवक पदासाठी ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. दरम्यान, या सर्व नगरपालिकांमधील उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# महाविकास आघाडी इलेक्टीव्ह मोडवर; स्टॅन्डिंगसह इच्छुक उमेदवारांची चाचपणी सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर शहरात महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीचे सत्र सुरु झाले आहे. इलेक्टीव्ह मेरिट आणि स्टँडिंग उमेदवारांकडे आघाडीचे नेत्यांचा कल असून महाविकास आघाडी पूर्ण क्षमतेने महापालिका निवडणुकीस सामोरे जाणार असल्याचे दिसून येत आहे.

येत्या काही दिवसात शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे हे सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. तेव्हा आणखीन एक महत्वाची बैठक संपन्न होऊन त्यात महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरवला जाणार असल्याचे सांगण्यात येते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या नव्या कार्यालयाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महाविकास आघाडीसह इतरपक्षीय नेते उपस्थित होते. काही नेते कार्यक्रमानंतर दुसऱ्या दिवशी महेश गादेकर यांना भेटण्यासाठी त्यांच्या ऑफिसमध्ये दाखल झाले होते.



या भेटीच्या निमित्ताने महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी यांच्यात झालेल्या चर्चेमध्ये हा विषय निघाला. महापालिका निवडणुकीसाठी इलेक्टिव्ह मेरिट, स्टँडिंग उमेदवार प्राधान्यक्रम राहील, असेही सांगण्यात आले.

### प्राथमिक चर्चा झाल्यानंतर जागा वाटपावर निर्णय

आरक्षण सोडतीनंतर मतदार यादींचा घोळ झाला आहे. अशा अवस्थेत निवडणूक प्रक्रिया राबवणे चुकीचे आहे. सुप्रीम कोर्टाने देखील याविषयी ताशेरे ओढले आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया लांबवली जाते का? हे देखील पाहावे लागणार आहे. महाविकास आघाडीमध्ये स्टँडिंग उमेदवार आणि इलेक्टिव्ह मेरिट लक्षात घेतले जाईल. पक्षाचे प्राबल्य पाहून जागा वाटप केले जातील.

**-महेश गादेकर, शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट**

### इतके वर्ष निवडणूक लढवली

इतके वर्ष निवडणूक लढवली. कधीही दोनदा आरक्षण सोडत निघाली नाही. यानिमित्ताने प्रशासनाचा नाकर्तेपणा समोर आला आहे. असंख्य नावे दुसऱ्या प्रभागात दुसऱ्या यादीत गेल्याने मतदार संभ्रमावस्थेत आहेत. या विरोधात हरकत दाखल करणार आहे. महाविकास आघाडी संदर्भात लवकर चर्चा होईल.

**- चेतन नरोटे, शहराध्यक्ष काँग्रेस पार्टी**

एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात समाविष्ट केल्याने माजी नगरसेवकांसह नव्याने इच्छुक असलेले देखील चक्रावलेले आहेत. याबाबत महाविकास आघाडीतील नेत्यांनी महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्याकडे आजरोजी हरकत दाखल करणार आहेत.

## महत्वाचे...

### कार, ट्रॅक्टर घेवून ये म्हणत विवाहितेकडे दहा लाखांची मागणी

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

आई वडीलांनी मनाप्रमाणे सोन्याचे दागिने घातले नाहीत, तुझी आमच्या घरात नांदण्याची व राहण्याची लायकी नाही, कार व ट्रॅक्टर द्या अन्यथा नांदण्यास येणार असशील तर दहा लाख रुपये घेवून ये म्हणत विवाहितेचा छळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रुती लक्ष्मण पुजारी (वय २२, रा. जुनी पोलिस लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर) या विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरून पती लक्ष्मण, सासू सिध्दव्वा, सासरे सुरेश, नणंद दिपा यांच्यावर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ फेब्रुवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान पुजारी वस्ती, वडापूर (ता. दक्षिण सोलापूर) या ठिकाणी घडली आहे. श्रुती व लक्ष्मण या दोघांचे १६ फेब्रुवारी २०२२ रोजी लग्न झाले. लग्नानंतर ६ महिन्यानंतर त्रास देण्यास सुरूवात केली. आरोपींनी विवाहितेस आमच्या मुलीच्या लग्नात २१ तोळे वजनाचे दागिने घातले. तुझ्या आई वडीलांनी आमच्या सांगण्याप्रमाणे सोन्याचे दागिने दिले नाहीत.लग्नात चांगला मानपान केला नाही३ तु आमच्या घरात नांदायची व राहण्याची लायकी नाही. तुझे पती व सासरे जसे सांगितले तसे रहावे लागेल. शेताकरीता ट्रॅक्टर व फॉर्च्युनर कार द्या तरच तुमच्या मुलीला नांदवतो, अन्यथा दुसरे लग्न करून घेणार आहे. तसेच विवाहितेस आमच्याकडे नांदवयास येणार असशील तर माहेरकडून १० लाख रुपये, कार, ट्रॅक्टर आणू द्या असे म्हणत आरोपींनी विवाहितेच्या माहेरी आरडा ओरड केला. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देवून शारिरीक व मानसिक छळ केला आहे. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार भालशंकर पुढील तपास करीत आहेत.

### प्रवाशी रिक्षा पुढे घेण्याच्या कारणावरुन, चाकूने मारुन पाच हजार रुपये काढून घेतले

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

मार्केट यार्ड येथे प्रवाशी रिक्षा पुढे घेण्याच्या कारणावरून एकास चाकूने डोक्यात मारून खिश्यातील पाच हजाराची रक्कम काढून घेतली आहे. याबाबत तौफिक म. युनुस शेख (वय ३१, रा. वैष्णवी नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय पवार, तुषार राठोड, दोघे (रा. मुळेगाव तांडा) व इतर अनोळखी दोन व्यक्ती यांच्यावर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी पावणे तीन सुमारास मार्केट यार्ड येथे सिद्धेश्वर कॅन्टीन समोर फिर्यादी हे रिक्षात बसलेले होते. प्रवाशी रिक्षा पुढे घेण्याच्या कारणावरून अक्षय पवार व तुषार राठोड सह चौघांनी फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केली. तौफिक यांच्या डोक्यात चाकूने मारून जखमी केले आहे. व खिश्यातील ५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले आहेत. यावरून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक जगताप पुढील तपास करीत आहेत.

### बेकायदेशीर मुरुम वाहतुक करताना दोन वाहन चालकांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

बेकायदेशीररीत्या १० ब्रास मुरूम हायवा मधून वाहतुक करणाऱ्या चालक व मालक यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांच्याविरुध्द म्हणून विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना कुमठे गावात घडली आहे. याबाबत मंडल अधिकारी संतोष विश्वनाथ कांबळे (वय ५०, रा. वसंत विहार, जुना पूना नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवराज नागनाथ ढब्बे (रा. होटगी, ता. दक्षिण सोलापूर), शशिकांत राजेंद्र जाधव (रा. होटगी), गणेश सिद्राम कोळी (रा. जुळे सोलापूर), जैद बशीर पिरजादे (रा. होटगी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि २२ नोव्हेंबर रोजी कुमठे गाव येथे आरोपींनी बेकायदेशीररीत्या एमएच १३ सीयू ८१९३ व एमएच १३ ईपी १५६२ या दोन हायवामधून सुमारे १० ब्रास मुरूम घेवून जाताना मिळून आले. मंडल अधिकारी कांबळे यांनी हायवा पकडून त्यांनी वाहनांची कागदपत्रे मागितली. त्यावेळी वाहन चालक व मालकाने ती सादर केली नाहीत. म्हणून दहा ब्रास मुरुम व दोन हायवा असे एकुण ३० लाख १० हजाराचा ऐवज जप्त केला आहे. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सांगळे पुढील तपास करीत आहेत.

### खडी मशिनवर गाडी भरण्याच्या कारणावरुन मारहाण करणाऱ्या आठ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

दहिटणे येथील खडी मशिनवर गाडीमध्ये माल भरण्याच्या कारणावरून वृध्दास मारहाण करणाऱ्या आठजणांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विलास मारूती रूपनर (वय ६२, रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रकाश देवकर, आबु उर्फ नागनाथ चौगुले, शिवराज धोत्रे, तुषार निंबाळकर, रोहित निंबाळकर, दिपक चौगुले, दयानंद निंबाळकर, आकाश निंबाळकर (सर्व रा. मड्डी वस्ती, जुना तुळजापूर नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १२ च्या सुमारास दहिटणे येथील राहुल भिमाशंकर आनंदकर यांच्या खडी क्रशर मशिन येथे गाडीची लाईन लावण्याच्या कारणावरून विलास रूपनर यांना मुन्ना अब्दुलकादर सलीम पटेल, चालक हैदर इब्राहीम बेणुरे यांना प्रकाश देवकर, आबु उर्फ नागनाथ चौगुले, शिवराज धोत्रे, तुषार निंबाळकर, रोहित निंबाळकर, दिपक चौगुले, दयानंद निंबाळकर, आकाश निंबाळकर यांना बेसबॉल बॅट, प्लास्टीक पाईप, लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२७६

**साखरेसि म्हणता धोंडा।**
**काय तोंडा न रूचे ।।**

बरेच लोक चांगल्यांना वाईट कसं म्हणता येईल किंवा त्याला कसं हिणवता येईल याचा आवर्जून शोध घेत असतात. पण वाईटाला वाईट म्हणण्याची हिम्मत करीत नाहीत. चांगल्या हेतूने वाईटांना त्यांच्यातील दोष, उणीवा, त्रुटी दाखवून दिल्या तर एखाद्यावेळी त्यांच्यातील दुर्गुण कमी होण्याला मदत होऊ शकते. तसेच चांगल्यांना चांगले म्हटले किंवा त्यांच्यातील चांगुलपणा टिकून राहण्यास मदत होऊ शकते. अशाने समाजाचे हित साधले जाउ शकते. हे सत्य असले तरी समाजात बहुतांशवेळा याच्या उलट घडत असल्याचे पाहायला मिळते. अर्थात, वाईटांच्या भीतीपोटी त्यांना चांगले म्हणून किंवा त्यांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करून करतात. अशा चुकीच्या वर्तनाचा आनंद घेणाऱ्याला पाठिंबा देणारेही बरेच असतात. यामुळे केवळ चांगल्या लोकांचे नुकसान होते असे नव्हे तर समाजातील काही चांगल्या नीतिमूल्यांना खीळ बसू शकते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कोणालाही सामाजिक नुकसान करण्याचा अधिकार नसतो, हे ही लक्षात असायला हवे.



आमच्यासोबतचे एक अधिकारी, श्री ज्ञानेश्वरी, गाथेचा चांगला अभ्यास व आवड असल्याने कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीच्या दिवशी सामाजिक विषयावर कीर्तन, प्रवचन करीत. त्यामुळे अनेक लोक त्यांना माऊली म्हणत. दोन चांगले शब्द ऐकण्याच्या निमित्ताने दुपारच्या सुट्टीत आम्ही त्यांच्यासोबत डबा खाण्यासाठी बसत असू. तेथे इतरही काही अधिकारी येत असत. त्यापैकी एखादा खोडसाळपणाने किंवा हिणवण्यासाठी त्यांना म्हणत, काय चाललं माऊली. यावर ते स्मीत हास्य करीत म्हणत, काही नाही, सर्व काही ठीक आहे. त्यांच्या चेहऱ्यावर किंवा वर्तनात नाराजी जाणवत नसे. आपणाला अशा हिणवण्याचे वाईट वाटत नाही का ? असे कोणी विचारले तर ते जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या, **साखरेसि म्हणता धोंडा। काय तोंडा न रूचे ।।** या अभंगाची आठवण देत म्हणत, गोडवा हा खडीसाखरेचा गुणधर्म असल्याने, तिला धोंडा म्हणून खाल्ले तरी ती जीभेला गोडवाच देते. त्याप्रमाणे माऊली या शब्दात आपुलकी प्रेम असल्यामुळे समोरच्याने कोणत्याही भावनेने माऊली म्हटले तरी त्याच्या मुखातून माऊली शब्द बाहेर पडतोय आणि ऐकणाऱ्याला माऊली शब्द ऐकू जातोय, त्यामुळे त्याचा परिणाम चांगलाच होणार आहे. यांच्याप्रमाणे प्रत्येकजण समोरच्याचे असे घाव सकारात्मकतेने व स्मीत हास्य करून स्वीकारू शकेलच असे नाही. त्यामुळे बोलणाऱ्यांनी व्यर्थ बोलून स्वतःचा व समोरच्यांचा वेळ वाया घालवण्यास आणि चांगल्या बाबींना खीळ बसण्यास कारणीभूत होऊ नये असे आम्हास वाटते. जर कोणी हिणवलेच तर ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।। या तुकाराम महाराजांच्या वचनाप्रमाणे चांगल्यांनी खचून न जाता, त्याचा सहज स्वीकार करून आपले चांगुलपण स्वतःसाठी व समाजासाठी टिकवून ठेवणेच योग्य असेल. आम्ही तर असे म्हणू की, एखाद्याला चांगल्यांना चांगले म्हणता येत नसेल तरी हरकत नाही, पण अशांनी चांगल्यांना नाव ठेवले तरी पुरेसे होईल. अशाने आपल्या जीवनातील आनंदलहरी टिकून राहण्यास मदत होईल. जय जय राम कृष्ण हरी.

ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार
दि. २४ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - शु.मार्गशिर्ष(२१.२१)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- पूर्वाषाढा (२१.५२)
योग - शूल (१२.३५)
करण - वणिज (०८.२५)
....राहू काल....
सोमवार : स. ७.३० ते ९.००

दिनविशेष - १९९२: कवी विंदा करंदीकर यांची साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कोणार्क पुरस्कारासाठी निवड जाहीर.
१९९२: वैज्ञानिक संशोधनासाठीचा जी. डी. बिर्ला पुरस्कार प्राध्यापक गोवर्धन मेहता यांना जाहीर.
१९९२: देवगड तालुक्यातील कवी माधव यांना पहिला कवी माधव पुरस्कार जाहीर.



## श्रीमंतयोगी प्रतिष्ठानतर्फे बी.सी.बॉईज हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना चादर वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दशकवर्षपूर्तीनिमित्त उपक्रमांतर्गत बी.सी.बॉईज हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना चादर वाटप करून मायेची ऊब दिली. कडाक्याची थंडी असल्याने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

'श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान'च्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रेल्वे लाईन परिसरातील बी.सी. बॉईज होस्टेल येथे विद्यार्थ्यांना सोलापुरी चादर वाटप कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली. येथील ५ वी ते १० वीपर्यंतचे विद्यार्थी या वसतिगृहात राहतात. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा बार असोसिएशनच्या सचिव अॅड. मीरा प्रसाद सिंग, जिल्हा ग्रामीण यंत्रणाचे सहाय्यक लेखाधिकारी सूर्यकांत तोडकरी, बी.सी.बॉईज होस्टेलचे व्यवस्थापक शंकर म्हमाणे, श्रीमंतयोगी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट उपस्थित होते. श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त हा सहावा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे संस्थापक महेश कासट यांनी प्रास्ताविकमधून सांगितले. सूत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी केले तर आभार प्रदर्शन विक्रम बायस यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष अलकुंटे, महेश ढेंगळे, प्रकाश आळंगे, दीपक करकी, गणेश माने, श्लोक सकरगी, सौरभ लकडे, श्रीरंग रेगोटी, अभिजित व्हनकळस, अक्षता कासट, मनुश्री कासट, श्रेया लंचके, श्रीनिधी जाधव, शीला तापडिया, शुभांगी लंचके, सुजाता सकरगी, अर्चना बंडगर, प्रियंका जाधव आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# फायनान्सच्या रिकव्हरी एजंटास शहर गुन्हे शाखेकडून अटक

## चोरीच्या ६ दुचाकी व १ मोबाईल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने दोन अट्टल चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून चोरीच्या सहा दुचाकी व एक मोबाईल असा ४ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

करणकुमार हरी राठोड (वय ३८, रा. गणेशनगर, विजापूर रोड, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या फायनान्स रिकव्हरी एजंटाचे नाव आहे. तर मुजाहीद हमीद मनियार (वय १९, रा. नवीन गोदुताई घरकुल, कुंभारी) असे मोबाईल चोराचे नाव आहे.

शहर गुन्हे शाखेचे पोलिस रात्रगस्त करीत असताना पथकास २० नोव्हेंबर रोजी एक इसम कुमठा नाका परिसरातील क्रिडा संकुलाच्या मागे असलेल्या लेप्रसी कॉलनी येथे शाईन मोटारसायकलसह संशयास्पद स्थितीत थांबला असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिस पथकाने त्या ठिकाणी जाऊन दुचाकीवर संशयास्पदरीत्या थांबलेल्या व्यक्तीस दुचाकीसह ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने त्याचे नाव करणकुमार हरी राठोड असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडील एमएच १३ ईजी ६७३७ क्रमांकाच्या



दुचाकीच्या कागदपत्रांची चौकशी केली असता ती चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता धक्कादायक माहिती निष्पन्न झाले. राठोड हा पूर्वी स्टुम फायनान्स कंपनीत टू-व्हिलर रिकव्हरी एजंट म्हणून काम करत होता. फायनान्सचे हप्ते न भरलेल्या वाहनांची वसुली करताना सहा मोटारसायकली त्याने उचलल्या, मात्र त्या बँकेच्या डंपयार्डमध्ये जमा न करता स्वतःकडे ठेवल्या असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी राठोड याच्याकडून सहा दुचाकी जप्त केल्या आहेत. या दुचाकींच्या चोरीबाबत सदर बझार, फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

### मोबाईल चोरीचाही गुन्हा उघड...

दरम्यान, दुसऱ्या एका कारवाईत शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मुजाहीद हमीद मनियार (वय १९, रा. नवीन गोदुताई घरकुल, कुंभारी) या तरुणास ताब्यात घेऊन त्याच्याकडून १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल जप्त केला. याबाबत सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

### यांनी केली कारवाई...

ही कारवाई पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शामकांत जाधव, अमलदार बापू साठे, राजेश मोरे, वसिम शेख, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सायबर शाखेतील प्रकाश गायकवाड आणि म च्छिंद्र राठोड यांनी केली.

## रिक्षा-दुचाकीची धडक; तीन जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**



होटगी रोडवरील मुल्ला कॉर्नर येथे रिक्षा आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाले.राहुल अंबादास गवंडी (वय २३, रा. होटगी, सोलापूर) असे जखमी रिक्षा चालकाचे नाव आहे. तर अरबाज चाँद शेख (वय २५, रा. बाळीवेस, सोलापूर) आणि शाहिस्ता करीम शेख (वय १८, रा. साखर पेठ, सेलापूर) अशी दुचाकीवरील जखमींची नावे आहेत. २३ नोव्हेंबर रेजी दुपारी दोनच्या सुमारास होटगी स्टेशन ते आसरा चौक अशी रा-हुल गवंडी हा स्वतः रिक्षा चालवित येत होता. तर अरबाज आणि शाहिस्ता हे दोघे दुचाकीवरून होटगीकडे जात होते. त्यावेळी होटगी रोडवरील मुल्ला कॉर्नर येथे समोरून येणाऱ्या दुचाकीबरोबर रिक्षाची धडक झाली. याम ध्ये राहुल गवंडी, अरबाज व शाहिस्ता हे जखमी झाले असून रिक्षाची काच फुटून नुकसान तसेच दुचाकीचे नुकसान झाले आहे. जखमी तिघांनाही उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघाच्या शिबिरात ४५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघ शाखेतर्फे आयोजित २६/११च्या मुंबईरील अतिरेकी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ मागील १६ वर्षांपासून सातत्याने आयोजित केले जाणारे १७ वे वार्षिक रक्तदान शिबिर अत्यंत यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात ४५ हून अधिक नागरिकांनी रक्तदान केले.

यावर्षी ९ वे व ३८ वे एनसीसी बटालियन तसेच संगमेश्वर कॉलेजच्या एनसीसी कॅडेट्सनी, विशेषतः महिला कॅडेट्सनी, सहभाग नोंदविला. कार्यक्रमात ९ व्या बटालियनचे कमांडिंग ऑफिसर ले. कर्नल बाबर यांनी भेट देऊन कॅडेट्सचे कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गंगाधर थळ्ळगे, संजय बुरगुटे, नागेंद्र कोंडेकर, कर्नल सुमित मार्तंडे, रवी गायकवाड, दिगंबर, पोपट शिंदे, किरण कुलकर्णी, कबाडे, अनिल सगर,राजेंद्र पंडित तसेच सोलापूर शाखेतील सर्व माजी विद्यार्थी संघ सदस्यांनी प्रयत्न केले.



## एकत्व योगासन मंडळातर्फे मालेगाव बालिकेच्या अत्याचार प्रकरणाचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

संपूर्ण देशभरात माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनेने अर्थात नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातल्या डोंगराळे गावात घडलेल्या घटनेने संपूर्ण देश हादरवून टाकला आहे.

केवळ ३ वर्षाच्या निष्पाप चिमुकलीवर अमानुषपणे अत्याचार करून निर्दयीपणे दगडाने ठेचून तिची हत्या २४ वर्षाच्या एका नराधमाकडून करण्यात आली. या घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान शनिवारी एकत्व सोशल फाऊंडेशनच्या वतीने किल्लाबाग परिसरातील हरळी प्लॉट योगासन मंडळातील बुद्धिजीवी वर्गातील जेष्ठ मान्यवरांसोबत त्या चिमुकलीला श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक एकत्व फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिपक करकी तर सूत्रसंचालन राजेश केकडे यांनी केले. बालिकेला श्रद्धांजली वाहण्यासाठी हरळी प्लॉट योगासन मंडळाचे अध्यक्ष मोहन तुम्मा, श्रीनाथ श्रीगण, ऋषिकेश हरसुरे, शहाबाज मकानदार, प्रवीण गावडे, राजेश वाघमोडे,महादेव तोग्गी, गणपतसा मिरजकर, विजयकुमार मेणसे, राजूसा मुमकर, संजय बिद्री, प्रकाश अंबुरे उपस्थित होते.




## नाटक हा मराठी माणसाचा श्वास आहे : पद्मश्री डॉ. केंद्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा सोलापूर आणि बालरंगभूमी परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या एक संवाद कलावंतांसोबत या विशेष कार्यक्रमास पद्मश्री डॉ.वामन केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सोलापुरातील कलावंतांशी त्यांनी या कार्यक्रमात मनमोकळा संवाद साधला आणि आपला नाट्यप्रवास उलगडला.

संवाद साधताना डॉ. केंद्रे यांनी मराठी नाट्य-प्रेक्षकांचा गौरव केला. ते म्हणाले, जगाच्या पाठीवर मराठी माणसासारखा उत्तम नाट्य प्रेक्षक आपल्याला शोधून सापडणार नाही. एकदा मराठी प्रेक्षकांनी एखाद्या नाट्यप्रयोगाला मान्यता दिली की तो नाट्य प्रयोग पराकोटीचा यशस्वी होतो, याचा मला प्रत्यय आलेला आहे. मराठी माणसाला नाटक कसे पाहावे, याची सर्वोत्तम जाण आहे. म्हणूनच मराठी माणसाचा नाटक हा श्वास आहे, असे ते ठामपणे म्हणाले. अत्यंत दिपवून टाकणारा आणि भारावून टाकणारा त्यांचा स्वतःचा नाट्यप्रवास ऐकताना रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी, पद्मश्री डॉ. वामन केंद्रे यांचा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर व बालरंगभूमी परिषद सोलापूर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नाट्यकलावंत व नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष प्रा.विद्या काळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार, नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची, अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, आणि ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नाट्य कलावंत व नाट्य परिषदेचे कार्यकारणी सदस्य आनंद खरबस, प्रशांत देशपांडे, व्यंकटेश रंगम शांता येळंबकर, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह अर्चना अडसूळ, उपाध्यक्ष खंडू शिंदे, सहकार्यवाह मच्छिंद्र सपताळे, डॉ.नसीम पठाण, अॅड. जे..जे.कुलकर्णी, प्रा.दीपक देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार रजनीश जोशी, ज्येष्ठ नाट्य कलावंत सुनील गुरव उपस्थित होते. प्रास्ताविक आणि आभार पद्माकर कुलकर्णी यांनी मानले.

## बळीराजा सापडला आर्थिक कचाट्यात

गेल्या काही वर्षांपासून खते, बियाणे, शेतमजुरांची मजुरी, औजारांची भाडेवाढ (शेती मशागतीची) जणू काय ठरवून दिलेल्या नियम प्रमाणे वाढत आहे; मात्र उत्पादित मालाला कसलाच हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा पाय अधिक खोलातच जात आहे; त्यातच गेल्या



२-३ वर्षांपासून निसर्गाचा समतोल बिघडल्याने शेती व्यवसाय जाम आर्थिक कचाट्यात सापडला आहे. यामुळे बळीराजा कर्जबाजारी होत असून, आपल्या प्रपंचाचा गाडा तो तसाच पुढे रेटत आहे; मात्र त्यांच्यासाठी शेती व्यवसाय हा विषय गंभीर झाला आहे. यासाठी शासन स्तरावरून बळीराजाला या आर्थिक अडचणीतून कायमस्वरूपी बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.

यंदा खरिपातच खते, बियाणांच्या किंमती काही अंशी वाढल्या आहेत. रब्बी हंगामातही अशीच तऱ्हा आहे. काही खत उत्पादकही शेतकरी बांधवांना आता फसवत असल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. यंदा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी अशा खत उत्पादकांवर धाडी टाकून बोगस खते पकडली आहेत. यामुळे बियाणांतही अशीच फसगत कशावरून होत नसावी? असाही सवाल जाणकार शेतकरी बांधव विचारत आहेत. यंदा पुराचा आणि अतिवृष्टीचा तडाका बसल्याने जिल्ह्यातील ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे. केळी, द्राक्ष, ऊस, बोर-पेरू बागा वाहून गेल्या आहेत; जागेवरच कुजल्याही आहेत. महापुराच्या संकटाने अनेकांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत. सरकारकडून या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रुपये मिळाले आहेत. आजतागायत ४ लाख ३६ हजार ५१६ शेतकऱ्यांच्या खात्यावर ५३३ कोटी ४० लाख ४३ हजार ३०९ रुपये झाले जमा झाले आहेत. दरम्यान, ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे अजूनही तब्बल ८० हजार ७७६ शेतकऱ्यांचे ८९ कोटी ७६ लाख ४७ हजार ०४२ इतकी रक्कम अडकली आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्याची दिवाळीपासून प्रक्रिया चालूच आहे.

शासनाकडून आलेली ही रक्कम अत्यंत तोकडी आहे. एकेका शेतकऱ्याचे लाखोंनी नुकसान झाले आणि त्यांना हेक्टरी २० हजारापर्यंतची आजतागायत मदत होत आहे. ज्यांच्या बागा उभ्याने वाहून गेल्या त्यांचे हाल अतिशय भयानक आहेत. या महापुराच्या संकटासह अतिवृष्टी होवून दीड महिना झाले तरी केवळ केवायसी अभावी ८० हजार शेतकऱ्यांचा खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेण्यासाठी अडचण येत आहे. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. ई-केवायसी नसली तरी आता फार्मर आयडी शेतकऱ्यांसाठी गरजेचा आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही. यामुळे अशाच शेतकऱ्यांचे हे पैसे बँकांत पडले आहेत.






**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
मो. 9421876340

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला मात्र तेही पैसे पडत नाहीत. मिळणारी मदत दिड्डीचून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच संबंधित यंत्रणा ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना मदत कधी मिळणार? असा सवाल शेतकरी बांधव विचारू लागले आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सध्या गावोगाव शिबिरे घेवून शेतकऱ्यांची ई-केवायसी, अॅग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यात दौरा केला आहे. त्यांचेही अहवाल केंद्राकडे जाणार आहेत. महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी नुकतीच दिली आहे. आता ही मदत लवकर मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत.

## महत्वाचे...



## गोकुळ दूध संघाचे विंचूर येथे शितकरण केंद्र युनिटचे उद्घाटन

**सोलापूर दि. २३ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर येथे कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ गोकुळ दूध यांच्या 'शितकरण केंद्र' प्रक्रिया युनिटचे उद्घाटन चेअरमन सारीका पाटील यांच्या हस्ते पार पडला. गोकुळने श्री स्वामी समर्थ महिला दूध उत्पादक संस्थेला दूध संकलन व सेवा केंद्र म्हणून मान्यता दिली असून, हे गोकुळचे सोलापूर जिल्ह्यातील पहिले केंद्र ठरले आहे. विंचूर येथील हे केंद्र आता गोकुळसाठी दूध संकलन आणि शेतकऱ्यांना सेवा पुरवण्याचे महत्त्वाचे काम करणार आहे. या केंद्रांमुळे सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांना कोल्हापूरच्या धर्तीवर दूध दर आणि अन्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गोकुळचे स्वनिर्मित उच्च दर्जाचे पशुखाद्य हे कोल्हापूरच्या दरानेच सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे. यावेळी श्री स्वामी समर्थ महिला सहकारी दूध उत्पादक संस्थेचे सचिव बाळासाहेब पाटील, सहाय्यक शितकरण केंद्राचे व्यवस्थापक शिवाजी पाटील, संगणक सहाय्यक व्यवस्थापक एकनाथ पाटील, गुणनियंत्रक अधिकारी सुशील देसाई, सहाय्यक अधिकारी क्रांतीकुमार माने, स्वप्निल पाटील, काळप्पा सुतार, यतीराज निगपुडे, बाळाप्पा व्होनमाने, डॉ. आदिनाथ खरात, डॉ. महेश खरात, शिवानंद उमदीकर, सिद्धाराम घोंगडे, श्रीमंत पुजारी, चिदानंद म्हेत्रे, महासिद्ध घोडके आदी उपस्थित होते.



## हवालदार अमृत खेडकर यांचा महेश इंगळे यांच्या हस्ते सन्मान

**अक्कलकोट, दि. २३ नोव्हेबर-**

१६ दिवसात कश्मीर ते कन्याकुमारी ४२५० किमी सायकल रॅली यशस्वीरीत्या पूर्ण करणारे सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील प्रथम पोलीस कर्मचारी हवालदार अमृत खेडकर देवस्थान समितीला सार्थ अभिमान असल्याचे प्रतिपादन येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले. नुकताच कश्मीर ते कन्याकुमारी सायकल रॅली यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल हवालदार अमृत खेडकर यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी हवालदार अमृत खेडकर यांचा श्री स्वामी समर्थाचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सन्मान केला. यावेळी हवालदार अमृत खेडकर यांच्या सन्मानाप्रित्यर्थ महेश इंगळे बोलत होते. स्पर्धेमध्ये देशभरातून १५० स्पर्धक सहभागी झाले होते, त्यापैकी केवळ १०७ स्पर्धकांनी हा अत्यंत कठीण प्रवास पूर्ण केला आहे ही बाब सोलापूर ग्रामीण पोलिस दलासह मंदीर समितीसही अभिमानास्पद असल्याचे मनोगतही महेश इंगळे यांनी व्यक्त केले. यावेळी सोलापूर ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, माढा पोलीस स्टेशनचे प्रभारी नेताजी बंडगर, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, गणेश इंगळे उपस्थित होते.



## प्रभाग ११ मध्ये डोअर टू डोअर प्रचार

**अक्कलकोट, दि.२३ नोव्हेंबर-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट महाराष्ट्रातील टॉप फाईव्ह चे तीर्थक्षेत्र होण्यासाठी भाजपाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी व प्रभाग ११ मधील उमेदवार महेश इंगळे, आरती गायकवाड यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन प्रा. शिवशरण अचलेर यांनी केले. प्रभाग क्र. ११ चे उमेदवार महेश इंगळे यांची कुंभार गल्ली, नाईकवाड गल्ली, मानकरी वाडा भागात डोअर टु डोअर मतदाराच्या भेटी झाल्या. यावेळी प्रा. अचलेर बोलत होते. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, अविनाश मडिखांबे, भाजपा अल्पसंख्याक सेलचे नन्हु कोरबु, प्रथमेश इंगळे, बाळासाहेब एकबोटे , सुनिल पवार, श्रीकांत झिपरे, बाबा सुरवसे, राजू एकबोटे, मनोज इंगोले, अरविंद पाटील, ज्ञानेश्वर भोसले, रवि मलवे, लखन झंपले, काशीनाथ मलवे, प्रशांत कानडे, शेखर गुंजले, खाजप्पा झंपले, महादेव मलवे, दिलीप सोनार, संजय हंगळे, चंद्रकांत सोनटक्के, सुनिल पवार, चित्तरंजन अगरथडे, धोंडप्पा कुंभार, सुरेश कुंभार, बसवराज कुंभार, योगेश कुंभार, वैजुनाथ कुंभार, मल्लीनाथ कुंभार, सचिन दुर्गे, अरुलम नाईकवाडी, अविनाश सोनु नाईकवाडी, दादा सावंत, ऋतीक माने, गणेश काटकर, अशोक जवळगीकर, निलेश स्वामी, चन्ना विभुते उपस्थित होते.

# अकलूजमध्ये राष्ट्रवादी(शप) व मित्रपक्षाच्या प्रचाराचा फुटला नारळ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.२३ नोव्हेंबर-**

अकलूजचा शैक्षणिक, व्यवसायिक, औद्योगिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात विकास साधला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विकासाचे एक व्हिजन ठेवून निवडणुकीत उतरला असून या पक्षाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.

येथील पाटील वाड्यात नगरपरिषद निवडणुकीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रचाराचा शुभारंभ खा. मोहिते पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी खा. मोहिते पाटील म्हणाले वैयक्तिक टीकेला आम्ही उत्तर देऊ पण गावावर टीका केली आम्ही खपवून घेणार नाही. त्यास सडेतोड उत्तर देऊ. विरोधकांना विकास कसा असतो



हेच माहीत नाही. त्यांना जनताच आपले स्थान दाखवेल. आजपर्यंत सहकार महर्षीपासून विजयदादा, बाळदादापर्यंत सर्वांनी जनतेच्या हिताचीच कामे केली आहेत. हे जनता पण ओळखून आहे. त्यामुळे जनतेला भडकवू नका जनता सुज्ञ आहे. आ.जानकर यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते यांच्यावर खरपूस टीका केली. पुढे बोलताना जानकर यांनी सरकारला कुणाला मंत्री करावे हे कसं लक्षात येत नाही, त्या मंत्र्यांकडे काही तरी गुण असावेत ही अपेक्षा व्यक्त करतानाच पालकमंत्र्यांनी मी शिफारस केलेला अकलूजचा विकास निधी रोखल्याचा आरोप केला. आमच्या वेळापूरातील १६ जणांविरोधात अगोदर तडीपारीची कारवाई केल्याचे सांगण्यात आले मात्र ते आता यांच्यासोबत फिरताना दिसत असल्याचे सांगत अकलूजकराना कलंकित व बदनाम करत असल्याचा आरोप केला. निवडणुकी अगोदर होणाऱ्या ईव्हीएम मशीन तपासणीस आपण स्वतः उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, रवी पाटील व सर्व उमेदवार तसेच शिवसेना (उबाठा)चे नामदेव वाघमारे, मारुती अंभोरे, दत्ता आबा पवार, अण्णा कुलकर्णी, स्वप्निल वाघमारे, महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उबाठा शिवसेनेच्या वतीने स्वप्निल वाघमारे, संभाजी राजे शिंदे यांनी आपले विचार मांडले. शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी नगर परिषदेच्या संभाव्य योजना व कृती आराखडा मांडला.

> नगर पंचायतीच्या संभाव्य योजना पक्षाकडून जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये झोपडपट्टी निर्मूलन प्रत्येकाला घरे, सांस्कृतिक सेंटर ट्रेनिंग सेंटर उभारणार, जुने बस स्थानक सुधारणा करून भव्य असे शॉपिंग व मार्केट बनवणार, वाचनालय बनवणार त्यामध्ये एमपीएससी यूपीएससीचे लागणारे सर्व ग्रंथ ठेवणार, अंडरग्राउंड लाईट वीज व ड्रेनेज ही कामे करणार दररोज पाणी मिळेल अशी योजना तयार करणार, युवकांसाठी व नागरिकांसाठी चौकाचौकात वायफाय सुविधा, १०० बेडचा नवीन दवाखाना सर्व सुख सोयीने युक्त उभारणार, बचत गटासाठी ट्रेनिंग सेंटर, महिलांना व्यवसायाचे ट्रेनिंगसाठी सहली बचत भवन उभारणार, बौद्ध विहार व गावाचा एकात्मिक विकास करणार असे जाहीर केले

# वैराग तालुका निर्मितीचा निर्णय सहा महिन्यात घ्या

### उच्च न्यायालयाचा आदेश; अप्पर तहसील प्रस्तावावर साडेतीन महिन्यात निर्णय घ्या

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ नोव्हेंबर-**

अप्पर तहसील प्रस्तावावर साडेतीन महिन्यांत, तर तालुका निर्मितीच्या प्रस्तावावर सहा महिन्यांत निर्णय घ्या, असे आदेश न्यायालयाने राज्य शासनाला दिले आहेत याशिवाय सोलापूरच्या निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी चार महिन्यांत निर्णय घ्यावा असाही आदेश दिल्याची माहिती वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत उपनगराध्यक्ष भूमकर यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने हे महत्वाचे निर्देश दिले आहेत. ३० ते ३५ वर्षापासून वैराग तालुका निर्मितीसाठी स्व. धन्यकुमार भूमकर आणि स्व. माजी आमदार चंद्रकांत निंबाळकर यांनी पाठपुरावा केला आहे. तत्कालीन तहसीलदार, एसडीओ आणि निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी पाठवलेला प्रस्ताव राज्य शासनाकडे पोहोचला शासनाने त्यात काही त्रुटी काढल्या. या त्रुटी दूर करण्यासाठी १४ वर्षे उलटली. तहसीलदारांनी त्रुटी दुरुस्त करून २८ जानेवारी २०२५ रोजी फेरप्रस्ताव निवासी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला. परंतु त्यावर पुढील हालचाल झाली नाही. त्यामुळेच रिट याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेत मुद्दे मांडताना सहा वर्षांपूर्वीचा ग्रामपंचायत स्तरावरील प्रस्ताव शासनाने अद्याप मंजूर/नामंजूर केलेला नाही, राज्यात या कालावधीत इतरत्र अप्पर तहसील कार्यालय मंजूर झाले असल्यास, वैरागला वंचित का ठेवण्यात आले?, वैरागचे भौगोलिक स्थान, पंचक्रोशीतील नागरिकांचा प्रवास व प्रशासनिक अडचणी नकाशासह न्यायालयात मांडण्यात आल्या. न्यायालयाने सर्व मुद्दे ऐकून शासनास प्रलंबित प्रस्तावांवर वेळेत व आवश्यक दुरुस्तीसह निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले. ८ ऑगस्ट २०२३ रोजी उपनगराध्यक्ष भूमकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना तालुका आणि अप्पर तहसील निर्मितीचे मागणीपत्र दिले होते. पवार यांनी त्यावेळी विभागीय सचिवांना निर्णय प्रक्रियेबाबत निर्देश देण्यास सांगितले होते अशी माहिती उपनगराध्यक्ष भूमकर यांनी दिली. यावेळी आरोग्य सभापती नागनाथ वाघ, नगरसेवक अजयकुमार काळोखे, अतुल मोहिते, संगमेश्वर डोळसे, सतीश सुरवसे, आनंद घोटकर, संजय झाडबुके, पिंटू लांडगे, अक्षय ताटे, खंडेराया घोडके, धनंजय स्वामी उपस्थित होते. याचिकेचे कामकाज ॲड.मनीषा दळवी-काळोखे यांनी पाहिले.

# राष्ट्रवादीच्या उमेदवारास मदत का करतो म्हणत एकास जीवे मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी,दि.२३ नोव्हेंबर-**

कुर्डूवाडी नगरपालिकेसाठी निवडणूक लढवणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अनिल उगाडे यांना मदत का करतो असे म्हणत तानाजी गणेश गोरे (रा.कुर्डू) यास कल्याण उर्फ बाबु विठ्ठल चौधरी, शहाजी सावता वाघमारे व संभाजी दत्तु चौधरी यांनी दारूच्या नशेत मध्यरात्री घरी जावून दरवाजावर लाथा व लाकडी दांडक्याने मारुन शिवीगाळी व दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत कुर्डूवाडी पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे.

सध्या कुर्डूवाडी नगरपालिकेची निवडणूक चालु आहे. या निवडणूकीत माजी.आ.संजयमामा शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष धनंजय डिकुळे यांच्यात सामना रंगला आहे. शिवसेनेचे समर्थक राहीलेले आरोपी कल्याण उर्फ बाबु विठ्ठल चौधरी, शहाजी सावता वाघमारे व संभाजी दत्तु चौधरी हे दि.२३ नोव्हेंबरच्या पहाटे कुर्डू हद्दीत राहत असलेले संजयमामा शिंदे यांच्या गटाचे कार्यकर्ते तानाजी गणेश गोरे यांच्या घरी मध्यरात्री दारूच्या नशेत जावून, दरवाजावर लाथा व लाकडाने मारून शिविगाळी करत अनिल उगाडे यांना निवडणूकीत मदत का करतोस म्हणून म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. सदरचा गुन्हा पहाटे १ वा.सुमारास घडला. फिर्यादी तानाजी गोरेंनी स्वतः कुर्डूवाडी पोलीसात तक्रार दाखल केली आहे.

# डोंगराळे घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा द्या; हेमंत पाटलांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.२३ नोव्हेंबर-**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात स्थित डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने राज्य हादरले आहे. १६ नोव्हेंबर रोजी झालेल्या या गुन्ह्यात गावातील २४ वर्षीय विजय खैरनर याला अटक करण्यात आली आहे. पीडित परिवाराला लवकर न्याय मिळावा, यासाठी या प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात करावी आणि आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी इंडिया अगेन्स्ट करप्शन चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील त्यांनी रविवारी (ता.२३) केली.



घटनेनंतर पीडित कुटुंबाला राज्य सरकारच्या मनोधैर्य योजनेतून १० लाखांची मदत देण्यात आली. मात्र, ही केवळ तत्काळ दिलासा देणारी मदत असून कुटुंबावर झालेली अमानवी हानी कोणत्याही रकमेने भरून निघणार नाही, असे पाटील म्हणाले. समाजातील अशा प्रवृत्तीला कठोर शिक्षा करून आळा घालण्याची वेळ आली आहे, अन्यथा महिलांच्या व बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न कायमच ऐरणीवर राहील; असेही पाटील म्हणाले. या प्रकरणी न्यायप्रक्रिया वेगाने पार पडण्यासाठी फास्ट-ट्रॅक कोर्टात खटला चालवावा आणि दोषीला (दोष सिद्ध झाल्यास) लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत, अशी मागणी पाटील यांनी केली. तसेच, पीडित कुटुंबाच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या हिताविषयी आवश्यक सर्व उपाययोजना करण्याचे आदेश सरकारने तातडीने द्यावेत, अशी विनंतीही त्यांनी केली.

२०२२ महाराष्ट्रात ६ हजार ५२० गुन्हे दाखल करण्यात आले. यातील दोषसिद्धीचे प्रमाण केवळ २२ टक्के होते. अशा प्रकरणासाठी विशेष फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करीत प्रलंबित प्रकरणे आणि दोषसिद्धीचे प्रमाण वाढवावे, असे आवाहन देखील पाटील यांनी केले.

# घरगुती कारणावरून महिलेस कुऱ्हाडीच्या दांडक्याने मारहाण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

मलिकपेठ (ता. मोहोळ) येथे घरगुती कारणावरून महिलेस कुऱ्हाडीच्या दांडक्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. मनिषा बाळासाहेब घाटुळे (वय ४३, रा. मलिकपेठ) असे जखमी महिलेचे नाव आहे.

दि. २३ नोव्हेंबर रेजी साडेआकराच्या सुमारास राहत्या घरी घरगुती वादाच्या कारणावरून सोहम शिवाजी घाटुळे, शिवाजी सोपान घाटुळे व इतर चार जणांनी मिळून कुऱ्हाडीचे दांडक्याने, लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. जखमी मनिषा यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# जि.प.पं.स.साठी आघाडीचा निर्णय पक्षाच्या बैठकीनंतरच : धैर्यशील मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२३ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांचे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीबाबत इतर पक्षासोबत युती अथवा आघाडीचा निर्णय अद्यापपर्यंत झाला नाही. निवडणूका जाहीर होताच पक्षाच्या बैठकीत शरद पवार यांचे आदेशानुसार निर्णय घेणार असल्याची माहिती माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी टेंभूर्णी येथे पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ते म्हणाले, कुर्डुवाडी नगरपालीकेसाठी शिंदे सेनेसोबत झालेली आघाडी ही केवळ नगरपालिकेसाठी असून लोकसभा आणि विधानसभेला ज्या लोकांसोबत होते त्यांचेसोबत आघाडी केली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झालेनंतर पक्षाचे बैठकीनंतरच शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षातील ज्येष्ठ नेत्यांचे आदेशानुसार आघाडी बाबत निर्णय घेण्यात येणार आहे. माढा मतदार संघात युवकांना औद्योगिक प्रशिक्षण देऊन उद्योजक घडवण्यासाठी शिबीरे,



मोडनिंब, मेंढापूर एमआयडीसीचा पाठपुरावा चालु आहे, आढेगाव येथे अंडरपास या योजनेसह जनतेने टाकलेल्या जबाबदाऱ्या पुर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. उजनी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी, किसान रेल्वे चालु करण्यासाठी पाठपुरावा चालू आहे. मोडनिंबमध्ये रेल्वेच्या जागेतील रस्ता अप्रोज करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नितीन गडकरी यांना भेटून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असून हा प्रकल्प झाल्यास मोडनिंब मध्यवर्ती ठिकाणी असून येथून शेतमाल कंटेनर पोर्टवर नेण्यासाठी मदत होणार आहे. तसेच केळीचा दर पाकीस्तानात उत्पादन वाढल्यामुळे आखातातील देशांना केळीची वाहतूक रोडने होत असल्याने परवडत आहे, तर आपल्या देशातील वाहतूक लांबून खर्चीक असल्याने व्यापाऱ्यांनी पाठ फिरवली असल्याने दर घटले आहेत. रशियातील व्यापाऱ्यांशी बोलणे चालू असून लवकरच सकारात्मक निर्णय झाल्यास केळीचे दर वाढण्यासाठी फायदा होईल. यासह टेंभूर्णी-धाराशिव रस्ता होण्यासाठी खासदार ओमराजे निंबाळकर आणि मी रस्ते परिवहनमंत्री नितीन गडकरी यांचेकडे पाठपुरावा सुरू असल्याचे खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाउपाध्यक्ष रावसाहेब देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे, प्रहार संघटनेचे अमोल जगदाळे, केशव गायकवाड, राजू जगताप उपस्थित होते.

## पूर्व वैमनस्यातून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

पूर्व वैमनस्यातून दमाणी नगर परिसरातील वाय चौकात तरूणास अज्ञात वस्तूने व रॉडने मारहाण करून जखमी करण्यात आले.ओम महादेव पाथरूट (वय १८, रा. सलगर वस्ती, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २२ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास वाय चौक येथे मागील भांडणाच्या कारणावरून लक्ष्मण माने, अभिषेक माने व इतर दोन जणांनी ओम पाथरूट यास अज्ञात वस्तूने व रॉडने मारहाण केली. यामध्ये ओम हा जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## घरगुती भांडणातून तरूणाचा विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर -**

घरगुती भांडणातून नागणसूर (ता. अक्कलकोट) येथे तरूणाने विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.चंद्रकांत इरप्पा मांग (वय २६, रा. नागणसूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ च्या सुमारास राहत्या घरी घरगुती भांडणाच्या कारणावरून रागाच्या भरात गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले. त्यामुळे चंद्रकांत यास त्रास होऊ लागल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# बाळे शिक्षक पतसंस्थेची कर्जमर्यादा झाली ५० लाख

### चेअरमन काटकर : संचालक मंडळाच्या सभेत निर्णय; मृत्यू उपदान 30 लाख मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२३ नोव्हेंबर-**

बाळे (सोलापूर) येथील सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था संस्थेने सभासदांचे हित लक्षात घेऊन ५० लाख रूपये कर्जमर्यादा वाढवली आहे. कर्ज मर्यादा वाढल्यामुळे व्याजदर १०.५० टक्केला मंजुरी देण्यात आली. जे सभासद ६ लाख रुपयेपर्यंत कर्ज घेतील त्यांना ८ टक्के व्याजदर असेल व सहा लाखापेक्षा जास्त कर्ज घेतील त्यांना व्याजदर १०.५० टक्के राहील. सदर कर्ज पाच ते दहा दिवसांत मंजूर करून सभासद खात्यावर जमा करण्यात येईल. कर्ज परतफेड १५० हप्त्यामध्ये फेडावे लागणार असल्याची माहिती चेअरमन तात्यासाहेब काटकर यांनी दिली.

संस्थेच्या संचालक मंडळाची सभा मा. आमदार दत्तात्रय सावंत यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले. जर एखाद्या सभासदाचा दुर्दैवाने नैसर्गिक, आजारपणामुळे किंवा अपघाती मृत्यू झाल्यास संजीवनी ठेवीच्या सहाय्याने ३० लाख रुपये वारसांना दिले जाणार आहेत. तातडी कर्जामध्येही म्हणजे पगाराच्या पटीत पन्नास, पंच्याहत्तर हजार व एक लाख रूपायाची घसघशीत वाढ करण्यात आली आहे. याला व्याजदर ८ टक्के राहणार आहे. यावेळी व्हा चेअरमन, सर्व संचालक, सचिव उपस्थित होते.

# महिला ग्रामसेवकास दमदाटी, शिवीगाळ केल्याप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ नोव्हेंबर-**

सदर प्रकरणातील फिर्यादीने महिला ग्रामसेवकाच्या सरकारी कामात अडथळा व सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केलेप्रकरणी गुन्हा नोंद केला होता. यात हकीकत अशी की, ग्रामसेवक हे आरोपी यांच्याकडे घरपट्टी वसूल करण्यासाठी गेले असता आरोपी यांनी घरपट्टी देत नाही आणि शौचालय बांधत नाही, असे म्हणून ग्रामसेवक यांना शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केलेप्रकरणी आरोपी यांच्या विरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद झाला. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील मे अति . जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम.गुंड यांनी केला.सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन मे. न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ॲड. एस. एम. गुंड व ॲड. व्ही.पी. जाधव, ॲड. आर.आर. घोडके, ॲड. ए. एस.गुंड, ॲड. आर. के. ननवरे, ॲड. पी.ए. शेळवणे यांनी काम पाहिले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## रेडिओलॉजी अँड इमेजिंग असोसिएशन प्रदेशाध्यक्षपदी डॉ. वैभव मेरू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ नोव्हेंबर-**



महाराष्ट्र स्टेट ब्रांच इंडियन रेडिओलॉजी अँड इमेजिंग असोसिएशन या राज्यातील रेडिओलॉजिस्टांची प्रमुख आणि प्रतिष्ठित संस्थेच्या निवडणुकीत येथील ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. वैभव मेरू यांनी प्रभावी विजय मिळवत प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. राज्यभरातील रेडिओलॉजिस्टांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे डॉ. मेरू यांनी प्रतिस्पर्धी डॉ. स्नेहल वैद्य यांचा तब्बल ६९७ मतांनी पराभव करत १७८५ मते मिळवली. सोलापूरच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी ही निवड मोठा सन्मान मानली जात आहे. गेली वीस वर्षे डॉ. मेरू हे सोलापूरातील मेडिकल डायग्नॉस्टिक्समार्फत रेडिओलॉजी सेवेत उल्लेखनीय कार्यरत आहेत.

मानांकन प्राप्त असलेल्या त्यांच्या केंद्रामुळे सोलापूर जिल्ह्यात अत्याधुनिक निदान सुविधांची उपलब्धता वाढली आहे. संस्था कार्यात ते सोलापूर चॅप्टरचे संस्थापक अध्यक्ष व सचिव, तसेच जॉइंट सेक्रेटरी आणि उपाध्यक्ष या महत्त्वाच्या भूमिकांमध्ये काम केले आहे. त्यांनी मुंबई ते चंद्रपूरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात फिरत अधिवेशन, प्रशिक्षण कार्यक्रम, विविध आणि आउटरीच उपक्रम यांची शेकडो कार्यक्रमांची मालिका राबवली आहे.

सोलापूरमध्ये २०१७ मध्ये झालेली राज्यस्तरीय वार्षिक परिषद त्यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत यशस्वी ठरली. महाराष्ट्र कॉलेज ऑफ रेडिओलॉजी तसेच या दोन्ही संस्थांमध्ये त्यांचे योगदान उच्चस्तरीय मानले जाते. रेडिओलॉजी शिक्षण, प्रशिक्षण आणि ग्रामीण भागातील निदान सेवा पोहोचवण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.


## महत्त्वाचे



### ऊस आंदोलन पेटले, गव्हाणीत उड्या मारुन कारखाना पाडला बंद

**बार्शी, दि. २३ नोव्हेंबर-**

शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली २० नोव्हेंबर रोजी ऊसाला पहिली उचल ४००० द्या व दर जाहीर केल्याशिवाय राज्यातील साखर कारखान्यांनी उसाचे गाळप करु नये यासह विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विविध कारखाने, पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयामार्फत निवेदने पाठवली होती. त्या निवेदनात ऊसाची ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या, काटा मारणाऱ्या तसेच ऊस दर जाहीर न केलेल्या व मागील ऊस बिले थकीत असलेल्या कारखान्यांवर दि. २३ नोव्हेंबरपासून आंदोलने करणार असल्याचे जाहीर केले होते, त्याप्रमाणे आज बार्शी तालुक्यातील निमजाई कारखान्याच्या गव्हाणीत उतरुन ठिय्या मांडत कारखाना बंद करण्यात आला. त्यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष विजय रनदेवे, बार्शी तालुका अध्यक्ष हनुमंत कापसे, उमेश यादव, मुसा मस्के, दत्ता कापसे, तानाजी कापसे, ज्ञानेश्वर पवार, विजय पवार, नारायण डिसले, बालाजी डिसले, किसन डिसले, दयानंद ढेंगळे, नितीन कापसे, प्रदीप पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते.



### अनगर निवडणूकप्रकरणी निवडणूक आयोगाने का दुर्लक्ष केले

**काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांचा सवाल**

**सोलापूर, दि.२३ नोव्हेंबर-**

अनगर मधील थिटे या महायुतीतीलच महिलेला उमेदवारी अर्ज भरण्यापासून काही लोकांनी रोखले होते त्यावेळी निवडणूक आयोगाने का दुर्लक्ष केले ? असा संतप्त सवाल महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेश मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पत्रकारांशी बोलताना सरकारला विचारला आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे हे सोलापुरात दौऱ्यावर आले होते. सोलापुरातील काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते मनोज कुलकर्णी यांच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.श्री. लोंढे यांनी मालेगावातील चिमुरडीवरील अत्याचार याला देशातील राज्याचे गृहमंत्री जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रशासन मौन बाळगत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, आर्किटेक्ट राजेंद्र दासरी, पिंटू वाघमारे , हिरेश लालसांगी, युवराज माळगे उपस्थित होते.

### ओंकार साखर कारखान्याची आंतरराष्ट्रीय भरारी

**थायलंड बरोबर साखरेचा करार : चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील**

**पिलीव, दि. २१ नोव्हेंबर-**

ओंकार साखर कारखाना परिवाराने चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील, संचालक प्रशांतराव बोत्रे पाटील यांनी गेल्या सात वर्षांपासून शेतकरी कर्मचारीवर्ग यांना केंद्र बिंदु मानुन काम केल्याने जागतिक पातळीवर ओंकार साखर कारखाना परिवाराने दर्जेदार व गुणवत्तापूर्ण साखर निर्माण केल्याने थायलंड बरोबर ५०००० हजार टन साखरेचा करार करण्यात यश आले आहे.परकीय चलन मिळण्यास परिवारास यश आले आहे. या अगोदर ही इथेनॉलचा आंतरराष्ट्रीय कंपन्याबरोबर करार झाला आहे. हे शेतकऱ्यांच्या कर्मचारीवर्गांच्या दृष्टीने साखर उद्योगातील मोठे पाउल मानले जाते. शेतकरी कर्मचारीवर्ग यांच्या विश्वासार्हतेमुळे आपण आंतरराष्ट्रीय भरारी मारू शकलो असल्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी सांगीतले. आंतरराष्ट्रीय साखरेचा करार झाल्या बद्दल बोत्रे-पाटील यांचे जनलमॅनेजर,सर्व खाते प्रमुख कर्मचारीवर्गांने ,ऊस उत्पादक शेतकरी, वाहन मालक यांनी ग्रामविकास प्रतिष्ठान च्या वतीने अभिनंदन केले.

### बार्शी पोलीस स्टेशनमधील दुचाकी संदर्भात आवाहन

**बार्शी, दि २३ नोव्हेंबर -**

बार्शी शहर पोलिसांकडून नागरीकांना आवाहन करण्यात आले आहे की, पोलीस ठाणे येथे ब-याच गुन्हामध्ये मोटारसायकल जमा करण्यात आलेले आहेत. सदरच्या मोटारसायकल घेणेसाठी बरेच मालक पोलीस ठाणे येथे आलेले नाहीत. येथे विविध गुन्हयात जमा केलेल्या मोटारसायकल एकूण ५६ असून त्याचे वर्णन व तपशील पोलीस ठाण्यात आहे. सदर वाहनाच्या मालकांनी वाहनाच्या कागदपत्रासह पोलीस ठाणे येथे संपर्क करुन आपली वाहने घेवून जावीत. यासाठी संपर्क क्रमांक- १) पोलीस उपनिरीक्षक / महेश गळगटे - ९५०३७८५०९ २) पोलीस हवालदार / सचिन कदम - ८६६९५०२२९६ ३) बार्शी शहर पोलीस ठाणे - (०२१८४) २२३३३३ करावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे.

## राज्यात देवाभाऊ, जिल्ह्यात जयाभाऊ अन् अकलूजमध्ये रामभाऊ

**अकलूजच्या विकासासाठी शेकडो कोटींचा निधी देणार**

**पालकमंत्री जयकुमार गोरे : अकलूज येथे फोडला प्रचाराचा नारळ**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२३ नोव्हेंबर-**

राज्यात देवाभाऊ, जिल्ह्यात जयाभाऊ अन् अकलूजमध्ये रामभाऊ अशा घोषणाांनी सुरू झालेल्या प्रचारसभेत आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार उच्चविद्याविभुषित आहे. आम्ही गुन्हेगाराच्या घरी उमेदवारी दिली नाही. स्वाभिमान गहाण ठेऊन, संघर्षाला तिलांजली देऊन आमदारकी मिळवलेल्या माणसाचे बोलणे मनावर घेऊ नका. राम सातपुतेंच्या पाठीशी राज्य सरकार उभे आहे. तुमच्या विकासासाठी शेकडो कोटी रुपयांचा निधी देण्याचे वचन मी देतो असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अकलूज येथील सभेत दिले.

अकलूज नगर परिषदेसाठी भारतीय जनता पक्षाच्या प्रचाराचा नारळ आज पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते फोडण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार रामभाऊ सातपुते, प्रकाश पाटील, सुजयसिंह माने- पाटील, राजकुमार पाटील, फत्तेसिंह माने-पाटील, बाळासाहेब सरगर, हिंदुराव माने-पाटील, शैलेश कोतमिरे, रंजन गिरमे, आप्पसाहेब देशमुख, पांडुरंग देशमुख व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी आमदार राम सातपुते म्हणाले, अकलूज मधील जनतेला स्वाभिमानाने जगता यावे म्हणून माझी लढाई सुरु आहे. येथील नेते भाड्याने माणसे आणून मला शिव्या घालत आहेत. लँड माफियाला अकलूजच्या नगराध्यक्ष पदावर बसवू नका. अकलूज नगर परिषदेवर भाजपाची सत्ता आल्यास इथे एक शासकीय एमबीबीएस कॉलेज बांधू. नीरा नदीच्या काठाला मरीन ड्राइव्ह बनवू. अकलूज शहरातील व्यापारी, व्यावसायिकांना संरक्षण देऊन इथला विकास साधणार आहोत. आमचे उमेदवार सुशिक्षित आहेत. कोणत्याही गुन्हेगाराला आम्ही उमेदवारी दिली नाही. मजबूत निधी आणून गावाचा विकास करायचा असेल तर भाजपाचीच सत्ता आणली पाहिजे. म्हणून अकलूजकर नागरिकांनो, अकलूजला 'विकसित अकलूज' करायचे असेल तर भाजपच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले.



## 'अरिहंत'च्या प्रकल्पाची राष्ट्रीय प्रदर्शनासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ नोव्हेंबर -**

येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित, अरिहंत पब्लिक स्कूल सीबीएसई या प्रशालेचे इयत्ता नववीचे विद्यार्थी आयुष चारुदत्त लाड व विराज विशाल पावले या दोन विद्यार्थ्यांचा 'स्मार्ट स्कूल ए स्टेप टुवर्डस् फ्युचर लर्निंग' हा प्रकल्प सीबीएसई प्रादेशिक विज्ञान प्रदर्शन पुणे विभागातून राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला आहे.

या प्रदर्शनात राज्यभरातील १६८ प्रकल्प सहभागी झाले होते, त्यात प्रशालेतील विद्यार्थ्यांनी 'उदयोन्मुख तंत्रज्ञान STEM²' या थोममध्ये राज्यस्तरीय अव्वल क्रमांक मिळवला. प्रकल्पाची निवड सीबीएसई राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन दिल्लीसाठी झाली असून, हा प्रदर्शनाचा कार्यक्रम डिसेंबर महिन्यात आयोजित केला जाणार आहे. या स्पर्धेसाठी शाळेतील प्राचार्या सुप्रिया बहिरट तसेच विज्ञान शिक्षिका सीमा घोडके व योगिता गोरे तसेच इतर शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केले. दोन्ही विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याशिवाय महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेना प्रणित उपक्रमशील संस्था पुरस्कार २०२५ हा महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय पुरस्कार अरिहंत पब्लिक स्कूलला मिळाला आहे. सोलापूर येथील एका कार्यक्रमात संस्थेस प्रदान करण्यात आला आहे. शिक्षण, सामाजिक, कला आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय योगदान देणाऱ्या या संस्थेच्या कार्याची दखल घेत अरिहंत पब्लिक स्कूल सन्मान दिला गेला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. शितल शहा, सचिव उज्वल दोशी उपस्थित होते.

## अकलूजच्या मूलभूत प्रश्नांवर आम्ही काम करणार : उर्वशीराजे मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२३ नोव्हेंबर-**



अकलूज नगर परिषदेची निवडणूक सुरू असून अर्ज माघार घेण्याच्या दिवसा नंतर प्रचारात रंगत आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे पूर्ण पॅनल डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील व पद्मजादेवी मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्व जागा लढवीत आहे.

यातील प्रमुख उमेदवार उर्वशी राजे धवलसिंह मोहिते पाटील या निवडणुकीत उमेदवार आहेत. त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की लोकनेते प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी घालून दिलेल्या आदर्शवर आम्ही काम करत असून त्यांचे वाक्य जिवात जीव मान असे तो जनतेची सेवा करू हेच ब्रीदवाक्य घेऊन आम्ही ही निवडणूक जनतेसाठी लढवित आहोत. साधारण अकलूज शहरातील जनतेला मूलभूत सुविधा आम्ही देण्याचा प्रयत्न करणार आहोत. यामध्ये वीज, पाणी, रस्ते, शैक्षणिक व आरोग्य सुविधा याचबरोबर महिलांसाठी वस्तीगृह उभारण्याचा आमचा मानस आहे. पिण्याचे पाणी, खराब रस्ते, खराब गटारी, विजेची सोय नाही हे अकलूज चे मूलभूत प्रश्न असून या सर्व गोष्टीवर आम्ही काम करणार आहोत.

लहान मुलांसाठी व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांसाठी गार्डन व खेळण्याचे ग्राउंड उपलब्ध करणार आहोत अकलूज मधील मतदार हे आमचे कुटुंब आहे व त्यासाठी आम्ही काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.आमच्या पॅनलचे सर्व उमेदवार हे सुशिक्षित आहेत, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे आम्ही करणार आहोत असे त्यांनी सांगितले.

## सांगोल्यातील रस्त्यांसाठी ८० कोटी रूपयांचा निधी देणार

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन**




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२३ नोव्हेंबर -**

सांगोला तालुक्याला कधी नव्हे तो भरपूर विकास निधी दिला आहे. शहराच्या विकासासाठी २०० कोटी निधी दिला. त्यातून अनेक कामे मार्गी लागली. रस्त्यासाठी ८० कोटीची मागणी केली आहे. आचारसंहिता संपताच रस्त्यासाठी ८० कोटी देणार असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगोल्यात केले. ते सांगोला नगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना पक्षाकडून लढवीत असलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, एका शेतकरी कुटुंबातील मुलाने राज्याचा मुख्यमंत्री होऊन गोरगरिबांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे असेपर्यंत चालू राहणार आहे. एसटीमध्ये प्रवाशांना ५०% सवलत, मुलींना उच्च शिक्षण मोफत, मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अनेक रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी दिलेले योगदान खूप मोठे आहे. तरी दि.२ डिसेंबरला होणाऱ्या मतदाना दिवशी सर्वांनी धनुष्यबाणावरती मतदान करून नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेकडून उभे असलेल्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

यावेळी माजी आ.शहाजीबापू पाटील, माळशिरसचे आ.उत्तम राव जानकर, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, माजी नगराध्यक्षा राणी माने, शितल लादे, प्रा.संजय देशमुख, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदा माने, नितीन इंगवले, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेनेचे साईनाथ अभंगराव, विजय शिंदे, दिग्विजय पाटील, सागर पाटील यांच्यासह शहरातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद घोंगडे यांनी केले.

## शाखांसे टुटकर बिखर जायें, ओ पत्ते नही है हम । आँधींसे कहदे की हमसे ना टकरायें

**नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.प्रणिता भालके यांचा विरोधकांना इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ नोव्हेंबर -**

हुकुमशाहीचा बुरुज पाडून लोकशाहीचा आणि लोकहिताचा नवा इतिहास, नवे परिवर्तन घडावावयाचे असेल तर आपल्या सगळ्यांना एकजुट हेवून या निवडणूकी मध्ये प्रस्थापितांविरुध्द लढण्याची गरज आहे. जर एकजुट होवुन एकमुठीने आपण ही निवडणूक लढलो तर येत्या ३ डिसेंबरला विजयाचा गुलाल निश्चित आपलाच असेल असा विश्वास येथील तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉं.प्रणिता भालके यांनी व्यक्त केला.



येथील तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या वतीने पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीतील नगराध्यक्ष तसेच नगरसेवकपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या जाहीर प्रचाराचा शुभारंभ रविवारी (ता.२३) येथील विठ्ठल मंदिराच्या नामदेव पायरी आणि संतचोखामेळा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन करण्यात आला. त्या नंतर तिर्थक्षेत्र विकास आघाडीकडून भव्य शक्तीप्रदर्शन करीत शहरातून प्रचारफेरीचे देखील आयोजन करण्यात आलेले होते. या प्रचार फेरीनंतर येथील महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पुतळ्या जवळ आयोजिण्यात आलेल्या प्रचारसभेत मार्गदर्शन करताना नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके बोलत होत्या.

**स्व.भारतनानांच्या विचारांची भूमिका पार पाडावयाची आहे**

माझे सासरे माजी आमदार भारतनाना भालके यांनी ज्यावेळेस त्यांच्या कार्यकाळात काम करीत असताना पालिकेतील जे अधिकारी मंडळी आहेत त्यांना लोकांच्या दारापर्यंत नेऊन काम करण्याची भूमिका पार पाडलेली आहे.तिच भूमिका येणाऱ्या काळा मध्ये आपणा सर्वांना पार पाडावयाची आहे असे देखील प्रणिता भालके यांनी सांगितले.

**वादळामध्ये दिवे लावणारी आम्ही माणसे**

आम्ही वादळामध्ये दिवा लावणारी माणसे आहोत. वादळात आम्ही दिवा लावला आणि तो कायम तेवत ठेवण्यासाठी या मायबाप जनतेनेच आम्हाला आडोसा दिला आहे. आमच्या लावलेल्या वादळातील दिव्यांचा प्रकाश हे पंढरपूर निश्चितच लख्ख करुन आम्ही शांत बसणार आहोत असे भालके यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, भैरवनाथ शुगर्सचे अनिलदादा सावंत, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन तथा नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रणिता भालके यांचे पती भगिरथ भालके, माजी नगरसेवक किरण घाडगे, माजी नगरसेवक राहुल साबळे, माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर आदींसह विठ्ठल परिवारातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रणिता भालके म्हणाल्या,आपली उमेदवारी ही सर्वसामान्य जनतेची, कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची उमेदवारी आहे. या निवडणूकीत आपल्या समोर प्रस्थापितांचे आव्हान आहे. हे आव्हान समर्थपणे भेदण्यासाठी आपल्या मध्ये एकीची वज्रमुठ हवी आहे. आपल्या एकीमुळे समोरच्या प्रस्थापितांना असा धक्का बसेल की येणाऱ्या काळात सर्वसामान्यांची पिळवणूक करण्याचे पुन्हा कधीही त्यांचे धाडस होणार नाही. शहर विकासाच्या पोकळ गप्पा मारणाऱ्या विरोधकांनी गेल्या चाळीस वर्षात पंढरपूर शहराचा कोणता विकास केला या बद्दलचा लेखाजोखा येथील शिवतिर्थावर जरुर मांडवा असे देखील खुले चँलेंज यावेळी प्रणिता भालके यांनी विरोधकांना दिले. आपण देखील येत्या पाच वर्षात शहराचा काय विकास करणार याचा रोडमॅप देवून विरोधकांशी विकासा बद्दल समोरासमोर जाहीरपणे बोलण्यास कधीही तयार आहोत असे देखील यावेळी त्यांनी सांगितले.